[Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as.]
Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.]

सालअखेर ,, ७ ,, १ ८
किरकोळ अंकास .... .... .... ४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।८६
दुसरे खेपेस .... .... ०।१

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 2 DECEMBER 1895 NO 46

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख २ माहे डिसेंबर सन १८९५ इ० अंक ४६


## नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं वर्ग १३ सन १८९० चा अक्ट ८ कलम ६ प्रमाणें.

अर्जाचा नंबर ६ सन १८९५ वर्ग १३

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टात.

अर्जदार मारुती वल्लद कडताजी अज्ञान

पा० मावस भाऊ बलिराम

जात कुणबी

राहणार मलकापूर ता० दर्यापूर परगणे अंजनगांव तर्फे डे० कमिशनर एलिचपूर

मारुती वरील ( अज्ञान ) बापाचें नाव कडताजी जात कुणबी खारोडे राहणार मलकापूर खा ह्याचें तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर यांणें तर्फे डे० कमि० एलिचपूर (याच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळावे ह्मणून ) ( याचें पालन व मालमिळतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे. यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून, किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुंष्यास सदरहू अज्ञानाचे माल मिळकतीवर सांभाळ कर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं तारीख ११ माहे दिजेंबर सन १८९५ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळी ह्या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकिगत दाखल करावी. तारीख ९ माहे नोवेंबर सन १८९५ इसवी.

H. Godwin Austen
Deputy Commissionr
Ellichpur District
दिपुटी कामिशनर.


SAPKAR'S DIARY
FOR 1896
WITH
A CALENDAR FOR 1897

सापकारांची रोजनिशी,
सन १८९६ सालाकरितां.

हींत मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौंजीविवाहांच मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीआर्डरी, पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या रूळी, सिव्हिल् प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्ट्यांप, कोर्ट फी, पोलिस गॉईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल् प्रोसिजर, इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जोडिलीं आहेत.

| रोजनिशीची किंमत. | किं. | ट. हां. |
|---|---|---|
| प्रत नंबर १ .... .... | ०२ | १०२ |
| प्रत नंबर २ .... .... | ०८ | १०॥ |
| प्रत नंबर ३ .... .... .... | ०७ | १०॥ |

किंमतीबद्दल रोख पैसे आह्माकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक.


## मातृमाहात्म्य आणि सद्यःस्थिति

( लिहून आलेला मजकूर )

मागील अंकावरून पुढें चालू.

नेपोलिअन बोनापार्ट नेहमीं ह्मणत असे कीं कोणत्याही मनुष्याचें भावी सुख दुःख त्याच्या जननीवर सर्वथैव अवलंबून असतें. एकवार सरकारनें सुरू केलेल्या शिक्षणासंबंधीं भाषण करीत असतां वरील पुरुष मॅडम कॅम्पन जवळ ह्मणाला "हल्लींची शिक्षण पद्धति मला निरुपयोगांशी वाटतें. लोकानां अधिक सुशिक्षित करण्यास अद्याप काय कमी आहे असें तुला वाटतें? " हा प्रश्न विचारतांच त्या बाईनें चटकन "आया" असें उत्तर दिलें. खरोखर त्या बाईनें शहाणपणाचें उत्तर दिलें. आपल्या मुलांना योग्य असें शिक्षण देण्यास आपल्या देशांतील किती आया समर्थ असतील बरें! एक तरी असेल किंवा नसेल याची देखील वानवाच आहे. नेपोलिअनच्या आईचें जितकें त्याच्यावर वजन होतें तितकें जगांत दुसऱ्या कोणाचेंही त्याच्यावर वजन नव्हतें. ती त्यास प्रेमळपणानें वागवी ह्मणून तोही तीवर प्रेम करी; कडकपणानें वागवी ह्मणून तो तीस भीत असे आणि तिचें वर्तन अतिशय न्याय्य असे ह्मणून हा तिचें सर्व ह्मणणें ऐकत असे. ही गोष्ट खरी आहे कीं सदाचरण व सत्छील हीं बरेंच अंशीं नैसर्गिक आहेत तरी पण त्यांना लहानपणापासून एका प्रकारचें वळण मिळावें लागतें.

ही गोष्ट निर्विवाद आहे कीं आपल्या स्वभावास आणि शीलास जें वळण लागतें तें आपली मति कोमल असतांनाच लागतें. ज्या वेळीं आपण आपल्या भोंवतालच्या वस्तु पाहून ज्ञानप्राशन करीत असतो त्या वेळीं आपण सर्वथैव आईच्या आधीन असतों जर कोणी आपणास प्रेमानें शिकवीत असेल तर ती आईच होय. आया जगाकरतां किती श्रम घेत असतात याची जगास नुसती कल्पना देखील करवणार नाहीं. लोक द्रव्य आणि कीर्ति सम्पादन करितात. परंतु ज्यांच्यामुळें तीं प्राप्त झालीं असतील त्यांचे स्मरण देखील होत नाहीं! स्काट, कूपर, शिवाजी, ग्रे, श्रीमंत सरकार नाना साहेब पेशवे इत्यादि थोर पुरुष इतके थोर निवळ मातृशिक्षणाच्याच योगानें झाले.

आपल्या आयुष्याच्या अत्युपयुक्त लागवडीच्या वेळीं आपण मातृसान्निध्यांत काळ कंठीत असतों. आपणास जीं जीं संकटें येतात त्यांचें निवारण आपण मातृसहायानें करीत असतों. ज्या आईचा स्वभाव खोडसाळ आणि भित्रा असतो तिचीं लेंकरें बहुधा खोडसाळ आणि भित्रीं निपजतात. आपल्या मध्यें सर्वच गोष्टींची उणीव आहे. चरित्रांची उणीव तर विशेषच आहे. त्यामुळें या देशांत मातृशिक्षणाचा आपल्यावर काय परिणाम घडत गेला हें निवेदन करणें जरा दुरापास्त आहे. तरी थोडी फार चरित्रें आढळतात त्यांवरून मातृशिक्षणाचा आपल्या महात्म्यावर केवढा परिणाम घडला याचें अनुमान अंशतः तरी काढतां येतें. जी गोष्ट इतर राष्ट्रांस लागू तीच गोष्ट आपणासही तितक्याच किंबहुना अधिक प्रमाणानें लागू आहे यांत संशय नाहीं.

कुटुंबाच्या नैतिक शिक्षण संबंधानें एक ध्यानांत ठेवण्यासारखी विशेष गोष्ट ही आहे कीं, ज्या घरांतील स्त्रिया सद्गुणी आणि सुशील असतील त्या घरांतील पुरुष कितीही प्रमत्त, अनवहित आणि दुराचारी असले तरी स्त्रिया आपल्या उदाहरणांनीं व आपल्या सौम्य प्रेमपूर्वक सुशीलतेनें मु[लां]चें रक्षण करून त्यांना सन्मार्गास लावतात. परंतु बाप कितीही विवेकी आणि सद्गुणी असला तरी जर आई वाईट असेल तर मुलांचें कल्याण झाल्याची हजारांत पांच देखील उदाहरणें सांपडणें कठीण. सुशील आयांची वाण निवळ शिक्षणानें अगर धन सुखादि साधनांनीं कधींही भरून येणें नाहीं. गृहशिक्षणाचा बहुतेक भार जननीवर आहे. घर निवळ सामाजिक धर्मांचीच शाळा नसून सर्व जगभर लागू पडणाऱ्या तत्वांची व नियमांची एक कोशभूमि आहे. राष्ट्रांची उत्पत्ति सूतिका गृहामधून झालेली आहे. आणि कोमल बालकांना ज्या प्रकारचें गृह शिक्षण मिळालें असेल किंवा मिळत असेल त्यावर राष्ट्रोन्नति अवलंबून आहे.

मनुष्याच्या पुढील सर्व आयुष्याची जोखीम ज्याप्रमाणें स्त्रियांवर आहे त्याचप्रमाणें समाजाच्या सुशीलतेचा सर्व भार समाजाग्रणींवर आहे. लोक अधिक अडाणी असतांना जर समाजाग्रेसर त्यांस फसवून आपणास वाटेल तसें वळण देण्याचा यत्न करतील तर ते कांहीं दिवस त्यांच्या रोखा प्रमाणें वागतील पण शेवटीं त्यांच्यांत व यांच्यात मोठा मतभेद होण्याचा संभव आहे. जेथें कोणत्याही गोष्टीचा पायाच नियमित धोरणांवर नसेल तेथें अशा व्यवस्थेपासून अनन्त घोटाळा उर्फ गोंधळच माजणार यांतही संशय नाहीं.

मनुष्य जन्मल्या पासून मरेपर्यंत एक सारखा बरें वाईट शिकतच असतो. त्याचें सुशिक्षण बंद पडलें ह्मणजे उलट शिक्षण सुरू होतें. गृहशिक्षणाच्या ह्मणजे मातृमाहात्म्याच्या बाहेर पडला ह्मणजे तो राष्ट्र शिक्षण पद्धतींत पडून तेथें ज्ञानार्जन करतो. तें ज्ञानार्जन करतांना शिक्षकांच्या गुणांचा त्याच्यावर थोडा फार परिणाम घडतो. परंतु ज्याप्रमाणें आपल्या देशांत स्त्रियांची योग्यता तुच्छ होत चालली आहे तद्वतच शिक्षकांचा धंदा महत्वाचा असून तोही हलकटच लेखला जाऊं लागला आहे. शिक्षकवर्गही निवळ पोटार्थी आणि उदरंभरणैकदृष्टी निपजू लागला आहे. याही गोष्टीस समाजव्यवस्था व समाजघटनाच कारणीभूत आहे. समाजघटकावय अजाणत्या भुजिष्यतुल्य मातेच्या आणि धिःकृत शिक्षकवर्गाच्या शिक्षणाखालीं तयार झाल्यावर त्यांचें पुढील शिक्षण समाज धुरिणांवर अवलंबून असतें. समाजाग्रणींची आणि जननीची बहुतेक सारखीच जबाबदारी आहे. त्यांच्या अंगच्या गुणांचें अनुकरण समाजघटक व्यक्ति आपोआप तूष्णींभावेन करीतच असतात. त्यांच्यात निदान दृढतर सत्यप्रीति आणि आस्था इतके दोन गुण तरी असले पाहिजेत. परंतु ह्या दोन्ही गुणांचा आपल्यामध्यें इतका कांहीं [लो]प होत चालला आहे कीं या देशाचें ज[हा]ज कोठें, कसें, व केव्हां अदळेल याचा कांहीं नियमच राहिला नाहीं. ज्या देशांत गृहशिक्षण, राष्ट्र शिक्षण, आणि समाजशिक्षणहीं तिन्हीं अशा प्रकारचीं शोचनीय झालीं आहेत त्या देशाची उन्नति तर दूरच राहिली परंतु विलय मात्र निःसंशय जवळ आला यांत संदेह नाहीं.

क्रियेला प्रत्युपाय नाहीं असें नाहीं. कोणतीही स्थिति सुधारण्या सारखी नसते असें नाहीं. अद्यापही सर्व कांहीं सुयंत्र जमण्यासारखें आहे. परंतु सद्यःस्थिति कितपत शोचनीय झाली आहे याचा कोणी लक्षपूर्वक विचार तरी करीत आहे काय?

अभ्यासाच्या आणि सवयीच्या योगानें मनुष्यास कायम स्वरूप येतें ही गोष्ट जितकी खरी आहे त्या पेक्षांही गृहाच्या योगानें मनुष्यास स्थिरवृत्ति येते हा सिद्धांत अधिक सिद्धस्वरूप आहे. प्रथमतः गृहशिक्षण ह्मणजे मातृ शिक्षण प्रभाव, मागाहून राजदत्त शिक्षणप्रभाव, आणि शेवटीं समाजभारवाहक दत्त शिक्षणमाहात्म्य या तिन्ही शिक्षणांच्या योग्यतेवर राष्ट्राची योग्यता अवलम्बून आहे तर खऱ्या देशभक्तानें या तिन्हींची जिकडून सुधारणा होईल तिकडून यत्न केला पाहिजे.

या मानानें पाहू गेलें असतां सामाजिक परिषदांचा मौलीभूत हेतु स्त्रीवर्गसुधारणेचा आहे. या सुधारणेच्या आड येणें किंवा या सुधारणेस प्रतिबंध करणें फार अनिष्टकारक होईल यांत संशय नाहीं. मुळींच राष्ट्रामध्यें सामाजिक विषयांची चर्चा न होण्या पेक्षां कांहीं तरी वादविवाद होऊन थोडें फार लोकमत जागृत होईल तर तसें होणें इष्टच आहे. असें असून पुण्यांत एवढा धुमाकूळ कां माजावा हें समजत नाहीं.

ईश्वर करो आणि आमची चिंता दूर करो.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य १ शके १८१७

पुण्याहून आलेल्या या आठवड्यांतील नवीन बातम्यावरून तेथें समेट होऊन कांग्रेसचें काम पार पडेल अशी उमेद बाळगण्याचीं बरींच चिन्हें दिसूं लागलीं आहेत. सर्व पक्षांचा समेट होणेंच इष्ट आहे हें कोणीही कबूल करील. सुधारणेच्या कामांत वऱ्हाडानें आपला वर चष्मा केला हें कोणीही कबूल करील. येथील सामाजिक परिषदेनें पाठवलेले मुखत्यारांस सर्व प्रांताच्या सुधारणाधुरंधराचें लोकसंमत रूप आलें आहे. ठिकठिकाणच्या सुधारकांस आमच्या प्रांतानें खालीं पहावयास लावलें यांत शंका नाहीं. इतर ठिकाणच्या सुधारकांनीं आमच्या प्रांताच्या सुधारकांचें अनुकरण केलें असतें तर हल्लींची पुण्याची बजबज पुरी केव्हांच अस्तित्वांतही आली नसती. हा प्रकार कांग्रेसच्या देश कार्यास युक्त नसल्यामुळें येथील जनावरांच्या मनांत एक मुसंडी मारण्याचें आलें होतें पण बहुतेकांनीं तीं त्यांचीं शिंगें कापून तीं जागच्या जागींच जिरविलीं. या प्रमाणें इतर कांहीं ठिकाणीं प्रकार झाला. कसेंही असो झालेली गोष्ट इष्ट आहे असें कोणीही विचारी मनुष्य कबूल करील. आज दहा वर्षे सर्व जगभर दुमदुमत असलेलें कांग्रेस लोकांचें नसून फक्त विविक्षित विद्वानांचेच आहे असें ह्मणणें ह्मणजे कांग्रेस लोकांचें नाहीं. कांग्रेसच्या मागण्या बहुजनसंमत असतील व नसतील तरी त्या विद्वानांच्या आहेत ह्मणून सरकारानें त्या द्याव्या असें ह्मणणें होतें. मग राजकर्त्यांनीं हा तागाईत कांग्रेसवर आणलेले आरोप पक्षाभिमानानें वस्तुस्तुस्थिति तशी नसतांही केवळ दुराग्रहानें, पक्षाभिमानानें आणि हट्टानें आपण कबूल केले असेंच होत होतें, अशा प्रकारें कांग्रेसचें खरें महत्व जाऊं पहात होतें. परंतु ज्याचा शेवट गोड तेंच गोड शेवट गोड होऊं पहात आहे. आपली दुही मोडणें इष्ट होतें व ती मोडूं पहात आहे. मात्र या वेळीं सभेच्या कामाची व्यवथा अमुक पक्षाकडे असावी अमुक पक्षाकडे नसावी अशा हरकती बहुजनसमाजानें आणू नयेत. आपल्याकडील व्यवस्था झिटकारून देण्यांत लोकांनीं जी सुजनता दाखविली तीच कायम ठेवून हें कार्य एकदाचें उरकून घ्यावें. असें करण्यानें कोणी वृथा इसापनितींतील बेडका प्रमाणें फुगलेच तर आपोआप पोट फोडून घेतील. इतकी सूचना पुरी आहे. लोकांनीं जरूर एकत्र होऊन आपसांतील दुही मोडून टाकावी हेंच इष्ट आहे.

---

अखेर श्रीमंत इंदूरचे सरकारनीं जो प्रसंग आणूं नये तो आणलाच! आमचे ऐकण्यांत असें आलें आहे कीं महाराजास राहण्यास एक जागा नियमित करून राजधानीच्या शहरीं मूळींच येऊं नये असा हिंदुस्थान सरकारनें हुकूम फर्माविला आहे. ही बातमी निराधार असावी अशी आमची मनापासून इच्छा आहे परंतु तसें असणें संभवत नाहीं महाराजांच्या युवराजस्थितीच्या वेळच्याच बातम्यावरून व त्या वेळच्या त्यांच्या गुणावरून हा प्रसंग केव्हांना केव्हां तरी यांच्या राज्यव्यवस्थेंत येईल असें स्वमच पडलें होतें आधींच एतद्देशीय संस्थानें थोडीं. त्यांत जीं आहेत त्यांचीही अशी वाट होत चालली ही गोष्ट किती शोचनीय आहे आतां इंग्रज सरकारचें करणें तरी कितपत खरें आहे तें पाहूं. मार्क्किस ऑफ वऽसली ह्यानें ज्या वेळेस सबसीडियरी सिस्टिम चालू केली व ज्या वेळीं सुर्जी अजनगांवचा तह झाला त्यांत त्यांनीं काय ठरविलें कीं एकमेकांनीं एकमेकांशीं वैरभाव ठेवूं नये व कोणाशीं लढाई वगैरे करणें झाल्यास इंग्रज सरकारच्या संमतीनें करावी. ह्यांत इंदूर सरकारेंनेंही कांहीं तहाविरुद्ध केलें नाहीं. प्रजेशीं कसें वागावें इत्यादि मजकूर तर त्यांत नव्हताच. इंदूर सरकार ह्मणजे साधारण इंग्रजांच्या बरोबरीचे त्यांस गादीवरून काढणेंही इंग्रजास बरोबर दिसत नाहीं. आतां त्यानीं पुष्कळ अपराध केले ते ही प्रजेचे सरकारचे तर नाहींना? मग एवढा उपद्व्याप करण्याचें कारण तरी काय? त्याचें कारण हेंच कीं कसेंही करून एतद्देशीय संस्थानें गट्ट करावयाचीं. असे आतां सरकारनें एवढें तरी करावें कीं इंदूरच्या महाराजानीं जे काय अपराध केले आहेत त्यांची एकदा उघडपणें चौकशी करून जें काय करणें तें करावें.

---

सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभे या मंडपांत भरूं द्यावी किंवा भरूं देऊं नये अशा विषयीं पुणेंशहरामध्यें मोठे तट पडले होते. ही दुही व फाटाफूट इतकी माजली होती कीं राष्ट्रीय सभेलाच खो बसेल अशी भिती उत्पन्न झाली होती. राष्ट्रीय सभा बुडण्याची वेळ येऊन बेतली ह्मणून न्यायमूर्ती राव बहादूर महादेव गोविंद रानडे यांनीं सामाजिक परिषदला यंदा राष्ट्रीय सभेचा मंडप मागावयाचा नाहीं असें ठरविलें. अर्थात पुण्यांतील उभय पक्षांचा वाद मिटला. आणि राष्ट्रीय सभा निदान सुयंत्रपणें पुण्यास निभेल असा आशांकूर आतां फुटला आहे. ईश्वर करो आणि यंदाची राष्ट्रीय सभेची बैठक निर्विघ्नपणें पार पडो!

---

## The Berar Samachar

MONDAY DECEMBER 2, 1895

### JURY TRIAL

In every European country where trial by jury has been in force, it has been introduced not as an auxiliary to the police for the purpose of repressing crimes but as an agency to protect the liberty of the subjects and to secure impartial justice as judged by public opinion sanctioned by authority. The police never first suggested the idea of a jury in any country so far as we know, nor the magistracy nor the Executive. But in India an effort was made to abolish trial by jury on the authority of Police Reports and of the opinion of Executive officers. The Police maintained that the iury system favored the escape of crime. We have a notoriously inefficient and corrupt Police whose atrocities are only cheek ed by the judiciary and the jury. Against both the latter therefore the Police have every grievence. They argue their work of detecting crime is thwarted by the acquittal of prisoners taken before the courts! They will of course never admit that they concoct cases, suborn witnesses, fabricate evidence to secure convictions of innocent persons or cases break down through their own inefficiency to manage prosecutions. Grave irregularities in the procedures of the committing magistrates themselves have the baneful effect of spoiling simple and matter of fact cases. In circumstances like these who would not like to resort to the safest asylum of falling foul of the jury, of those judicial officers who would not convict a prisoner except upon untainted evidence and of the vigilant and conscientious pleaders who lay bare the Police practices in their glaaring form.? Judges and pleaders have been before this found fault with by the Executive There can be no doubt that the Government regards the jury as a machinery for the repression of crime. But this thesis no practical man will ever uphold. The idea is abhorrent to any common sense. The institution as we have said above was never introduced in India or else where with this object in view. It is extremely improbable that a murderer before committing an offence would consider to himself whether in the event of his being apprehended he would be tried by a Judge sitting with assessore or by a judge and jury. On the other hand the employment of juries to try criminal cases tends to disseminate a knowledge of the Criminal Law and such extended knowledge must have a tendency to repress crime. It is significant to note that this last mentioned feature never attracted the notice of the government. Can crime be put down immediately by securing the conviction of every man accused.? Farseeing and thoughtful men who judge of institutions like this will always take a wider and more hopeful view and estimate their worth not so much by the immediate benefit as the Government does but by the prospective and far reaching influence which they will exert on the masses of the people, as Mr. Justice Beverley points out. The government can have no supporter in thinking that Jury trial is intended for repressing a crime.

In order to produce that effect the Jury must be able to instil fear into the minds of the crimiral classes. But can a man who has simply to record his opinion on matters of fact instil any fear? Has the Jury any power to determine the limit or the mode of punishment inflicted on a prisoner? It can simply record its opinion on a given state of things according to common sense. If it be supposed that the Jury can inspire fear by convicting every person, such a fear will be shared not only by the criminal class, but by all honest citizens too. The Jury can not be thus made an object of fear to the public at large. If it be said that the Jury does not repress crime owing to its tendency to acquit prisoners we fear that some of our Law Courts preeminently the High Courts will be open to the same charge. For it is well known that in a large number of cases in which the High Court would not for a moment think of finding the accused guilty, the mofussil courts do not hesitate to convict. The care and patience with which the High Court scrutinizes the evidence in appeal and its readiness to acquit prisoners if there be not sufficient trustworthy evidence, act as a check on the extravagant greed of Moffusil judges to send men to jail or to the gallows. It can be proved by statistics that the cases in which the High Court has acted as the acquitting medium in appeal, are far more numerous than those in which it has made up its mind to convict. The High Court therefore so far as this sense is concerned cannot be said to repress crime. But the abolitions of High Courts was never spoken of though only two years ago the abolition of juries was the favorite key-stone of the Viceregal Council. If the jury should be intended to repress crime, much more should it be considered the duty of the High Court to perform the same function. What the High Court cannot do or will not do Jury cannot be censured for not doing. The truth is that those who advocate the impotence of Juries to repress crime are altogether ignorant of the very first principles which form the foundation of Trial by Jury.

If then trial by Jury be a machinery adpoted for giving to people a justice compatible with public opinion, it aims at several beneficial operations and it is most desirable that they should be extended to every place in this country.

---

The Director of Land Records has written a note on the proposed training of Patwaries in surveying. It is likely that the proposal will soon be a rule of practice. He remarks.—

"The Government of India desired that as many as possible of the existing staff of patwaris, as well as all candidates for patwariship, should be trained in surveying. They considered that a knowledge of surveying rendered the patwari more efficient for the discharge of such duties as the preparation of a record of rights or the petty matters of village dealings and interchanges of land between ryot and ryot. To carry out the wishes of the Government of India, the Resident prepared and issued a draft resolution dealing with the system to be followed in training these men; this was circulated for the opinions of four Deputy Commissioners and myself and these were forwarded to the Commissioner with this office Camp No.367 of the 1st. May last. Further orders are awaited."

Mr. F Bullock however knows that the plan is a good one but is afraid that it will lay a heavy burden upon Patwaries in point of the "

remuneration they receive. He observes thus:—

"The training of patwaris in surveying has not yet been commenced, and final orders on this subject are awaited. But meanwhile the employment and instruction of munsarims and taluka classers have been very successful so far as it has gone. It must be remembered that the Berar patwaris have hitherto not been required to do very much in regard to records and surveying, and are very backward; but they show plenty of capacity for the work. Their pay is, however, very small, and it is doubtful whether it is wise to require too much of them."

"The Deputy Commissioner of Akola has written at considerable length on the present condition of the agricultural classes. He considers it far from good, and quotes his Tahsildar's authority in support of the opinion of the general in— debtedness and impoverishment of the ryots—a fact which he rightly considers has unfortunate bearing on the coming revision survey. But against this there is the undoubted increase in litigation, which shows that the ryots can afford the luxury of legal proceedings, and the large amount of advance payments of revenue without pressure.

He describes the Kunbi as a careless and lazy cultivator, preferring to pay for hired labour to working himself, and contenting himself with indifferent crops rather than take the trouble to weed his fields. Owing to this inherent laziness he thinks the Kunbi is less well off than he should be, as his profits grow less if he cannot afford hired labour. But he still does not see signs of much real distress.',

Revenue Report.

## वऱ्हाड

'हितचिंतक'-- पत्र उशीरा पोंचलें सबब त्याची व्यवस्था पुढील आठवड्यांत होईल.

मि० बुलक साहेब यांस कायमची कमिशनरी मिळाल्यामुळें त्यांच्या अभिनंदनार्थ; मि० अजिजुद्दीन असि० कमिशनर यांनीं गेल्या गुरुवारीं मेजवानी दिली.

मि० अजिजुद्दीन असि० कमिशनर यांस औरंगाबाद छावणींत माजिस्त्रेटचे जागीं बदलण्यांत आलें आहे.

क्याप्टन आयऱ्हर्स व मि० सिम्पसन असि० कमिशनर, अकोला यांच्या कडील दिवाणी काम काढून फक्त फौजदारी ठेविल्या मुळें १ रुपया पासून ५०० रुपया पर्यंतच्या दिवाणी मोकद्दम्यांतिल पक्षकारांस व्यर्थ श्रम व खर्च पडत आहे.

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर सिव्हिल जज्ज यांच्याकडे सर्व दिवाणी काम दिल्यामुळें त्यांत काम अतोनात पडतें या गोष्टीकडे मि० हेअर साहेब लक्ष्य पुरवतील तर फार बरें!

येथील चीफ कानस्टेबल रा. रा. भगवान दीन यांची बढती ६० रुपये पगारावर बुलढाण्यास कोर्ट इनस्पेक्टरच्या जागीं झाली.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन व रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी हे अनुक्रमें कारंजा व जळगांव या भागाकडे फिरत आहेत.

अकोला जिल्हा बोर्डास सालिना प्राथमिक शिक्षणा निमित्त १९।२० हजार रुपये प्रांतिक उत्पन्नांतून देत असत ते या झालीं काढून घेण्यांत आले.

रा० रा० नारायण पांडुरंग जोशी ए० असि० कमिशनर यांची बदली अकोल्याहून इलिचपुरास झाल्या अन्वयें ते तिकडे रवाना झाले. गृहस्थ वृत्तीनें शांत, न्यायी, व विचारशील आहेत.

परतवाडा—'प्रेक्षक' पुढील अंकीं सर्व मजकूर प्रसिद्ध होईल.

क्या० कोलेंब यांस बुलढाण्यास डे० कमिशनरचे जागीं बढती मिळाल्या कारणानें मि० प्रिडो असि० कमि० यांस उमराव तीत परत यावें लागलें.

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥≡ |
| ५ ,, दिवसांच्या मुदतीची | | | ९९॥- |
| सुवर्ण | २८ | रुपें | १०० |
| मीठ | ३॥।= | आळशी | १०१॥ |
| गहू कांठ | ५६। | सर्की | ४॥= |
| तूप | ८॥।≡ | तेल | ६॥ |
| चणे | ५५ | तीळ | १०० |
| कपाशी | ४७ | गावराणी रुई | ६३॥ |

सट्याच भाव.

| | |
|---|---|
| जवारी फाल्गुन शुद्ध १५ | ४८॥। |
| रुई फाल्गुन शुद्ध १५ | ६५ |
| आळशी वैशाख शुद्ध १५ | ९८॥।= |
| गहू वैशाख शुद्ध १५ | ६४८= |

नोटीस

क्लास नंबर ७ किरकोळ नादारी मु० नंबर ९

१८९५

वि० बाळकृष्ण बळवंत सुळें साहेब बी. ए. इन्सालनहंशी कोर्टाचे जडज्य कोर्ट अकोले

रामन्ना वल्लद रामय्या राहणार अकोले वादी

नरसय्या वल्लद येंकय्या बेडर राहणार अकाले. नादार

दावा रुपये ४८८१२८९

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं प्रतीवादी [ नादार ] नरसय्या वल्लद येंकय्या बेडर राहणार अकोलें याणें आमचे कोर्टांत नादारीत अर्ज दाखल केला आहे त्याची चौकशीची ता० ७।१२।९५ इसवींची नेमिली आहे करितां ज्या कोणास नादारा विरुद्ध आपली तकरार सांगणें असेल त्यांणीं सदर्हू तारखेस आमचे कोर्टात सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर रहावें कळावें तारीख २९।११।९५ इ०

B. B Sule.
Judge
Bankruptcy Court.
Akola District.

## नोटीस

वेदमूर्ति शास्त्रसंपन्न राजश्री अनंत वासुदेव दिक्षित, चिंतामण शंकर दिक्षित, कृष्णाजी सदाशिव दिक्षित, वामन बाळकृष्ण दिक्षित, हरी रामचंद्र दिक्षित, भास्कर वासुदेव दिक्षित, दामोधर जनार्दन दिक्षित वगैरे सर्वत्र भाऊबंद निसबत दिक्षित घराणें शेंदुर्णी जाहगीर उत्तरभाग यांचे सेवेशी—

या नोटीशीनें सर्वत्र भाऊबंदांस कळविण्यांत येते कीं खालीं सही करणार वासुदेव विष्णु व वेदमूर्ति राजश्री नारायण जगन्नाथ दिक्षित या दोहोंत जाहगीर-वाहिवाटी विषयीं बरेच दिवस फिर्याद चालून अखेर मुंबई हायकोर्टांत ठराव झाला त्या अन्वयें जाहगीरीची वाहिवाट वासुदेव विष्णु याजकडेसच कायम राहिली व मजकडेसच ती रहावी असें आतां निर्विवाद ठरलें आहे. आपली सर्वांचीही अशीच इच्छा होती कीं पुष्कळ वर्षांपासून माझे घराण्यांत चालत आलेली वाहिवाट तशीच कायम राहावी व तींत मुळींच बदल होऊं नये. ह्मणूनच वेदमूर्ति नारायण जगन्नाथ यांनीं मजविरुद्ध रचलेली फिर्याद आपणांस अर्थातच असंमत व न आवडणारी गोष्ट झाली. त्यापायीं मी व्यर्थ खर्चांत पडलों व तोंडघशी पडून दुसऱ्याच अडचणी भोगणें मला प्राप्त झालें. तरी या गोष्टीस न जुमानतां आपलें सर्वांचे हितावर व इच्छेवर लक्ष्य पोहचवून अद्यापि ही अडचणी सोशीत आहे हें आपण प्रत्यक्ष पाहताच.

वरील फिर्यादींत मी प्रतिपक्ष चालवावा हें आपणास ग्राह्य संमत होतेंच. व या सर्व मान्य कृत्यासाठीं ऋण काढावें लागलें व तें जरूर होतें- या कर्जाची रकम अर्थातच पुष्कळ आहे. ही रकम, तीवर चढत चाललेलें व्याज व माझे स्वतःचें उत्पन्न यांचा मेळ मुळींच बसत नाहीं हें आपण जाणताच आहात. याकरितां ऋणांत आमरणांत देह झिजवून कष्टविण्यापेक्षां एखादा तरणोपाय शोधून ऋणमुक्त कसें होतां येईल या योजनेंत मी आहे. आपले सर्वांचें हित त्यांतच माझें हित व आपली सेवा हें माझें कर्तव्य ह्मणूनच आपले हितासाठीं आपलें सर्वांचे इच्छेप्रमाणें एक भावानें झटलों व कर्जाचा बोजा शिरावर लादून घेतला. हा ऋणभार दूर करण्यासाठीं मी अनेक तऱ्हेनें अनेकवार आपणास विनंती केली परंतु तिचा उपयोग झाला नाहीं. आपण मजला मदत करावी तशी केली नाहीं. जाहगिरीची वहिवाट जातीनें पाहून मेहतान्याबद्दल वसूल रकमेवर कोणत्याही प्रकारचा बोजा न घालतां इतर भाऊबंदाप्रमाणेंच माझे हिशास फक्त माझी ह्मणून जी रकम येते तितकीच घेऊन मी आपली सर्वांची सेवा करीत आहे. अशीच आप्तजनांची सेवा आमरणांत मजकडून घडावी व आप्त जनांच्या ज्या फायद्यासाठीं परिश्रम मी घेतले व अखेर ऋणांत बुडालो तो फायदा आपणांसमेत मलाही अल्प स्वल्प मिळावा हें रास्त आहे. या उमेदीवरच वेदमूर्ति रा० नारायण जगन्नाथ दिक्षित यांच्याशी मी प्रतिपश चालविला. असें असून ही आपले दुर्लक्ष्यामुळें मजवरचें कर्ज दिवसें दिवस वाढत चाललें आहे व या पुढें आपण या गोष्टी विषयीं असेंच औदासिन्य धरलें तर परिणाम इष्ट होणार नाहीं हें मी सांगणें असें नाहीं तरी पण असें न व्हावें व आपले जहागिरीची वहिवाट परस्थाचे हातीं जाऊं नये यासाठीं माझे अल्पमतीस जे दोन उपाय दिसतात ते वावगे नाहींत असें ह्मणणें मला भाग पडतें एक तर ज्या वहिवाटीची इच्छा धरून वेदमूर्ति रा० नारायण जगन्नाथ यांनीं कलह माजविला तीच वहिवाट आपले सर्वांचें इच्छेनुरूप आपले सर्वांचे हितार्थ कायम ठेवण्यासाठीं आपले सर्वांचे उमेदीवर मी खटपट केली व ऋणसंकटांत सांपडलों ही गोष्ट आपण पूर्णपणें जाणत असतांही ज्या अर्थी मला आपली मदत होत नाहीं व निराशेनें माझा मलाच उपाय योजून काढावा लागत आहे त्या अर्थी ती वहिवाट वेदमूर्ति रा० नारायण जगन्नाथ यांचे स्वाधीन केली तर ते तरी मला ऋणमुक्त अनायासें करतील असें मला वाटतें व नंतर आपणा चार चौघांप्रमाणेंच सुखानें व आनंदानें मला कालक्षेप करितां येईल. वहिवाट वेदमूर्ति राजश्री नारायण जगन्नाथ यांचे स्वाधीन केली तर ज्या वैभवापासून ते मुक्त झालेले आहेत व जें परत मिळविण्याचा त्यांनीं दीर्घ उद्योग केला तेंच त्यांस मिळालें तर ते त्यांचे योग्यते प्रमाणें पूर्ण वैभवशाली होतील. वहिवाट घराण्यांत राहील व माझा ही चांगला फायदा होईल. या गोष्टी उघड आहेत. आतां पूर्वींच असें केलें असतें तर मला कर्जही झालें नसतें व अशा प्रकारची आपणांस विनंती करण्याचा प्रसंगही कधीं आला नसता. परंतु आपली सर्वांची उत्कट इच्छा, धोरण व फायदा हें लक्ष्यांत आणून आपणा सर्वांस संमत जो मार्ग होता त्याचें मी आपलें सर्वांचे फायद्यासाठीं अवलंबन केलें. आतां कष्टदशेमुळें प्रसंगवश होऊन माझे पूर्वींचे मनोविचार डगमगून जर माझे उपायमार्गाची दिशा आपले मता बाहेर गेली तर आपणांस विषाद उत्पन्न होईल हें खरें आहे. परंतु आपण माझ्या श्रमांच्या फलाचें पूर्णपणें सेवन करीत असतां ही जर मला श्रेय देण्या ऐवजीं कर्जांत बुडूं देत अहात तर मग तरणोपाय योजण्याचें मी सोडून दिलें तर माझी नष्टदशा होणार व तसें होणें नीट नव्हें. तरी माझी शेवटची एक अल्प आशा आहे व ह्मणूनच कळकळीनें आपणांस विनंती करितो कीं एकवार आपण सर्वांनीं एकत्र जमून या गोष्टीचा पोक्त विचार करावा. मला कर्जांतून पार पाडावें व असें झालें ह्मणजे वहिवाट मजकडेस कायम राहील असें झालें. ह्मणजे आपला जो हेतु व फायदा साधण्यासाठीं मी हा कालपर्यंत झटलो व निरंतर झटण्याची आपले आशीर्वादानें उमेद धरीत आहे त्याच हेतूवर व फायद्यावर नजर पोंहचवून तो आपण चिरकाल कायम केला असें होईल.

आतां विनंती कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसांचे आंत आपण सर्वांनीं शेंदुर्णी मुक्कामीं स्वतः येऊन अगर सदर्हू मुदतींत आपले अभिप्राय लेखी कळवून वर सांगितलेल्या गोष्टीचा पूर्ण विचार करावा. सदर्हू मुदतींत नोटीशी प्रमाणें एकत्र जमून आपला सर्वांचा एक विचार मला लेखी कळवून विनंती प्रमाणें आपण मला या प्रसंगीं मदत न कराल तर अशा समयीं मला ऋणमुक्त होण्यासाठीं जो मार्ग सुचेल ती मी स्विकारीन व कर्जमुक्त होईन. असें झाल्यावर मग आपण वृथा दोष मजवर ठेवूं नये व आपण वेळेवर सावध राहून आपली जबाबदारी नीट ओळखावी हा या नोटिशीचा उद्देश आहे. कळावें ही विनंती तारीख १ दिसेंबर १८९५ इसवी.

आपला नम्र
वासुदेव विष्णु दिक्षित जाहागीरदार प्रगणे सेंदुर्णी उत्तर भाग

## वर्तमानसार.

हैदराबादचे निजाम सरकार इंग्लंडांस खचीत जाणार असें ठरलें आहे. ह्या विलायतच्या स्वारीस निदान कोट दोन कोट रुपये उडावे असें वाटतें. हा सगळा पैसा फुकट जातो, असें आह्मांस वाटतें. ह्मणून आह्मी असें ह्मणतों कीं, आमच्या राजेरजवाड्यांनीं, राजे ह्या नात्यानें कधींही विलायतेस जाऊं नये. अगर वाटल्यास खासगी माणसाप्रमाणें थोडक्यांत तिकडे फेरी करून यावें. आज पावेतों आमचे जे राजे तिकडे जाऊन आलेआहेत, त्यांस सद्गुणांच्या संबंधानें किंवा दुसऱ्या कोणत्याही संबंधानें फायदा झालेला आह्मांस दिसत नाहीं. त्यास युरोपियन वड्या लोकांचे दुर्गुण मात्र कांहीं जडतात. ह्मणून आह्मी आमच्या राजेरजवाड्यास अशी सूचना करितों कीं, हें नवें व्यसन त्यांनीं आपणांस लावून घेऊं नयें आतां त्याच्या भोंवतीं विलायती आणि देशी मंडळी पुष्कळ असते, तिचा आग्रह तिकडे जाण्याविषयीं पडेलच. कां कीं त्यांत गाड्याबरोबर नळ्यांची यात्रा होते. परंतु आमच्या राजांनीं स्वतः आपल्या हिताहिताचा विचार पाहिला पाहिजे.

बाबू सुरेंद्रनाथ बानरजी ह्यांस पुण्याहून कोणी असें विचारिलें होतें कीं, तुह्मी सुधारकांच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होणार कीं लोकांच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होणार त्यावर त्यांनीं असें उत्तर पाठविलें आहे कीं, आह्मी कोणत्याही एका पक्षास अनुकूळ होणार नाहीं. दोन्ही पक्ष कोणत्या तरी पर्यायानें एक झाल्याचें कळलें, तरच आह्मी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होऊं, नाहीं तर आह्मांस गरज नाहीं.

पुनर्जन्म— मद्रासेस एका गांवीं एक ब्राह्मण व एक शूद्र हे दोघे एकाच वेळीं मेले. ब्राह्मणाच्या प्रेतास लोकांनीं जाळलें परंतु, त्या शुद्राची नातेवाईक मंडळी यावयास कांहीं अवकाश होता ह्मणून त्यांस कांहीं वेळ ठेविलें. परंतु मग तो हलूं लागला ह्मणून औषधोपचार केल्यावर तो चांगला जिवंत झाला. परंतु त्यांत विलक्षण हें कीं, त्याचा हा नवा जीव मेलेल्या ब्राह्मणाचा होता. कारण तो सावध झाल्यावर शुद्र मंडळींत न मिसळतां ब्राह्मणांत जाऊं लागला व मेलेल्या ब्राह्मणाचें नांव तें माझें असें ह्मणूं लागला. व लिहूं वाचूं लागला व शा, स्त्र पाठ ह्मणूं लागला. काय चमत्कार आहे पहा ! !

संगमनेर— पिसाळलेल्या कुत्र्याचे विषावर अती गुणाकारी औषध येथें भि० बळवंत गोविंद वैद्य या नांवाचे भिक्षुक यांणीं एका अवलियापासून सदर्हू औषध संपादन केलें आहे. त्याचा गुण इकडचे प्रांतांतलि पुष्कळ लोकांस आला आहे. कोणास सदर्हू औषधाची दुर्दैवानें जरूरी लागल्यास त्यांनीं सदर वैद्य यांजकडे औषधाबद्दल मागणें करावें. इं. प्र.

कान्स्टांटिनोपल ख्रिस्ती मंडळीची अलेप्पो जवळ ॲनाटेलिआमध्ये कत्तल करण्यांत आली आहे. ह्या ठिकाणीं दोनशें लोक ठार मारण्यांत आले. मार्श येथें सुद्धां पुष्कळ लोक मारले गेले आहेत.

अलॅबेनिया येथें सारखी बेबंदशाही उडाली आह व तुर्कस्थानच्या सरकारचा अधिकार कोणी मानीत नाहींसें झालें आहे.

इंग्लंडचे वकील सर फिलिपकरी हे कान्स्टांटिनोपल येथें परत गेले.

आग्रा प्रांतांतील इरादातनगर येथें दरोडेखोरांनीं एका व्यांकेवर हल्ला केला त्या वेळीं दरोडेखोर व पोलीस यांच्यामध्यें झटापट झाली. झटापटींत पुष्कळ दरोडेखोर जखमी झाले. व त्यांचा पुढारी तर अगदीं जखमी होऊन पडला होता. त्याच्या जबानी वरून सरकारास पत्ता लागूं नये ह्मणून त्याच्या सोबत्यांनीं त्याला आपल्या तरवारींनीं तोडून तोडून टाकलें. पोलीस सुपरिंटेंडेंट मि० ग्रेगुसन हे दरोडेखोरांच्या शोधांत आहेत असें शनिवारच्या स्टेटस्मनवरून कळतें. प्रभाकर

कानस्टांटिनोपल येथील युरोपियन राष्ट्रांच्या वकिलांनीं सुलतानास अशी तंबी दिली आहे कीं, जर सुलतानाकडून आर्मिनिया प्रांतांतील ख्रिश्चन लोकांचा छळ परिहार होणार नाहीं, तर ज्या प्रमाणें सर्व राष्ट्रांनीं इसवी सन १८६० मध्यें सिरियाप्रांत आपल्या ताब्यांत घेतला होता, त्याप्रमाणें ह्या प्रसंगींही हात घालून योग्य त्या उपायाची योजना करणें भाग पडेल. वरील तंबी ऐकून सुलतानाचें धाबें गडबडणें साहजिकच आहे. शिवाय कानस्टांटिनोपल हें शहर भूमध्य समुद्र व काळा समुद्र यांचें नाक्याचें ठिकाण असल्यामुळें वृकराज-रशियन सरकारचा त्या देशावर फार वर्षापासून डोळा आहेच, व त्या वृकराजानें आपल्या जन्मस्वभावानुरूप सुलतानाला आपल्या कचाट्यांत आंवळून धरण्याच्या हेतूनें काळ्या समुद्रावर आरमाराचा योग्य बंदोबस्त करून ठेवला आहे.

तुर्कस्तानच्या सुलतानाला दोन्हीकडून पंचाईत झाली आहे. ख्रिस्ती लोकांविरुद्ध आरब लोकही झाले आहेत, व त्यामुळें ते सुलतानाच्या फौजेलाही विरुद्ध झाले आहेत ख्रिस्ती लोकांना त्रास देऊं नये ह्मणून ख्रिस्ती राष्ट्रेंही उलटीं होतीं. आतां सुलतान काय करणार हें एक कोडेंच आहे.

तुर्कस्थानांतील रशियाच्या वकिलानें ख्रिस्ती लोकांच्या अर्जीला जो जाबब दिला आहे त्यांत तो स्पष्ट ह्मणतो कीं, "तुह्मास (ख्रिस्त्यांस) यूरोपांतील राजे लोक मदत करतील ही आशा व्यर्थ आहे. या उत्तरावरून रशियाचा कावा, इंग्लंडलाच फशी पाडण्याचा दिसतो. चीनजपानच्या लढाईत दूर दूर राहून, चीनपासून फायदा करून घेतला व जपानची शक्ति वाढूं दिली नाहीं. तोच प्रकार इंग्लंड व तुर्कस्थानच्या बाबतींत होण्याचा संभव दिसूं लागला. श्रीस. वि.

ऋषीवर्यांचें कूळ—शृंगऋषी हरणापासून, गौतम ससापासून, वाल्मिकी वारूळापासून, व्यास कोळणिपासून, वसिष्ठ वेश्येपासून, विश्वामित्र क्षत्रियापासून, गर्ग गाढवीपासून, मांडव्य बेडकीपासून, आगास्ति कुंभापासून, पिंगलमुनी घुबडापासून, कौशिक गवतापासून, कंककृषी चांभार, अशी मूळ उत्पत्ति आहे. परंतु ते आपले गुणानें कितीं उच्च दशेप्रत पावले आहेत ? यावरून इतकेंच ध्यावयाचें कीं कोणीही परिश्रम केल्यास तो उच्च दशेप्रत पावतो. ब्या.

हिंदुस्थानांतून दरसाल ३० कोट रुपये विलायतेस जातात त्यापैकीं एक कपर्दिकही हिंदुस्थानास परत मिळत नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांस मोठमोठ्या जागा सरकार देत नाहीं, ह्यामुळें हिंदुस्थानच्या पैशाचा लोट हिंदुस्थानांतून विलायतेकडे वहात आहे. लोकांची शस्त्रास्त्रें हिरावून घेऊन त्यांस नेभळे करून सोडलें आहे, ह्यामुळें सरकारावर परचक्र आल्यास लोकांकडून सरकारास मदत होण्याचा बिलकूल संभव नाहीं. हा परिणाम सरकारच्या प्रजेवरील अविश्वासाचा होय. मिळून जळवा लावून द्रव्य शोषणानें, अविश्वासानें आणि अति लोभानें, सरकारानें हिंदुस्थानच्या प्रजेचा शक्तिपात करण्याचा क्रम चालविला आहे तोच शेवट भोवणार!

महाबळेश्वरच्या नजीक हारोसीपा खेड्यांत फिरत रहाणारे बलुची लोकांचे टोळी पैकीं कांहीं लोकांनीं एका कुळकर्ण्याचे बायका पोरांवर हल्ला करून त्यांचे दागिने व घरांत शिरून पेट्या फोडून पेटींत असलेली रोकड व दागदागिनें मिळून आठ नवशें रुपयाचा माल लांबविला. त्यावरून पोलिसांनीं तपासांत सदर टोळींतील कांहीं लोक पकडून आणिले असून त्यांजवर येथें हु० डे० माजिस्ट्रेट यांजकडे काम चालेलें आहे.

आग्रा शहरांत ८ फूट उंचीचा एक पंजाबी गृहस्थ आला आहे, तो तेथील लोकांस मोठाच देखावा होऊन राहिला आहे पैशा करितां आपलें प्रदर्शन करून घेण्यास तो कबूल नाहीं असें ह्मणतात.

अंधारांत दिसणारे घड्याळ अमृतसर शहरांत जे सोन्याचें देऊळ आहे त्याच्या एका अंगास एक सार्वजनिक घड्याळ होतें तें निरुपयोगी झाल्यामुळें अंधारांत दिसणारें एक घड्याळ ३००० रुपये किंमतीचें एका श्रीमान व्याऱ्यानें आणून दिलें तें त्या म्युनिसिपालिटीनें पहिल्या घड्याळाच्या ठिकाणीं ठेविलें आहे असें समजतें. शु० सू०

अर्मेनियन लोकांनींच पूर्वी खोडी काढली व त्यामुळें टर्क लोकांस ख्रिस्त्यांची कत्तल करण्याचें सुरू करणें भाग झालें, याकरितां अर्मेनियन लोकांस माझी अशी सूचना आहे कीं, त्यांनीं सुरू केलेल्या नव्या पंथास युरोपियन राष्ट्रांची मदत होण्याची त्यांणीं आशा करणें व्यर्थ आहे, असें कानस्टांटिनोपल येथें असणाऱ्या रशियन वकिलानें त्या लोकांस सांगितलें आहे.

आमचें अरमारी सामर्थ्य सर्वात विशेष राखलें पाहिजे; टर्कीचें प्रकरण लौकर निकालास लागेल असें वाटत नाहीं, तरी तेथें व इतर ठिकाणीं प्रांतिक पोलिटिकल फेरफार होण्याचा संभव असल्यामुळें इंग्लंडानें अगदीं तयारींत राहाणें भाग आहे असें इंग्लंडच्या मुख्य प्रधानाचें ह्मणणें आहे. अ.

इंग्लंडच्या पोस्टखात्याच्या ९३ सालाच्या रिपोर्टांत एक माणूस टपालहशिलावरि पाठविल्याचें लिहिलें आहे. एक बाई आपला रस्ता चुकली तेव्हां उत्तर लंडनच्या स्विसकाटेज पोस्ट आफिसांत जाऊन तिनें तीन पेन्स भरले—लागलीच तिच्या बरोबर निराळा शिपाई देऊन तिच्या ठिकाणावर पोंचते करून तिच्याबद्दल पावती घेण्यांत आली! क.

सिराजगंज येथें नुकताच एक दरोडा पडून मेसर्स रॅली ब्रदर्सचे ३०,००० रुपये चोरीस गेले. हे पैसे दोन शिपाई बरोबर देऊन गाडींतून पाठविण्यांत येत होते. इतक्यांत दरोडेखोरांनीं हल्ला करून एका शिपायाला ठार मारलें आणि पैसे घेऊन ते पसार झाले.

सर्व जगांत पोर्च्युगीज राजमुकुट मोठा भपकेदार असून त्याची किंमत ३,२०,००,००० फ्रॅंक आहे. दि. बं.

## नोटीस

रा. रा. किसनसिंग व० गनुसिंग रजपूत राहणार खोलखेडे तालुके खामगांव जिल्हा अकोलें यास नोटीस देणार झामसिंग वल्लद लछुमनसिंग रजपूत राहणार खोलखेडे तालुके खामगांव जिल्हा अकोलें याजकडून असें कळविण्यांत येते कीं तुह्मास आह्मी कुलमुकत्यार नेमिलें होते त्यास आजपावेतो अजमासें अडीच वर्षें झालीं आतां आमच्या पाशीं कुलमुकत्यारीचें काम वगैरे कांहीं नाहीं याजकरितां तुमचें कुलमुकत्यारपत्र आज तारीख २८ माहे नोवेंबर पासून रद्द केलें आहे हें तुह्मांस कळावें. यापुढें तुह्मी आमच्या करिता आमच्या संबंधाचें कोणतेंच काम काढिइतकें करूं नये. केल्यास ते कोणत्याही प्रकारानें आह्मांस मान्य नाहीं. व त्याबद्दलचें नफानुकसान याजबद्दलचे आह्मी जबाबदार कोणत्याहि प्रकारानें नाहीं ह्मणून दिली नोटीस तारीख २८ माहे नोवेंबर सन १८९५ इ०

सही

सहीची निशाणी वखर झामसिंग वल्लद लछुमनसिंग रजपूत राहणार खोलखेडे तालुके खामगांव जिल्हा अकोलें याच्या हातची असे.

## जाहिरात

सर्व लोकांस या जाहिरातीनें झामसिंग वल्लद लछुमनसिंग रजपूत राहणार खोलखेडे तालुके खामगांव जिल्हे अकोले हे असे जाहीर करितात कीं आह्मी किसनसिंग वल्लद गनुसिंग रजपूत राहणार खोलखेडे तालुके खामगांव यास इतके दिवस कुलमुखत्यारीचे आमचे कामावर नेमिले होते त्यांस अजमासें आज पावेतों अडीच वर्षें झाली. आतां आमचे पाशी त्यास कुलमुक्त्यारीचें अगर दुसरें कोणतेंच काम नाहीं ह्मणून आह्मी त्यास कुलमुक्त्यारचे कामावरून दूर केलें आहे. व त्याचे नावचे कुलमुक्त्यार पत्र रद्द केले आहे. तर आमच्या करितां सदर्हू इसमाशी कोणीही कोणच्याही प्रकारची देवेघेव वगैरे करूं नये. केल्यास आह्मी त्या जबद्दलचे नफा नुकसानींचे कोणच्याही प्रकारानें जबाबदार नाहीं. ज्याचा तो आहे. ह्मणून दिली जाहिरात ही सर्वास मालूम व्हावी. कळावें. ता० २८ माहे नोवेंबर सन १८९५ इ.

[ सही ]

सहीची निशाणी वखर झामसींग वा ल छुमनसींग रजपूत राहणार खोलखेडे ता० खामगांव जि० अकोले याच्या हातची असे.

☞ हें पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ,, ३ ,, ०८
सालअखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।०३

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as.
Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 9 DECEMBER 1895 NO 47
वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ९ माहे डिसेंबर सन १८९५ इ० अंक ४७

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १९ मिसल नंबर १० / १८९५

विद्यमान सिव्हिल जडज्य साहेब जिल्हा अकोलें यांचे कोर्टांत.

नांव राधाकिसन

बापाचें नांव चंदनमल

राहणार पातूर नंदापूर तालुके आकोलें जिल्हा अकोलें यांस मयत

चंदनमल बापाचें नांव शेजराम राहणार पातूर नंदापूर तालुके आकोला जिल्हा आकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतविर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख १४ माहे दिसेंबर सन १८९५ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २९ माहे नोवेंबर सन १८९५ इ०

V. N. Dandekar.

सि० ज्यडज्य

---

जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें पन्नाबाई जवजे तुळशीराम राहणार नांदुरा ह्या असें कळवितात कीं रा. रा. माणकचंद मोतीराम श्रावगी गुमास्ते यास आह्मी मुखत्यार नेमिलें होतें त्यास अजमासें सवादोन वर्षें झालीं. आतां आह्मी त्यास मुखत्यारीचे कामावरून कमी केलें आहे हें सर्वांस कळावें. आतां आज तारखे पासून आमचे करितां सदरहू माणकचंद मोतीराम याजबरोबर कोणी देवघेव, गहाण, खरेदी वगैरे कोणच्याही प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास त्याजबद्दल आह्मी कोणच्याही प्रकारचे नफा नुकसानीचे जबाबदार नाहीं ज्याचा तो आहे. हें सर्वांस कळावें ह्मणून दिली जाहिरात तारीख ३ माहे डिसेंबर सन १८९५ इसवी.

सही

सहीची निशाणी बांगडी. पन्नाबाई जवजे तुळशीराम इच्या हातची अंस.

दस्तुर हमचंद मनालाल श्रावगी फैजपूरकर हल्लीं मु० अकोलें

दस्तुर खुद्द.

---

वि. वि. पत्रकर्ते महाराज खालीं लिहीलेल्या मजकूरास येत्या अंकीं स्थळ द्याल अशी विनंती आहे. अनादर करूं नका; कारण मजकूर सार्वजनिक आहे. थंडीचें मान जरा जास्त असून गांवांत ज्वर वगैरे बरेच आहेत

हा गांव सातपुड्याचे पायथ्याशीं एका बाजूस आहे परंतु जिल्ह्याची जागा असून शिवाय पलटण व तोफखाना आहे. व्यापारी उदमी वगैरे लोक त्या मानानें बरेच आहेत. शिवाय ब्राह्मणादि सुशिक्षीत मंडळी थोडीच का होईना पण टुमदार आहे. येथील शाळेंतील आठवी इयत्ता साल मजकूरीं बंद पडली. त्यामुळें दोन मास्तरांच्या येथून बदल्या झाल्या. उभयतां मास्तर हे सखे बंधू असून त्यांचे अडनांव सहस्त्रबुद्धे आहे दोन्ही विद्वान, लोकप्रिय व समाजास फार आवडते असे होते. लहान बंधू B. A. पदवीधर व वडील पदवीधर नसून विद्वान आहेत. वडील बंधूची बदली शिरसगांवबंड येथें सातवी इयत्ता शिकविण्याकरितां झाली व लहान बंधूची बदली उमरावती हायस्कुलांत झाली. विद्यार्थी मंडळींनीं त्यास जातांना शाळेंत पानसुपारी दिली. समारंभ फार चांगला झाला. व विद्यार्थी मंडळींनीं व गांवचे लोकांनीं फार कळकळ प्रदर्शित केली. उघडच आहे कीं सुसंगतीचा वियोग होणें फार कठीण असतें असो. परंतु उपाय नाहीं. त्यांस ईश्वर उदंड आयुष्य देवो व त्यांची भरभराट होवो अशी येथील सर्वत्र मंडळीची मनापासून इच्छा आहे.

दुसरी सार्वजनिक गोष्ट या आठवड्यांत घडली ती फार महत्वाची आहे. हिंदुलोकांची येथें बरीच वस्ती असून या गांवीं देवालय मुळींच नव्हतें, ही उणीव येथें फार दिवसांची आहे परंतु पैशांचें काम ह्मणून ती आज पर्यंत तशीच राहिली ईशदयेनें येथें एक नवीन देवालयाचें काम पुरें होऊन ता० २३-११-९५ रोजीं श्री पांडुरंगाची स्थापना जाली. स्थापनेचा समारंभ फार उत्तम प्रकारचा झाला. या कृत्यास ३।४ हजार रुपये खर्च आला व पुढें हें संपादित चालण्या करितां आणखी हजार दोन हजार रुपये पाहिजेत. हें औदार्याचें काम येथून दोन मैलावर गौलखेडे या नांवाचें गांव आहे. तेथील श्रीमान झांगुजी पाटील यांनीं केलें त्यांचे येथील लोकावर फार उपकार आहेत.

तिसरी महत्वाची गोष्ट येथें घडली तिचाही उल्लेख करणें अवश्य आहे. येथील प्रसिद्ध, सुशिक्षीत, तरूण व सार्वजनिक कामांत नेहमीं पुढाकार घेणारे वकील रा. रा. बापुराव पेंडसे आणखी येथील कांहीं सुशिक्षित मंडळी यांचें मनांतून एखाद्या चांगल्या नाटकाचा प्रयोग तयार करून तो रंगभूमीवर करून दाखविण्याचा विचार होता. हेतु इतकाच कीं नाटक कलेपासून होणारे फायदे व्हावे, नाटक कला बहूत करून अशिक्षित लोकांचे हातीं गेल्यामुळें ती लोकादरास जितकी पात्र असावी तितकी नाहीं ती समजूत अंशतः कमी होऊन आपल्यास करमणूक होऊन त्या बरोबरच इतरांस व्हावी. परंतु कोणचेंही काम घ्या, तें करूं लागलें कीं त्यांस अडचणी आहेतच, त्यांतून हें एका मनुष्याचें काम नव्हें. घरगुती व बाहेरील लोकापवाद बराच झाला; परंतु आज दोन तीन महिन्यापासून हें शिक्षणाचें काम हळूं हळूं कां होईना पण सुरू होतें. होतां होतां तो योग वर लिहिलेल्या श्रीपांडुरंगाची स्थापना झाली त्या दिवशीं घडून आला. बेत एकाएकीच ठरला. देवळाची मोकळीपण कटबंद जागा नाटका करितां मालकांनीं दिली. मोकळ्या जाग्यांत थिएटर बनविणें ह्मणजे किती प्रयासाचें काम त्यांतून अवधी काय ती सरासरी दीड दिवसाची. लहानशा आवधींत हें काम फार उत्तम तयार केलें. चोवीस घंट्यांत उत्तम थिएटर बनलें. पडदे वगैरे लावून सर्व तयारी झाली. पडदे लावण्याचें काम एलिचपूर येथील कुशल व लोकप्रिय मि. नानाजी यांनीं फार श्रम घेऊन केलें. थिएटर इतक्या लवकर व इतकें बाळसेदार करण्याचें श्रम मि० बापुराव करनल कंत्राटदार व कृष्णाजीपंत सब् ओव्हर यांस आहे. नाटक शाळेंतील रंगाचें वगैरे काम कुशल आशा दोन गृहस्थांनीं फार उत्तम प्रकारें पार पाडलें. प्रयोग श्री शिवाजी महाराजाच्या गुणोत्कर्षनामक नाटकाचा केला. प्रयोग पहाण्यास मंडळीची फारच गर्दी झाली होती. सुमारें तीनशें संभावित बायका व पांच सहाशें पुरुष मंडळी होती. बाहेरगांवच लोकही बरेच होते. एलिचपूर येथिल श्रीमान व रसिक देशपांडे मंडळी त्याच प्रमाणें नबाब साहेब वगैरे मुसलमान बडी बडी मंडळी व आंजनगांवचे कांहीं देशपांडे बडी मंडळी असा एकंदरींत भव्य समुदाय एलीचपुरास आजचा पहिलाच ह्मटला तरी चालेल. सर्व व्यवस्था, बंदोबस्त अगदीं व्यवस्थेशीर असून अव्यवस्था कोठें बिलकूल नव्हती. व्यवस्था ठेवण्याचें काम बापुराव करनल, काशीराव वगैरे मंडळी करीत होती. मंडळीना नवा व रंगभूमीवर एवढ्या समुदायापुढें येऊन काम करण्याचा प्रसंग साऱ्या जन्मांत हा पहिलाच. परंतु प्रयोग इतका प्रेक्षणीय व मार्मिक झाला कीं सर्वतो मुखीं त्याची वाहावाच झाली. खेळास आरंभ ९॥ वाजतां होऊन दीड वाजतां समाप्त झाला. परंतु वेळ केव्हां निघून गेला समजलें नाहीं.

प्रथम खेळाची सुरुवात होण्याच्या पूर्वी रा. सदाशिवराव दामले यांनीं देवळा संबंधीं थोडीशी हकीकत सांगितली नंतर रा. कृष्णाजी धोंडो ओव्हर शियर यांनीं थोडेसें समयास अनुरूप व चटकदार असें भाषण केलें त्याचा सारांश असाः— ते ह्मणालें रा. रा. बापुराव वकील व इतर मंडळी यांणीं जो हा निरपेक्ष बुद्धीनें आपले बरोबर इतरासही करमणुकीचा योग घडवून आणला त्या बद्दल मी त्या मित्र मंडळींचे सर्वातर्फे आभार मानतो. नाटक प्रयोग आपले इकडे बहूत करून ज्यास दुसरा उद्योग धंदा करून पोट भरण्याचें साधन नाहीं असे उनाड, व्यसनी व अशिक्षीत लोक करीत आल्यामुळें तें कृत्य व त्यांतील लोक लोकांचे आदरास पात्र नाहींत. एखादी स्त्री उत्तम गाणारी आहे परंतु ती जर वेश्या असली तर या उत्तम कलेचा लोक आनादर करितात तशीच वरील गोष्ट होय. परंतु इतर देशांत अशी गोष्ट नाहीं. सुदैवें करून अलीकडे आपल्या लोकांतही हा प्रकार हळू हळू बंद पडून तो सुशिक्षित लोकांचे हातीं जाऊं लागला आहे त्यामुळें तो उत्तरोतर लोकादरास जास्त पात्र होत जाईल. असें सांगून प्रेक्षक लोकांचे आभार मानून नाटकास सुरुवात झाली एकंदरींत प्रयोग फार चांगला वठला. त्यांतून शिवाजीचें काम त्या पात्रास जसें हवें तसें झालें, गणपतरावाचें पात्र ह्मणजे केवळ स्वार्थी, दुराचारी, कपटी, बेमान व आंतल्या आंत कळ लावून पुन्हां कशांत कांहीं नाहीं, हें काम वठविणें फार कठीण, पण फारच उत्तम प्रकारें झालें. जिवाजीपंताचें काम ह्मणजे निःसीम स्वराजभक्त, दिसण्यांत वृद्धपण मर्द, भोळा पण उघड फसणारा नव्हे, नितीमान असून तापट परंतु कोणाचे दुष्टपणानें नुकसान करणारा नव्हे. हें काम करणें सोपें नव्हें परंतु या पात्रानें बहार तर केली. संभाजीचें पात्र ह्मणजे जवान मर्द परंतु कुसंगतीनें बिघडलेला परस्त्री राधा इच्या पाशांत पापवासनेनें पडलेला, हाडाचा चांगुलपणा वेळोवेळीं व्यक्त होत असून कुसंगतीनें मनुष्य कसा बिघडतो याचें हें एक चित्र आहे. या पात्रानें अगदीं शिकस्त करून दिली. असो सुशिक्षित लोकांनीं केलेलें नाटक व त्याचे उलट प्रकार यांचा अनुभव लोकांस चांगला कळून आला व जनसमाजावर त्याचा ठसा चांगला उमटला. हा फायदा लहान नव्हे. असो पत्रविस्तार फार झाला या बद्दल माफी असावी. कळवें. ही विनंती.

आपला

नाटकास गेलेला प्रेक्षक.

परतवाडा ता० २७।११।९५

---

ता० ३०।१०।९५ रोजीं वाशीम येथील मुलीच्या शाळेंत डे० कमिशनर साहेब बहादुर हे शाळा पाहण्या करितां आले शाळेतील मुलींची व्यवस्था आणि टापटीप व अभ्यास वगैरे पाहून साहेब खुप झाले. हेडमास्तर रा. नारायणराव मारकंडे यांनीं शाळेला मुलीना बसण्या करितां बेंचाची उणीव आहे असें सुचविल्यावरून साहेब बहादूर यांनीं स्वतः पांच रुपये दिले व स्कूल कमेटींतील मेंबरांनीं १९ रुपये वर्गणीनें जमवून दिले वर्गणी देणारांचीं नांवें.

५ मे. डे. कमिशनर साहेब बहादूर

२ मे. अनवरअलीखां साहेब ए. अ. क. व स्कूल कमेटीचे प्रेसिडेंट

१ मे. आमदअल्लीखां साहेब स्कूल कमिटीचे मेंबर

१ रा. रा. शेषराव रघुनाथ वकील स्कूल कमिटीचे मेंबर

१ रा. रा. विनायकराव गोखले वकाली स्कूल कमिटीचे मेंबर

१ रा. रा. यशवंतराव दिघे वकील स्कूल कमिटीचे मेंबर

२०

वर दिलेल्या वर्गणी शिवाय रा. रा. विनायकराव गोखले वकील यांनीं १ रुपयाची पुस्तकें मुलींना इनाम दिलीं व शेषरावजी वकील यांनीं ८४ आण्याची मिठाई मुलींना वाटली.

---

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य ९ शके १८१७

सामाजिक परिषदे संबधानें लोकमत विविध आहे. कित्येकांस ती संस्थाच नको, कांहीं जणांस ती संस्था पाहिजे पण वरच्या सुधारणामध्यें सरकारचा हात नको, आणि कांहींजणांस ही संस्था पाहिजे असून सरकारच्या मदतीनें देखील सुधारणा अंमलांत आणणें भाग पडलें तरी माघार घेऊं नये. सर्व राष्ट्र सुधारणेला अनुकूळ आहे व कालगतीच्या व वस्तुस्थितीच्या आनुकूल्या प्रमाणें सुधारणा लोक यथाशक्ती करीतही आहेत. सामाजिक सुधारणा कोणत्या द्वारानें कराव्या या विषयीं प्रश्न आहे. सामाजिक परिषद् ही संस्था राष्ट्रांचें एक द्वार आहे. त्या द्वाराच्या योगानें आपापले मनोगत विचार सर्व राष्ट्रवाले एकमेकांस आज ७।८ वर्षे कळवीत आले. हा काल लोकमताच्या प्राबल्याचा आहे तेव्हां सामाजिक परिषदेचें जहाज न बुडवितां सर्व राष्ट्रवाले लोक सुरक्षितपणें सुधारणेच्या बंदरांत पोचतील अशी मुख्य नायकांनीं व्यवस्था ठेविली पाहिजे. ही व्यवस्था लोकमताच्या दिशेनें होत गेली पाहिजे. लोकमताला झुगारून देण्याचा प्रयत्न न झाला ह्मणजे सार्वजनिक संस्थेला कधीं धक्का पोंचत नाहीं.

---

अकोल्यास अलीकडे पाण्या संबधानें बरीच ओरडा ओरड चाललेली आहे. इकडे गांवांतून नळ टाकण्याचें काम तर झपाट्यानें सुरूं आहे व यंदा पाणी लवकरच बंद होणार ही बातमी गांवांत पसरल्यामुळें सर्व लोक फिकीरींत असून झपाट्यानें चाललेल्या खटाटोपीचा आचंबा करीत आहेत. लाखो रुपयांचा खर्च झाला. कापशी येथील विहिरींची तपासणी झाली. त्यांतील पाणी सर्व गांवास पुरून उरेल असें भूगर्भवेत्यांचे अभिप्राय पडले. उत्तम पाणी पिण्यास यथेच्छ मिळणार या आशेनें लोक मोठा आनंद मानूं लागले. जो तो नदीचें पाणी गढूळ व रोगकारक ह्मणून त्याचा धिःकार करूं लागला. सर्वतो मुखीं नळाचे पाण्याची प्रशंसा होऊं ... पाणी बंद होईल करितां ज्यांच्या विहिरी गोड्या पाण्याच्या आहेत त्यांनीं त्यांतील गाळ वगैरे काढवून स्वच्छ ठेवाव्या अशी जाहीर खबर जेव्हां लोकांस मिळाली तेव्हां पासून सर्वांचे मनांत फारच दहशत उभी राहिली आहे. लोकांचें ह्मणणें कीं हा वेळपर्यंत पाणी पुष्कळ आहे. तें लोकांस पुरून उरेल, असा समज उत्पन्न करवून नुकतेंच त्याची कमतरता भासविण्याचा मतलब अथवा अर्थ काय असावा! ज्या वेळेस कापशीच्या विहिरींची तपासणी झाली व जेव्हां तेथील पाणी अकोल्यास आणण्याचा घाट घालून पुढील खर्च केला त्या वेळची स्थिति व हल्लींची स्थिति यांत महदंतर असें कोणतें पडलें? त्या वेळेस पाण्याचे झरे कसे व किती आहेत हें नीट लक्ष्य देऊन पाहिलें असेलच. झऱ्याचा उगम, त्यांची गति, प्रवाह व बाहुल्य यांचें समाण मापही घेतलें असेलच. लोकसंख्या व प्रत्येक इसमास अवश्य लागणारे पाणी यांचें सयुक्तिक प्रमाण बांधून एकंदर लागणाऱ्या पाण्याचें शास्त्रसिद्ध अनुमान काढलें असेलच. अगाऊ अशा प्रकारच्या खटपटी व सूक्ष्म योजना झाल्याविना धोरणी व विचारी सरकार खर्चाचे कामास हात घालीत नाहीं. या कामांत हुषार, अनुभविक, योग्य व खात्रीलायक अशाच पुरुषांचीं विधानें सरकारनें प्रथम संपादिलीं पाहिजेत व तशीच गोष्ट या संबंधानें मूळ घडली असेल. यांत संदेह नाहीं. असें असतांनां ही मग असें घोडें घावरतें कां? हा प्रश्न खरोखरच विचार करण्या सारखा आहे. या प्रश्नाचा योग्य विचार सरकारा वांचून इतर आह्मा रयत लोकांस करता येण्या जोगा नाहीं. अकोलें येथील प्रसिद्ध, हुषार दक्ष, व कळकळीनें काम करणोर लोकप्रिय डेपुटी कमिशनर साहेब मेहेरबान हेअर हे या गोष्टींत पूर्णपणें मन घालून पाण्याच्या निर्धनतेचें मूळ निदान शोधून काढल्यावांचून कदापि राहणार नाहींत अशी आह्मांस खात्री आहे. त्यांचे श्रमांस यश येऊन या कामीं कांहीं तरी सयुक्तिक व हितकारक कल्पना उद्भवास येऊन तिचें प्रत्यंतर लोकांस तत्काळ मिळेल अशी आमची दृढ आशा आहे. असेंही कळतें कीं मेहरबान हेअर साहेब याच गोष्टीचा विचार करण्याची खटपट जारीनें करीत आहेत.

---

सन १८९४-९५ सालचा वऱ्हाडचा रेविन्यु अडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला. त्यांतील मुख्य मुख्य गोष्टींचा गोषवारा देण्याचा आमचा इरादा आहे.

या प्रांतांत एकंदर ६६८२ गांवें आहेत. मेळघाट परगणा सोडून बाकीच्या प्रांतांची सरासरी एक कोटी तीन लक्ष एकर जमीन आहे. यांत सोळा लक्ष त्र्यांयशी हजार नउशे एकतीस एकर [ ह्मणजे सरासरी १७ लक्ष ] जंगल आहे. जीवर सरकार सारा असून शेतकीचे उपयोगी पडणारी आहे अशी जमीन सरासरी ८० लक्ष एकर आहे. या पैकीं फक्त ७५ लक्ष एकर मात्र वहीतीस लोकांनीं घेतली आहे. मागच्या सालपेक्षां ज्यास्त जमीन रिपोर्टाचे सालीं वहीतीस आली. याहीपेक्षां ज्यास्त जमीन वहीतीस आली असती परंतु वणी जिल्ह्यांत एकामागून एक नापिक जमीन झाल्यामुळें शेतकऱ्यास शेतें सांडावीं लागलीं. वणी व वाशीम या दोन जिल्ह्यांतच अशा प्रकारें शेतीची जमीन वहीतीस न घेतलेली पुष्कळ आढळते.

एकंदर ७५ लाख एकर जमीनीपैकीं फक्त ६७॥ लाख एकर जमीनींत पीक आलें. जवारी व कापूस हेच दोन मुख्य या प्रांताच पेरे होत. जवारीच्या पेऱ्याचें प्रमाण शेकडा ३६-४ आहे. कपाशी व्हावी तशी मुळींच झाली नाहीं. जवसही त्याच प्रमाणें रब्बी पेक्षां खरीप ठीक होतें. ५॥ लाख एकर जमीनींत निवळ गवतच उगवलें होतें. शेतकरी लोक सरकारांत जमीनीचा सारा भरून देखील ते पडीत पडूं देतात व त्यांत गवत उगवतें व त्यामुळें वर लिहिल्या प्रमाणें गवताळ जमीन राहते याचें कारण दोन प्रकारचें असावें. एक तर गुरासाठीं चारा कमी असल्यामुळें अशीं शेतें ठेवावीं लागत असतील अगर रयत अगदी भिकार रंक झाली असून तीस शेत वहीतींत आणण्याची ऐपत राहिली नसेल. सरकारास दुसरें कारण तर मुळींच सयुक्तिक दिसत नाहीं. पहिल्या करण्याचा अदमासच तूर्त करतां येत नाहीं.

अजून पर्यंत साऱ्याचे पंधरा पासून १९ पटी पर्यंत शेतें विकलीं जातात. व अकोलें जिल्ह्यांत तर याही पेक्षां ज्यास्त किंमत येते.

देवी, पटकी व इन्फ्लुएनझा तार यांचा आजार प्रांतभर पसरला होता. त्यांत अकोला व उमरावती जिल्ह्यांत इन्फुएनझाचा मनस्वी त्रास झाला. गुरे चरण्यासाठीं जमीन एकंदर १८ लक्ष एकर आहे. त्यांत प्रमाण काढलें असतां प्रत्येक ढोरास ३२ गुंठे जमीन चरण्यास मिळते.

साऱ्याची बाकी रयतेकडे थकल्यामुळें सरकारास तो वसूल करण्याकरितां या सालीं ज्यास्त उपाय योजावे लागले. ११९६ इसमांकडे सारा थकला होता. १४०११ जंगम मालावर जप्त्या कराव्या लागल्या त्या पैकीं अखेर जप्त्या १०९७ झाल्या. पैकीं ४६ प्रकरणांत विक्री झाली. ७७२ शेतांच्या विक्रीचे हुकूम झाले होते त्यांतून फक्त २९८ शेतेंच विकलीं गेलीं विकलेल्या शेतांचें क्षेत्रफळ ६१५२ एकर १० गुंठे असून त्यांचा सारा ३१३७ रुपये ४ आणे ९ पै होता व त्यांची विक्रीची रकम रुपये ५९३२८१५८६ आली.

वतना प्रीत्यर्थ ४ लक्ष ८० हजार एकर जमीन लावलेली असून तिचा सारा सरासरी २ लक्ष ७८ हजार रुपये आहे. त्यांतून सरकार स्वामित्वाचे सरासरी ३५ हजार काढून घेऊन बाकीचे वतनदारांस देते. त्यांत वंशपरंपराचे वतनदारास १ लक्ष ३५ हजार रुपये सालिना मिळतात.

अकोले जिल्ह्यांत पाटील व पटवारी लोकांवर कहर उडाला. बऱ्याच इसमांस कामावरून दूर केले व दंड ही केले. या सर्वांचे कारण त्यांचा आळस व निष्काळजीपणा होय. व हा निष्काळजीपणा विशेषेकरून वरळ्यांच्या दुरुस्तींत व देखरेखींत फार दिसून आला. या सालीं कोर्टमार्फत हुकुमनामे होऊन एकंदर ५५३७ एकर जमीनीची विक्री झाली. खाजगत विक्री १ लक्ष १३ हजार ६७१ एकर जमीनीची झाली. व साऱ्याची बाकी थकली ह्मणून ती भरून काढण्यासाठीं ६१३८ एकर जमिनीची विक्री झाली. एकूण सरासरी १ लक्ष २५ हजार एकर जमीन विकली गली.

अकोले येथील डेपुटी कमिशनर साहेबांच मतें शेतकऱ्यांची स्थिती फार निनिकृष्ट दशेस येऊन पोहचल्या बद्दलची आहे. तरी पण भांडखोरपणा जास्त बळावत चालला असून साऱ्याची रकम अगाऊ भरण्याची हिंमत लोकांमध्यें बरीच आहे.

मे. हेअर साहेबांचे ह्मणणें आहे कीं कुणबी लोक हे निष्काळजी व आळशी आहत. स्वतः अंगमेहनत करण्याच ते सोडून देऊन त्यांस मजुरांच्या हातून काम करून घेण्याची हौस आहे. शेत पिको अथवा न पिको शेतकरी अंररावा सारखा काडीनें रवा ओढूं पहातो. हातांत विळा अगर खुरपें घेऊन प्रत्यक्ष निंदण खुरपण करण्याचे जिवावर येतें. कुणब्याचा असा ओंगळ आळशी स्वभाव असल्यामुळें अर्थातच त्यांची असावीं तशी स्थिति मुळींच नाहीं. मजुरांस रोजमुरा देण्यास घरांत धुंडून काढलें तरी कवडी सांपडत नाहीं मग शेताची किस्तगारी होते कसची व पिकानें रडावें काय! अशा प्रकारचा जेथें आनंद आहे तेथें शेत पिकत नाहीं ह्मणून आक्रोश करणें हें वृथा आहे.

सरकारची खात्री होऊं लागली आहे कीं कोर्टाचा स्थावर मिळकती संबधानें एकदा हुकूमनामा झाला ह्मणजे त्याचें उत्तर कार्य ३२ प्रकर्णांत होतें. व हे बत्तीस प्रकर्णांचें काम तहशिलदारांकडे सोपविलें जाऊन फार ढिलाईचे चालल्यामुळें अतोनात उशीर लागून रयतेस त्रास भागावा लागतो.

---

## The Berar Samachar

MONDAY DECEMBER 9, 1895

All that could be wished for about an Indian National Social Conference may be said to have been accomplished. At least for this year respect has been shown to the general feeling and the Secretaries have also issued a circular letter addressed to the various Reform Associations calling on them to render an account of whatever they may have done during the past year towards the furtherance of their object. Time has now arrived when the deliberations of this body can be confined only to members of the local social-reform associations and to those whose sympathies in matters of social reform are already well-known or the delegates appointed by such sympathisers. The managers seeing to think that the conference-movement has now passed an early stage of existence have decided that the delegates appointed must be interested in the matter or at least in the discussions and deliberations. Certainly this is a wise step. If the plan now proposed be carried out all misrepresentations will be cleared off. The charge against the Conference that it misrepresents public opinion and twists it so as to suit it to its own hobby will now have no room. Henceforth it will exist only with a mutually binding force and for the sake of those members who are avowedly for it. This explanation easily suggested by the circulars themselves must lull to silence all hostility against it. The resolutions passed by the ensuing Social Con-

ference will go forth as the expression of the opinions shared by the sympathisers and the members of the Association for Reform in India. But it remains to be seen whether the delegates nominated are appointed by the various local Reform associations established all over the country after a due consideration of the letter and spirit of the circulars issued by the distinguished Secretaries—the glory of our nation. Any deviation from the object of the circular may be laid to the charge of the associations themselves and not to that of the managers. It is they who err and mislead the singleness of eye, the fearlessness and the rectitude of purpose of the learned Secretaries. Hardly a sensible man can now quarrel with the Social Conference. It will henceforth be an annual gathering of the workers and supporters of the cause of social reform. There is at least no attempt either at deception or at misrepresentation. Every one is at perfect liberty to form any such associations either for furthering or for retarding progress. The greatest objection against such associations is that they seek the government-interference; and if they cry for State-aid their cry cannot be mistaken now. It will be evidently as one coming forth from a particular body of public men.

The Conference—Committee gives a list of subjects to be brought for discussion before the coming conference to be held at Poona in a pandal distinct from that of the National Congress. The limited space at our disposal prevents us from doing more than indicating the proposed line of reform. But this has already been given in a previous issue and there is no necessity for repeating it.

News have been received of the transfer of Mr. A. L. P. Tucker I. C. S. First Assistant to the Resident at Hyderabad to the post of Political Agent, Haravati and Tok. Mr. Tucker held charge of the First Assistantship since his return from furlough in 1893. Before he proceeded on leave he was First Assistant to the Agent to the Governor General in Central India. His work is precise and is rigidly just. We congratulate him on his elevation and we wish him to watch, as vigilantly as he has ever done, the interests of the Native Chiefs whose adviser he has been called upon to be.

The theory of evolution is now a doctrine generally accepted. It had however a crusade against the old crude ideas before it was firmly established. Sir Douglas Galton the most eminent professor of science of the present century has eloquently described the successive phases the theory has undergone. We give below the main portion of his learned leacture on the point:—

"The impulse given by Darwin had been fruitful in leading others to consider whether the same principle of evolution may not have governed the moral as well as the material progress of the human race. Mr. Kidd had told us that nature as interpreted by the struggle for life contains no sanction for the moral progress of the individual, and pointed out that if each of us were allowed by the conditions of life to follow his own inclination the average of each generation would distinctly deteriorate from that of the preceding one; but because the law of life was ceaseless and inevitable struggle and competition, ceaseless and inevitable selection and rejection, the result was necessarily ceaseless and inevitable progress, Evolution, as Sir William Flower said, was the message which biology had sent to help us on with some of the problems of human life, and Francis Galton urged that man, the foremost outcome of the aweful mystery of evolution, should realise that he has the power of shaping the course of future humanity by using his intelligence to discover and expedate the changes which are necessary to adapt circumstances to man and man to circumstances. In considering the evolution of the human race, the science of preventive medicine afforded us some indication of the direction in which to seek for social improvement.

Preventive medicine required a knowledge of the details of the previous conditions of life and of occupation. Moreover, death was not our only or most dangerous enemy, and the main object of preventive medicine was to ward off disease. Disease of body lowered our useful energy. Disease of body or of mind might stamp its course on succeeding generations. The anthropometric laboratory afforded to the student of anthropology a means of analysing the cause of weakness, not only in bodily, but also in mental life. Mental actions were indicated by movements and their results. Such signs were capable of record, and modern physiology had shown that bodily movements correspond to action in nerve centres, as surely as the motions of the telegraph indicator expressed the movements of the operator's hands in the distant office.

Thus there was a relation between a defective status in brain power and defects in the proportioning of the body. Defects in physiognomical details too finely graded to be measured with instruments might be appreciated with accuracy by the sense of the observer, and the records showed that these defects were in a large degree associated with a brain status lower than the average in mental power."

## वऱ्हाड

हवामान— थंडी बरीच चमकूं लागली आहे रब्बीचीं पिकें पावसाच्या कमताईमुळें चांगल्या स्थितींत नाहींत. परंतु एखादा पाऊस पडल्यास हीं उत्तम येतील असा अदमास आहे. गांवांत ताप वगैरे दुखणीं वळावलीं आहेत

येथें दरसाल प्रमाणें महारांचा भेळा या आठवड्यांत भरला होता. सुमारें ५००।६०० महार जमले होते. मि० जानू महार यांच्या दीर्घ परिश्रमाचें हें फळ आहे.

क्यापटन आयव्हर्स ८ दिवसांच्या रजेवर आजपासून गेले असून परत आल्या नंतर ते जिल्ह्यांत फिरण्यास जाणार आहेत.

गेल्या वकीलाच्या परिक्षेंत हैदराबाद रेसिडेन्सी कडील कोणीच उमेदवार पसार झाला नाहीं.

मि० गालेवे पोलीस सुपरीनटेंडेन्ट, वाशीम हे येत्या १९ वे तारखे पासून ३ महिन्याच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत. आणि त्यांच्या रजेंत मि० सुवेल असि० पोलिस सुपरिन्टन्डेंट यांस पोलिस सुपरिनटेन्डेंट नेमण्यांत आलें आहे.

काल सायंकाळीं राष्ट्रीय सभेला धाडावयाचे प्रतिनिधी निवडण्या साठीं जाहीरसभा भरली होती आणि सर्वानुमतें ५०।५१ लोकांची निवडणूक झाली.

मि० अजिमुद्दीन असि० कमिशनर हे औरंगाबाद छावणीस माजिस्ट्रेटी चालविण्यासाठीं उमरावतीहून गेले. अकोल्या प्रमाणेंच उमरावतीस असतांना हे बहुतजणांस अप्रिय झाले होते.

क्या० हेग असि० लांड डायेरक्टर यांची पुन्हा बदली यवतमाळास असि० कमिशनरचे जागीं झाली.

रा० रा० गोविंदराज अय्या ए० असि० कमिशनर यांस वाशिम जिल्ह्यांत पांच हजारा वरील सर्व दावे चालविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे.

मि० हेअर डेपुटी कामिशनर हे बाळापूर तालुक्यांत फिरण्यास गेले आहेत. तारीख २३ च्या सुमारास परत अकोल्यास येणार आहेत.

मि० बुलक कमिशनर साहेब यांची स्वारी प्रांतांत फिरण्यास निघाली असून कारंजा मार्गानें वाशीमाकडे जाऊन नंतर नाताळाच्या सुटीला उमरावतीस परत जाणार आहे.

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥।- |
| ५ ,, दिवसांच्या मुदतीची | | | ९९॥- |
| सुवर्ण | २८ | रुपें | १०० |
| मीठ | ३॥।= | आळशी | ९८ |
| गहू काठ ५९ | | सर्की | ४॥। |
| तूप | ८॥। | तेल | ६॥ |
| चणे | ६० | तीळ | ९५ |
| कपाशी ४६।५१ | गावराणी | रुई | ६१ |

सट्याचे भाव.

| | |
|---|---|
| जवारी फाल्गुन शुद्ध १५ | ४८॥। |
| रुई फाल्गुन शुद्ध १५ | ६५ |
| आळशी वैशाख शुद्ध १५ | ९८॥।= |
| गहू वैशाख शुद्ध १५ | ६४८= |

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सराटिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्लास १५ मिसल नंबर ११/१८९५

विद्यमान सिव्हिल जड्ज्य साहेब जिल्हा अकोलें यांचे कोर्टांत.

नांव मारुती व किसन अ० पा० करणार आई सगी मर्द कडतु मयत तर्फे इस्ट मित्र नात्यानें पालन करणार बहिण कौतीका मर्द विठोबा.

राहणार सानाळ तालुके जळगांव जिल्हा अकोलें यांस मयत

कडतु वल्हद परताब वसजी मर्द कडतु राहणार सोनाळ ता. जळगांव जिल्हा आकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतविर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २१ माहे दिसेंबर सन १८९५ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ३ माहे डिसेंबर सन १८९५ इ०

V. N. Dandekar.

सि० ज्यडज्य

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकेट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि० कि० मु० नंबर १२/१८९५ वर्ग १५

दिपुटी कामिशनर साहेब इलिचपूर यांचे कोर्टांत

नांव— भागाबाई

मर्द— माधोजी कुणबी

रहाणार— धनवाडी तालुके दर्यापूर

जिल्हा— इलिचपूर यांस मयत

माधोजी बापाचें नांव भिकाजी रहाणार धनवाडी तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २० माहे दिसेंबर सन १८९५ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

ता० २५ माहे नोवेंबर सन १८९५ इ०

H. Godwin Austen

Deputy Commissioner

Ellichpur District

## वर्तमानसार.

ब्रेझिलमध्यें अति मोठा हिरा सांपडला आहे. वजन ३१०० क्यारट आहे, त्याची किंमत ४०००० पौंड आहे.

मारसेल्स पासून सेंटपेरी पर्यंत वाफेची गाडी केली आहे तींत विस्तव मुळींच नसतो.

मादिद, येथ्या जानेवारीमध्यें स्पॅनिश सरकार दहा हजार लष्करी लोक क्युबा येथें पाठविणार आहे. प्रभा०

पेन्सिल्वेनिया येथें एक जंगी इंजिन तयार करण्यांत आलें आहे. एक मैल लांबीची रेलवेट्रेन तें सहज ओढूं शकतें.

कलकत्यास एक पाद्री तरुण मनुष्य, एका ह्मातान्या हिंदूशीं वाद करीत असतां रागाऊन त्यानें ह्मातान्यास ठार केलें.

अमेरिकेंत, घोड्याच्या बदला विजेच्या गाड्या फार चालतात. त्यामुळें कमींत कमी पांच लक्ष घोड्यांचा खप कमी झाला आहे.

फार प्राचीन काळच्या बाबीलान शहरच्या खिंडाऱ्यांत ४०० हिरे सांपडले आहेत. त्यांत कांहीं हिरे मुळींच साफ न केलेले असे आहेत.

इजिप्पांत अशी एक मंडळी स्थापन झाल्याचें कळतें कीं, त्या देशांत नवीन वसाहत करणारांनां हाकून लावण्याचा त्यांनीं प्रयत्न करावयाचा तर मग इंग्रजांचे कसें होईल.

---

नोटीस

रा. रा. माणकचंद मोतीराम श्रावगी गुमास्त निसबत पन्नाबाई जवजे तुळशीराम राहणार नांदुरा तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणा. यांस नोटीस देणार पन्नाबाई जवजे तुळशीराम राहणार नांदुरा; नोटिशीनें असें कळविलें जातें कीं तुह्मास आह्मी मुखत्यारपत्र देऊन अजमासे सव्वादोन वर्षे झालीं. मुखत्यारीचें काम तुह्मी आजपावेतों करीत आला आतां आह्मास तुमचे कडून मुखत्यारीचें काम घेणें नाहीं व आपलें मुखत्यारपत्र आजतारखे पासून आह्मी रद्द केलें आहे तर आपण यापुढे आमचे मुखत्यारीचें काम कोणच्याही प्रकारचें करूं नये. तुह्मास मुखत्यार नेमिल्यापासून आजपर्यंत जें काम तुह्मी केलें तें सर्व आमचें आह्मास या नोटीशी पासून पंधरा दिवसांत बरोबर समजून द्यावें. आमचे दागिने, रोकड वह्या दस्तैवज वगैरे जे काय असल ते आणून देऊन पावती घ्यावी. असें केलें नाहीं तर रीती प्रमाणें तुमचेवर काम चालवून ह्या नोटिशीच्या व इतर सर्व खर्च जो निकाल होईपर्यंत होईल तो सर्व भरून घेतला जाईल ह्मणून दिल्ही नोटीस तारीख ३ माहे डिसेंबर सन १८९५ इ.

सही

सहीची निशाणी बांगडी. पन्नाबाई जवजे तुळशीराम इच्या हातची असे.
दस्तुर हेमचंद मनालाल श्रावगी फैजपूरकर हल्लीं मु० अकोलें
दस्तुर खुद्द.

## नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं सन १८८९ चा अक्ट ८ कलम १० प्रमाणें.

अर्जाचा नंबर क्लास १३ मिसल नंबर ४/१८९५

विद्यमान सि० जज्ज सा० जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार मे० डेपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हा अकोला

अज्ञान गोपालदास नानकराम जात अगरवाले राहणार खामगांव ता० खामगांव जिल्हा अकोले याणें (याचें पालन व मालमिळतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून) अर्ज दिला आहे. यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून, किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखाने कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं तारीख १४ माहे डिसेंबर सन १८९५ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकिगत दाखल करावी. तारीख ३० माहे नोवेंबर सन १८९५ इसवी.

V. N. Dandekar.
सि० जज्ज

---

कि. क्लास नंबर १३ मिसल नंबर ४/९५

फैल ता० २३।११।९५

दि० क्लास १३ मिसल नंबर ४/१८९५

विद्यमान सिव्हिल ज्यडज्य साहेब जि० आकोले.

अज्ञान गोपालदास नानकराम करितां अर्जदार मे. दि. क. साहेब बहादूर जि० आकोले.

अज्ञानाचे व त्याचें शरिराचे पालन करणे बद्दल अर्ज.

[ अ ] अज्ञान गोपालदास नानकराम अगरवाले उमर वर्षे सहा खामगांव येथें राहत आहे.

[ ब ] मुलगा असून लग्न झाले नाहीं.

[ क ] आज्ञान हा खामगांव येथें राहत असान त्याची जिनगी खामगांव व इतर ठिकाणी आहे.

[ ड ] तूर्त करितां अज्ञानाची इस्टेट हुजूर नाजर जिल्हे आकोले यांचे ताब्यांत असोन अज्ञान हा त्याचा मामा रामदयाल तिलोकचंद याजपाशी आहे.

[ ई ] अज्ञानाचे जवळचे नातलग ह्मणजे त्याचा चुलता बालमुकुंद संतुकलाल हा गोन्हापूर तालुके मलकापूर येथें राहत आहे व चुलत बंधु कनुलाल आणि राधाकिसन वल्लद केशोलाल आणि मामा रामदयाल तिलोकचंद हे खामगांव येथें राहत आहेत.

[ फ ] मुकदम्याचे काम चालविण्याकरितां फक्त मुकदम्या पुरते हुजूर नाझर जिल्हे आकोलें यास अज्ञानानाचे पालन करणारे नेमले होते.

[ जी ] अज्ञानाचे शरिराचे व त्याची इस्टेटीचे गारडीयन नमण्याकरितां आजवर कोणतेच कोर्टांत अर्ज वगैरे केला नाहीं.

[ यच ] अज्ञानाचे शरिराचे व त्याचे इस्टेटीचे योग्य प्रकारे पालन व्हावे ह्मणून गारडीयन नेमण्याकरितां अर्ज आहे.

[ आय ] गारडीयन नेमणे तो कोर्टानी कोणीही इसम खात्री लायक नेमावा.

[ जे ] हल्लीं कोणी गारडीयन नाहीं.

[ के ] अज्ञानानाचें शरिराचे व त्याची स्टेटीचे योग्य प्रकारे पालण व्हावें या शिवाय दुसरे कारण नाहीं.

[ यल ] वरील मजकुरा शिवाय दुसरे कांहींएक कारण नसून फक्त गारडीयन लौकर नेमला जावा व इस्टेटीची व्यवस्था होणे आहे.

येणें प्रमाणें हकिगत कळवून अर्ज करितों कीं अज्ञानानाचे शरिराचे व तसेंच इस्टेटीच व अज्ञानाचे अभ्यासाची वगैरेची बद्दल व्यवस्था ठवण्या करितां कोर्टास वाटेल तो योग्य इसम नेमण्या विषयीं तजवीज होईलच अज्ञानानाचे हिश्यास आलेली इस्टेट तूर्त करितां हुजूर नाझर जिल्हे आकोले याचे ताब्यांत आहे. ता.

V. N. Dandekar
For Deputy Commissioner
12—11—95
खरी नक्कल
Tukaram Waman
शिरस्तेदार.

दि० मु० नंबर ४४ कोर्ट मे. सिव्हील/९०

ज्यडज्य साहेब बहादूर जिल्हे आकोले यातील आज्ञान गोपालदास नानकराम दुकान खामगांव याचे इस्टेटीची वाटणी होऊन अज्ञानानाचे हिशास आलेले जिंदगानी बद्दल यादी.

स्थावर माल शेत.

| क्रमांक नं. | गावचें नांव | शेत सर्वे नं. | एकर गुंठें | | आकार रुपये | | अंदाज किंमत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कंझर | १३९ | ३६ | १६ | १८ | ० | ७०० | |
| २ | जनुन | १४६ | १ | १२ | ४ | ० | १०० | |
| ३ | पहूर | ३३४ | १५ | ३९ | ७ | ० | २०० | |
| ४ | पहूर | ९६ | ३९ | ३१ | १६ | ० | १२८ | |
| ५ | लासूरपे. | २१ | ७ | ३२ | १० | ० | २०० | |
| ६ | किन्ही | ८४ | १४ | १९ | ३ | ८ | ५० | |
| ७ | पहूर | ३३ | | ३६ | २ | २ | १०० | |
| ८ | पहूर | ६४ | ७ | ३९ | १२ | ० | १२५ | |
| ९ | कंझर | :१९ | ० | ३७ | | ८ | ५० | |
| १० | जनुन | १७७ | १४ | ९ | ८ | | १०० | |
| ११ | खामगांव | १०४ | १ | ३२ | १ | ४ | २५ | |
| १२ | सदहू | १८२ | २ | ५ | २ | | ३० | |
| १३ | नायबी | ३९ | १५ | १९ | ४ | ८ | ५० | |
| १४ | हिवर-खेड | ४५ | ४ | २३ | २ | ४ | ५० | |
| १५ | नजुन | ४२ | २८ | ६ | ५ | १४ | ७५ | |
| १६ | कंझर | ३३ | ३३ | ३८ | ७ | ८ | ४ | |
| १७ | कंझर | ३४ | १९ | ३८ | ३ | ० | ५ | |
| १८ | कंझर | ३५ | १० | ६ | ७ | ४ | ४ | ४ |
| १९ | गोन्हापूर | १ पौ | ५ | १४ | ७ | ० | १७५ | |
| २० | कवठल | ७८ | २० | २२ | ३५ | ० | } | २ |
| २१ | सदहू | १०१ | १ | २८ | २१ | | } | |
| २२ | जनुना | १७८ | १५ | ३२ | ७ | ० | १०० | |
| २३ | गोन्हापूर | ११ | ४ | ६ | २ | १२ | १२५ | |

२४९३८६

स्थावर माल घरें

३१२५ वाटणीस आलेलीं घरें खामगांव येथील

७५ डोहनडेवशीनाजिकचें खपरेल पू० प० फूट द० उ० फूट २६ कि० आ० नंबर २

१९२५ बाळापूरसडकेवरील कोठड्या १३ पू. प. फूट ५७ व द. उ. फूट ६३ किंमत अजमास एक हजार नउशें पंचवीस रु. नं १२।१३

२५ जलाल पुऱ्यांतील वाण्याची पडीत जागा पू. प. फूट ३१ द. उ. फूट २४ किंमत अजमास पंचवीस रुपये नंबर १५

६०० वसाडकरांचें घर मागील पिछवाड्यासमेत पू. प. फूट ५० द. उ. फूट ७९ किंमत अजमास सहाशें रुपये नंबर १६।१७

५०० धर्मशाळेजवळील कोठड्या सडकेवर असलेले कोठड्याचे पाठीमागें असलेल्या किंमत अजमास रुपये पांचशें

---

३१२५

१०५ वाटणीस आलेली जागा गोन्हापूर येथील

५० राजारामवाली जागा किंमत अजमास पन्नास रुपये नंबर २८

५ वेसीजवळची जागा किंमत अजमास पांच रुपये नंबर २९

५० घनःशामवाली जागा किंमत अजमास पन्नास रुपये नंबर ३०

---

१०५

४० लिलावांत घेतलेली जागा

४० खामगांव येथील पडीत जागा मजीतीजवळ असलेली किंमत रुपये चाळीस

---

४०

---

३२७०

२५९८४ जंगम माल भांडी वगैरे

१५० वाटणीस आलेले भांड्यांची किंमत अजमास एकशें पन्नास रुपये

६४ अज्ञानाचे वापरण्या करितां रामदयाल याजपाशीं असलेले भांड्याची किंमत.

४५८४ लिलावांत घेतलेले भांड्याची किंमत खालीं लिहिले प्रमाणें तपशील

३८८ समई पितळेची

८८ गाडीचा पडदा खारव्याचा

१८ तिजोरी एक लोखंडी

६ पलंग एक लाकडी नकशीदार

१० दगडी खलबत्यासह

२०१२ पलंग एक लांकडी

३ सुतळी व सूत मिळून पोतें २

१८८ दुसरा पलंग एक लाकडी

---

२५९८४

१००२८१५८३ जंगम माल दस्तैवज वगैरे

१००० वाटणीस आलेले दस्तैवजाची वसूल होणारी आजमास रकम.

२८१५८३ लिलावांत घेतलेले दस्तैवजाचीं किंमत

---

१००२८१५८३

७०२५८९८३

येणें प्रमाणें स्थावर व जंगम माल आज्ञानाचे हिशास आला आहे व या शिवाय कपडे व चांदी सोन्याचे डागिने आज्ञानाचे हिशास येणें आहेत. तारीख ३० माहे सप्तंबर सन १८९५ इ०

V. N. Dandekar
for Deputy Commissioner
12-11-95

खरी नक्कल
Tukaram Waman.
सिरस्तेदार

---

☞ हें पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

| | | |
|---|---|---|
| सहामाही | ,, ३ | ,, ०८ |
| सालअखेर | ,, ७ | ,,१ ०८ |
| किरकोळ | अंकास .... .... .... | ०४ |

नोटिशी बद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत रु० | १ |
| दर ओळीस .... | ०।०६ |
| दुसरे खेपेस .... .... | ०३ |

| | | |
|---|---|---|
| Annual in arrears | 7 ,, | 1 Rs. 8 as. |
| Six monthly ... ... ... | | 3 ,, 8 as. |
| Single copy ... ... ... ... | | ... 4 as. |

Advertisement.

| | |
|---|---|
| Below 10 lines ... | 2 Rs. |
| Per line over 10 ... | 4 as. |
| Repetition Per line | 3 as. |

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX — AKOLA MONDAY 16 DECEMBER 1895 — NO 48

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख १६ माहे डिसेंबर सन १८९५ इ० — अंक ४८

## हायस्कुल आणि संस्कृत

( आमच्या एक मित्राकडून )

संस्कृत आणि फारशी ह्या दोन भाषा मराठी भाषेचे मुख्य घटकावयव आहेत. त्यांत, संस्कृत ही तिची माता आणि फारशी ही उपमाता आहे. यावनी सत्ता हिंदुस्थानांत कायमची पसरून हा विस्तर्ण देश तिच्या शासनाखालीं नांदूं लागल्या पासून मराठी भाषेंत यवनी शब्दांचा भरणा शिरण्यास प्रारंभ झाला आणि गद्यलेखांत त्यांचें प्रमाण एक वेळ इतकें वाढलें कीं, तुळेंत तें संस्कृत शब्दांच्या बरोबर भरूं लागले. पुढें अनेकविध कारणमालिकेनें ह्या प्रमाणास ओहटी लागून आतां तिच्यांत संस्कृत शब्दांचें प्रमाण अतोनात वाढलें आहे; व दिवसेंदिवस संस्कृत भाषारूपीं महासागराच्या भरतीच्या लाटांनीं मराठीभाषारूपीं भूप्रदेश जलमय होऊं पहात आहे! मागधी प्राकृता सारख्या जीर्ण भाषा आजला जशा ग्रंथशेष होऊन राहिल्या आहेत त्या प्रमाणें जुन्या बखरींची आणि पत्रांची भाषा लवकरच या थराला जाईल असें हल्लींच्या स्थिती वरून मानण्यास कारण झालें आहे.

या प्रमाणें मराठी भाषेचा अंतरात्मा संस्कृत भाषा बनून राहिल्यानें तिचें ज्ञान प्रत्येकास असणें अवश्यमेव झालें आहे. सरासरी १५० वर्षापूर्वी मराठी भाषेंत ग्रंथरचना करणें ह्मणजे आपल्या विद्वत्तेस कमीपणा आणून आपली नाचक्की करून घेणें असें तत्कालीन संस्कृतज्ञ पंडितांस वाटत असें. इंग्रजी सत्तारूपीं बालभानूचे आल्हादजनक आरक्त किरण महाराष्ट्र देशावर स्वैर विहार करूं लागल्या पासून त्या दैदीप्यमान तेजाखालीं जो आधुनिक विद्वानांचा वर्ग वाढीस लागला त्यांची स्थितिही पण वरील पंडिता प्रमाणेंच झाली होती. देशी भाषा, देशी पोशाख, देशीं आचारविचार, फार काय पण, देशी खाणेंपिणें देखील त्यांना रानटी वाटत असें. अशा वेळीं मराठी भाषेंत ग्रंथ रचना करून निकृष्टदशेला पोंचलेल्या मायभाषेला पौष्टिक औषधीरस देऊन तिच्यांत जोम आणण्याचा प्रयत्न झाला नाहीं. परंतु तिची दैवरेषा बळकट असल्यामुळें आज सरासरी २० वर्षा पासून निरनिराळ्या वैद्य व डाक्टर लोकांनीं आपापल्या बुद्धी प्रमाणें तिला पोषकद्रव्यांच्या मात्रा आणि डोझ देऊन तिची शक्ति वर्धन करण्याकडे आपलें लक्ष दिलें आहे. हीं पोषक द्रव्यें संस्कृत वनराजींतून वनस्पति आणून बनविलेलीं आहेत.

आज काल ज्यांना ह्मणून विद्येची अभिरुचि लागली आहे त्यांना त्यांना मराठी भाषेंत गद्य अथवा पद्य रूपानें कांहीं तरी लिहून लोकांपुढें यावें अशी स्पृहणीय इच्छा उत्पन्न झाली आहे. वजनदार वर्तमानपत्रांत, मासिक पुस्तकांत आणि ग्रंथांत संस्कृतांतून गंभीर आणि मनोहर अशा नवीन नवीन शब्दांचा भरणा होत आहे, मग ते लेख भाषांतर असोत अथवा मूळचे असोत. ह्या लेखांत सर्वमान्य सिद्धांत स्थापित करणारीं अथवा मनोहर विचारसरणीनें लटपटून गेलेलीं संस्कृत वचनें घातलीं जातात आणि त्यामुळें त्यांस अभिनव रमणीयत्व येऊन वाचकांच्या चित्तवृत्ति संक्षोभित करून त्यांना आनंदसागरांत मग्न करून टाकणारी व व्यापक अर्थ खुबीदारपणानें हृदयपटावर उमटविणारी शक्ति प्राप्त होते! असे लेख समजण्याची योग्यता अंगीं येण्यास संस्कृताचें साधारण ज्ञान तरी पाहिजे; त्या शिवाय साधारण शिक्षित लोकांना, हल्लीं जो प्रगतीचा ओघ झपाट्यानें वाहूं लागला आहे त्याबरोबर टिकाव धरवणार नाहीं. अशा रीतीनें त्यांच्यानें टिकाव न धरवला गेल्यामुळें त्यांना साहजिकपणें चालूं प्रगतीच्या मागें पडणें भाग होणार आहे.

असा प्रकार आधुनिक वाङ्मया संबंधानें च नसून मराठी भाषेंतील वामन मुक्तेश्वर मयुरादि कविवर्यांच्या काव्य ग्रंथासंबंधीही तसाच आहे. त्यांच्या काव्यांतील शब्दमाधूर्य, अर्थगौरव, पदलालित्य आणि नुसता साधा अर्थही समजणें, संस्कृत ज्ञानावांचून, दुरापस्त आहे! तें तसें दुरापस्त असल्यामुळें मनाला तल्लिन करून सोडणाऱ्या एका महानंदास आपल्याला आंचवावें लागणार! ऋग्वेदावर टीका करण्या इतकें किंवा महाकाव्या पैकीं एखादें काव्य उत्तम समजण्या इतकें संस्कृत भाषेचें उत्तम ज्ञान प्रत्येकास अवश्य असलेंच पाहिजे असा आमचा उद्देश नाहीं. आमचें ह्मणणें इतकेंच कीं, संस्कृत भाषेची रचना आणि तिचें साधारण ज्ञान प्रत्येक सुशिक्षित ह्मणवून घेणाऱ्यास पाहिजे आहे.

एकादा मनुष्य मराठी भाषेंत कांहीं नवीन गद्य अथवा पद्य लेख लिहूं लागला, आणि विशेषतः परकीय भाषेंतून भाषांतर करूं लागला ह्मणजे संस्कृत भाषेशीं मुळींच परिचय नसल्या कारणानें त्याला ज्या अडचण पडते आणि तें काम त्याच्या हातून किती भिकार रीतीनें तडीस जातें याचे दाखले थोडे थोडके नाहींत! आपले विचार अथवा भाषांतर आटोपसारपणें व सुबकपणें लोकांपुढें मांडणें त्याला जवळ जवळ अशक्य होऊन जातें; आणि "उत्पद्यंते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः" याप्रमाणें त्याची ग्रंथरचनेची हौस जागचे जागींच विराम पावते! ही संस्कृत न येणाऱ्याची स्थिति झाली. ज्यांचा संस्कृताशीं साधारण परिचय असल्या मुळें त्या भाषेंतील अनेक शब्द कानावरून व दृष्टी समोरून गेले आहेत अशांची देखील अशा वेळीं कशी स्थिति होते हें "चिपळूणकरांचें चरित्र" व होऊं घातलेल्या "मराठ्यांचा इतिहास" या ग्रंथाच्या लेखकास स्वानुभवावरून कळालें असेल. इतरास देखील अशा वेळीं संस्कृत ज्ञानाभावाचा पदोपदीं अनुभव येतोच येतो. मराठी भाषा पूर्णावस्थेत अजून आली नसल्यानें संस्कृतांतूनच तिच्यांत आयते नवीन शब्द आणावे लागतात अथवा संस्कृत शब्दापासून नवीन अर्थाचे नवीन शब्द तयार करावे लागतात, ह्मणून संस्कृत भाषेच्या मोडीचें आणि अनेक संस्कृत शब्दांचें ज्ञान साधारणपणें तरी प्रत्येक होतकरूस असलें पाहिजे.

मध्यम प्रतीचें आणि उच्च प्रतीचें शिक्षण देतांना सरकारानें अभ्यासक्रमांत पुष्कळ विषय घातले आहेत. याचें कारण विद्यार्थ्यास त्या त्या महत्वाच्या विषयांची ओळख होऊन त्यांचें साधारण ज्ञान त्यांना व्हावें आणि मग त्यांना जो विषय आवडेल त्यांत त्यांनीं प्राविण्य संपादन करावें असें असावेंसें वाटतें आणि ह्याच उद्देशानें त्या त्या विषयांचीं मूलतत्वें अवश्य शिकविलीं जातात असा आमचा ग्रह आहे. संस्कृत भाषा शिकविण्याचा प्रारंभ ७ वे इयत्तेपासून केला जातो आणि तेव्हांपासून ११ व्या इयत्ते पर्यंत ह्मणजे ठोकळ अनुमानानें पांचा पेक्षां ज्यास्त वर्षे विद्यार्थ्याला ती भाषा शिकण्यास सापडतात. इतक्या अवधींत विद्यार्थ्यांचें बहुतेक संस्कृत व्याकरण पुरें होऊन संस्कृतांतील १।२ ग्रंथ व संस्कृतांत कांहीं थोडेंसें लिहितां येईल इतकी त्याची गति त्या भाषेंत होते. ह्यालाच आम्ही संस्कृत भाषेचें साधारण ज्ञान असें म्हणतों. इतपर्यंत त्या भाषेचें ज्ञान असणें हें होतकरू लेखकास अवश्य आहे, इतकेंच नाहीं तर मराठी भाषेंतील रोजचे लेख व चालू ग्रंथ चांगलें समजण्यासही तें अवश्य आहे; आणि तें कां हें वरील विवेचना वरून वाचकांस कळेल.

हा संस्कृत भाषेचा व्यावहारिक दृष्टीनें विचार झाला. तिचें शास्त्रीय दृष्टीनें विवेचन करणें, तिच्या असलेल्या ग्रंथाबद्दल मुख्यत्वें करून काव्य, अलंकार, आध्यात्म विचार या बद्दल, व तिच्यांत असलेल्या सौष्ठवादि गुणां बद्दल लिहिणें जरी येथें अप्रस्तुत होणार नाहीं तरी तें प्रस्तुत लेखकाच्या आटोक्या बाहेर असल्यानें व त्याची तादृश अवश्यकता न दिसल्यानें त्या दिशेनें या विषयाचें येथें विवेचन करण्याचा यत्न केला नाहीं. इंग्रजी भाषेला ल्याटिनचें जसें महत्व मानतात आणि मृतभाषा खरी परंतु जिच्यांत मनुष्याची बुद्धि आणि ज्ञान विकासित करण्याची शक्ति आहे अशा भाषेची इतिहास दृष्ट्या महती सर्व सुधारलेलीं राष्ट्रें मानितात व तिचें अध्ययन आस्थापूर्वक करितात असें आपल्यास दिसून येतें. तीच गोष्ट संस्कृत भाषेसही लागूं आहे. असें स्वकीय व परकीय विद्वानांचे मत असल्यानें फक्त येथें नमूद करतों.

ज्या भाषेचें ज्ञान साधारणपणें तरी असणें अवश्य झालें आहे तिची स्थिति हायस्कुलांत काय आहे याचा विचार प्रत्येकानें केला पाहिजे असें आम्हास वाटतें. अकोला हायस्कूल संबंधी जी आम्हाला माहिती मिळते तिच्यावरून पाहूं जातां या भाषेची तेथें बरीच पायमल्ली केली जात असल्याचें दिसतें. तेथें पहिल्या वर्गांत जुनेनवे मिळून सरासरी ३६ विद्यार्थी आहेत. या छत्तीस विद्यार्थ्यां पैकीं संस्कृत भाषा ज्यांनीं घेतली आहे असे काय ते अजमास सात विद्यार्थी आहेत. बाकी राहिलेल्या विद्यार्थ्यांनीं मराठी भाषा घेतली आहे. मराठी घेणाऱ्यांची संख्या मोठी असून संस्कृत घेणाऱ्यांची संख्या अल्प असल्या कारणानें संस्कृत वर्ग कांहीं काळा पुरता तरी बंद केला जावा अशा विषयीं तेथील आद्य गुरू कडून शाळाखात्याचे मुख्याधिकाऱ्याकडे लिहून गेल्याचें समजतें येणेंकरून हायस्कुलांतील गुरूस व उपगुरूस अगोदरच त्याच्या आंवाक्या बाहेर होत असलेली ढोर मेहनत कमी करण्याचा हा होत असलेला स्तुत्य प्रयत्न पाहून, हा प्रयत्न करणारांचीं तारीफ करावी तेवढी थोडी! संस्कृत भाषेकडे विद्यार्थ्यांची प्रवृत्ति कमी असल्याचें जें वरील प्रमाणावरून दिसून येतें त्यास मुलांची अनभिरुचि कारण मानल्यास ह्या अनभिरुचीच्या दोषास विद्यार्थ्यां इतकेच किंबहुना ज्यास्त त्यांचे शिक्षक पात्र आहेत. एखाद्या कठीण पण उपयुक्त विषयाची गोडी लागेल अशा तऱ्हेनें तो विषय समजून देऊन विद्यार्थ्यांची प्रवृत्ति तिकडे वळविणें हें शिक्षकाचें कर्तव्य होय. ही गोष्ट त्यांचे कडून शक्य प्रमाणांत होणार नाहीं तर हा दोष शिक्षकांनाच लावावा लागेल. वारंवार जोराचे प्रयत्न होत असतांना अजून युनिव्हर्सिटींत मराठीस थारा मिळत नाहीं, व तो लवकर मिळेल असें सध्याच्या प्रकारावरून तरी मानण्यास जागा नाहीं. ज्यांनीं कांहीं कारणामुळें संस्कृत भाषा हायस्कुलांत घेतली नसेल व पुढें ज्यास कालेजांत जाण्याची उत्कट इच्छा असेल त्यांना पुढें, व्यर्थ अतोनात मेहनत करावी लागेल; नाहीं तर कालेजांत जाण्याचा विचार अजीबात सोडून द्यावा लागेल. जों पर्यंत युनिव्हर्सिटि मराठी भाषेला ओळखत नाहीं तों पर्यंत हायस्कुलानेंही संस्कृताला फाटा देतां कामा नये, पाहिजे असल्यास आपल्या अधिकाऱ्या मार्फत मराठी भाषेला पदरांत घेण्याबद्दल युनिव्हर्सिटीला शिफारसपत्र धाडावें ह्मणजे तें हायस्कूल लोकगौरवास प्राप्त होईल.

परंतु आमच्या समजण्यांत कांहीं वेगळाच प्रकार आला आहे. जे विद्यार्थी संस्कृत भाषा घेतात त्यास उत्तेजन देण्या ऐवजी त्यांचा उत्साहभंग केला जातो. अशा विद्यार्थ्यांचा एकादा विषय कच्चा आहे असें गुरूस वाटेल ह्मणजे आपल्या लाडक्या अर-

शद्बापैकीं एकानें त्या विद्यार्थ्यास संबोधून "अमका विषय कच्चा आहे आणि मी ह्मणे संस्कृत घेतो." अशा सारख्या उपरोधिक उक्तीनें त्यांचें उपालंभन केलें जातें. ह्मणजे परोक्ष रीतीनें गुरु त्या विद्यार्थ्यास संस्कृत सोडण्यास भाग पाडतात. संस्कृत शिकविण्यास गुरूला जी मेहनत पडते तिच्या दशांश मेहनत मराठी शिकण्यास नको. यावरून आपले-श्रम वांचविण्या करितांच मुलांनीं मराठी घ्यावें ह्मणून गुरुजी झटतात असें जर कोणी अनुमान काढूं लागला तर तें एकंदर स्थितीच्या मानानें पहातां विसंगत होईल. या कृतीनें मुलांच्या भावी आयुष्य क्रमावर चांगलासा परिणाम घडून न येऊन त्यांचें फार नुकसान होणार आहे. आणि यास कारण- अथवा जबाबदार तरी- शिक्षकच समजले जातील. ज्या संस्कृत भाषेची थोरवी दिगंत गाजत आहे, ज्या संस्कृत भाषेशिवाय शिक्षण पुरें झालें असें अलिकडे मानीत नाहींत त्या संस्कृत भाषेची तिच्या जन्मभूमींत दैना व्हावी हें इष्ट आहे काय?

आतां, मुलांना अनेक विषय करण्याचे असल्यामुळें ह्यांना फार श्रम पडतात; ते श्रम कमी होतील असे उपाय केले पाहिजेत असें कांहींस वाटतें. रास्त मार्गानें असे श्रम कमी करितां आल्यास ती गोष्ट आह्मालाही कबूल आहे; परंतु जर इतर निःसार विषय शिकविले जातात आणि ते जर काढून टाकण्याची प्राज्ञा नाहीं तर ज्या विचारीस ना कोणी माय ना बाप व जी गोमाते प्रमाणें पवित्र आणि उपयुक्त अशा संस्कृतावर जर धाड आणली जाईल तर तें आह्मास पसंत नाही, अशा रीतीनें दर्शविलेली भूतदया आह्मास मंजूर नाहीं आणि अशा दयाळू महात्म्याचा गौरव करण्यास आह्मी तयार नाहीं!

वर कळलेली माहिती जर खरी असेल तर तशी स्थिति असणें अकोला हायस्कुलास अत्यंत लाजिरवाणें आहे आणि त्या हायस्कुलचे शिक्षक अति कडक टीकेस पात्र आहेत ह्मणून या बाबतींत योग्य अधिकारी चौकशी करून निकाल लावतील अशी आशा बाळगून प्रस्तुतचा लेख लिहिण्याचें धाडस केलें आहे.

न.

---

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य ३० शके १८१७

लार्ड हामिलटन स्टेट सेक्रेटरी म्यांचेस्टरच्या गिरणीवाल्यांचीं मानपत्रें स्वीकारतात आणि सर्व गाऱ्हाणीं ऐकून घेतात. हाच कित्ता लार्ड एलजिन यांनीं हिंदुस्थानांत कां गिरवूं नये हें आह्मास समजत नाहीं. गव्हनर जनरल हल्लीं सर्व देश स्वतां डोळ्यानें पहात आहेत. महारणी सरकारचे प्रतिनिधी ह्मणून त्यांस सर्वत्र मान मिळत आहे आणि तो मिळाला ही पाहिजे. सर्व सफरीचा इतिहास ह्मणजे आगतस्वागतपर झालेले शहरोशहरचे आनंदोत्सव, मेजवान्यांचे पाहुणचार व मानपत्रांची गर्दी यांचें वर्णन होय. परंतु अशा सफरीचा अन्य कांहीं फायदा होत असतो. आपलीं राजकीय मतें प्रदर्शित करण्याची ही संधि व्हाइसराय साहेबांस अप्रतिम असते, लोकांचीं सुखदुःखें कळतात, प्रजेचीं दुःखें निवारण्याचा सरकारचा संकल्प कोणत्या पंथाचा आहे हें कळविण्यास सहजी खुला मार्ग मिळतो. परंतु लार्ड एलजिन यांच्यामतें मानपत्रांत स्वागताचा विषय असावा आणि मानपत्राला योग्य विषय ह्मटले ह्मणजे ठिकठिकाणच्या स्थानिक अडचणी होत. मानपत्रांत सर्व देशाला साधारण असे विषय नसावेत; आणि अशा नियमाला कारण इतकेंच कीं फिरत असलेल्या व्हाइसराय साहेबांची अशा मानपत्रांतील सर्व देशविषयक प्रश्नावर उत्तरें देण्याची मार्गांत तयारी नसते. पण मानपत्रावर सविस्तर उत्तरें दिलींच पाहिजेत असा कांहीं प्रतिबंध नसतांना देखील लार्ड एलजिन यांचें पित्त कां खवळतें हें समजत नाहीं.

---

पुण्याच्या सार्वजनिक सभेनें मानपत्र लार्ड एलजिन यांस दिलें त्यांत शेतकऱ्यांची निकृष्ठ स्थिती, सारा वाढविण्याची नवीन घातुक पद्धत, जूरी बिल, इत्यादि महत्वाच्या विषयावर सभेनें स्वकीय मत दर्शविलें होतें. पण ही गोष्ट लार्ड एलजिन यास खपली नाहीं आणि त्यांनीं लागलींच मानपत्र कसें असावे, त्यांत काय काय लिहावे, इत्यादि गोष्टी विषयीं एक टोलेजंग उपदेश केला. हा उपदेश लाट साहबांनीं मुंबई इलाख्यांत केला पण मद्रासची सार्वजनिक व लोकमान्य संस्था जी "महाजन सभा" तिच्या मनांत हा बोध कांहीं नीटसा ठसला नाहीं. या सभेनें कांहीं उपयुक्त गोष्टी आपल्या मानपत्रांत गोंविल्या होत्या. पण त्या सरकारी राज्यकारभारांतल्या चुका दर्शवीत होत्या ह्मणून त्या प्रथम वगळण्यांत याव्या आणि नंतर मानपत्र स्वीकारण्यांत येईल असा कडकडीत जबाब लार्ड एलजिन यांनीं पाठविला. 'महाजन सभेची' अशी हेलना केल्यामुळें तिनें मानपत्राचा विचारच रहित केला आणि लार्ड एलजिन यांनीं ज्या गोष्टीस अपवाद घेतल्या त्या सर्वत्र कळाव्या ह्मणून त्या जाहिर ही या गोष्टी ह्मणजे हल्लींच्या दुःखाची कहाणी होय.

---

सामाजिक सभेला राष्ट्रीय सभेचा मांडव मागावयाचा नाहीं असा दूरदर्शी विद्वन्मुगुट न्यायमूर्ती रानडे यांनीं निकाल केला तेव्हां राष्ट्रीय सभेवर ओढवणारें विघ्न टळलें व सर्व संकटें लयास पोंचलीं असें वाटलें होतें पण अद्याप पुण्यास कांग्रेसच्या कामा विषयीं सर्व लोकांची आस्था दिसून येत नाहीं. आतां दहा बारा दिवसांचा सगळा अवधि राहिला आहे तरी केसरी, ज्ञानप्रकाश इत्यादि वजनदार वर्तमानपत्रांतून परस्परांच्या उखाळ्या पाखाळ्या ऐकूं येतात ही गोष्ट मोठ्या खेदाची होय.

विलायतेंत सर वुलियम हंटर सारखे मुत्सदी राष्ट्रीय सभेला मोठ्या लोकमान्य राजकीय संस्थांत गणतात आणि इंग्लिश लोकांचे ग्रह या सभेला अनुकूळ नुकतेंच होत चालले आहेत अशा समयीं निवळ पुणेकरांच्या आपसांतील दूही मुळें राष्ट्रीय सभेच्या कार्यांत अनास्था उत्पन्न झाली व सर्व पृथ्वीभर दुर्लौकिक राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांचा पसरला ही गोष्ट कशी झाली याची अटकळ कल्पनेनेंच नीट होईल. या कृतीनें आपण होऊनच आपल्या शत्रूंच्या हातीं नंगी तरवार देत आहों आणि जर ते शत्रू वेड्या प्रमाणें आपल्यावर धावले तर त्याचा दोष कोणास लावावा बरें!

पुण्यांतील बखेड्यामुळें सर्वत्र नानाविध चळवळी प्रचलित झाल्या, निरुपद्रवी व उपयुक्त सामाजिक सभेविषयीं अप्रियता उत्पन्न झाली आणि राष्ट्रीय सभेविषयीं देखील मूलच्छेदी पांडित्याचे कोटिक्रम उजेडांत येऊं लागले. वाईट गोष्टी लवकर जडतात त्याप्रमाणें पुण्याचें अविचाराचें बंड पुष्कळ ठिकाणीं माजलें आणि विनाकारण आचिंतितदूही व फाटाफूट माजली आहे. तात्पर्य, पुण्याचे लोक राष्ट्रकार्याला कुचकामाचे आहेत. पुण्यासच पेशवाई बुडाली आणि पुण्यासच राष्ट्रीय सभा डळमळण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. हा त्या पुण्यग्रामाचा महिमा असेल तर तो स्तोत्ररूपानें भावी पिढ्या गातील यांत शंका नाहीं.

---

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 16, 1895

The news from the Poona quarters in this week is almost disappointing. The burning embers of envy and jealousy are still alive and the contending parties fight with each other at their arm's length. The rival factions are well known by the names of their leaders Messrs. Tilak and Jathar. There is a deplorable want of a sense of propriety on either side. The Poona people boast of a centralized wisdom in their leaders but we are sorry to confess that there is wisdom in full swing if it consist in a work of destruction. All the glorious results of the last ten years are being undone by an utter breakdown in the Poona Congress Working Committee. This Committee did not pull smoothly with the feelings of the people. Both the parties have overshot their mark. In works of public utility one must forget himself a good deal. There must be a spirit of self-abnegation, mutual respect and a pliant humour towards the riding hobbies of others. In Poona ambition of the direst sort is at work and the only aim is to pull down one to advance the claims of another. This envious and captious motive has become the real source of disaster to public activities. The Social Conference was first deemed to be the apple of discord but the far-reaching and timely resolution of Rao Bahadur Ranade with regard to the request for a loan of the Congress Pandal for the sittings of the Conference was viewed as a harbinger of active and honest work in the affairs of the Congress. But no! Let us however hope that better prospects are in store for us.

---

The Mahajan Sabha of Madras has done a masterly act in resolving that no address should be presented to the Viceroy who gave little heed to whatever the Sabha said in its address. It is indeed a bold and vigorous action on the part of the Sabha. The Viceroy may have his own ways of doing business but we are sorry that His Excellency's objection to the vital portion of the address was without a satisfactory reason to our plain mind.

We cull below the very portion to which exception was taken and wish every one of our readers to inwardly study and digest the important problems of the day cloaked in such an eloquent language as that of the address. We fully endorse each and every word therein and hope that the prayer made in it will be granted ungrudgingly. The sooner the better:—

The paragraphs in question run as below:—

"Your Excellency has assumed charge of the great office of Viceroy of India at a time of unprecedented financial anxiety. During the last nearly twenty years the financial condition of the Government has been unsatisfactory, and the public have naturally shared in the anxiety of the responsible rulers of the country. In spite of every effort that has been made to keep expenditure within moderate limits, the Military expenditure has on the whole enormously increased; and this increase together with the ever-increasing loss by exchange has brought a serious crisis in the financial situation—a crisis which there is no prospect of tiding over except by the most rigid economy and by all possible retrenchments. The Sabha cannot but express extreme regret at the decision of the Government in regard to Chitral. Two crores and a-half is a considerable burden on the Treasury; but a recurring amount of 20 lakhs a year is what the tax-payers can ill-afford, especially having regard to the growing requirements of progressive Government and of public well-being.

In consequence of this great increase of expenditure in the Military branch of the administration, the Government has necessarily to strain to the utmost every source of its income and keep expenditure in the Civil branches of the administration at minimum figures. The revenues of the State show, indeed, in some cases a natural tendency to increase, but the tax-payers derive comparatively little benefit from this increase, the surplus money being mostly swallowed up in the practically endless need of the present Military policy of the Government. Perhaps attributable to this circumstance is the tendency, which has been manifest of late, to adopt towards the agricultural class a more severe policy. Settlement operations have been revived with the predermined object of increasing revenue; and the period of time during which the Settlement is to last has been shortened. Old assurances and pledges have been disregarded; and altogether the condition of the ryots has been made less bearable.

During the period of time the Sabha refer to, the burden of taxation has considerably increased;

and while there has been absolutely no relief to the tax-payer, all the improvements in the revenue have been counteracted by increased Military expenditure. The Sabha feel justified in urging that any fresh resource that the Government may find possible to divert from the Military purposes or from the obligation arising from the state of exchange, should be utilised either in giving relief to the tax payers or in feeding the departments directly beneficial to the public such as Public Works, Education, Sanitation, &c, or in carrying out those urgent administrative reforms for which the public have been for some years clamouring, such as the separation of Judicial and Executive functions + &c.

NOTICE

It is hereby published for general information of the Government servants living within the limits of the Akola Municipality that the assessment lists of the Town Fund tax for the year 1895-96 due by Government servants residing or practising any profession or art or carrying on any trade or calling within the limits of the Akola Municipality are complete and ready for inspection in the Municipal office during office hours (from 11 A. M. to 5 P. M.)

Persons concerned are requested to see what tax has been imposed upon them and to take objections in writing to the same, if any, within one month from the date of this notice.

Dated Akola 11th December 95

W. N. Kale
Secretary
Municipal Committee Akola

NOTICE

It is hereby published for general information of the people of Akola that a meeting of the Committee will be held on the 23rd. December 1895 at 7 A. M. in the TownHall to hear and decide appeals against Townfund assessment for the year 1895-96 received as per notice published in the Sudha Berari papar dated 21-11-95.

Persons concerned are requested to be present at the appointed hour with accounts and other documents showing their exact income.

Appeals of those who will not appear before the committee on the date fixed will be struck off and rejected.

Dated Akola 13th. December 95

W. N. Kale
Secretary
Municipal Committee Akola

## वऱ्हाड

रा. रा. हरिहर काशिनाथ पाटील क्लार्क आफ कोर्ट उमरावती यांस मूर्तिजापुरास रा. रघुपत मोहनराय यांचे ा दोन महिन्यांच्या रजेंत अक्टिंग तहशिलदार नेमलें आहे.

हवामान— थंडी चांगलीच पडते. हल्लीं थंडीचें मान जबर आहे म्हणजे पारा ४६ अंशा पर्यंत उतरतो. थंडी रब्बीच्या पिकास थोडी बहुत मदत देईल परंतु आणखी एक पाऊस पडेल तर फारच बहार होईल. गावांत ताप खोकल्याचे आजार सुरू आहेत.

अकोल्यास दोन असिस्टंट कमिशनर आहेत त्यांच्या कडील दिवाणी काम काढिल्यामुळें व मि. वाल्श रजेवर असल्यामुळें गेल्या पंधरवाड्यांत पक्षकारांची गैरसोय फार झाली आणि पुष्कळ खर्च वृथा पडला.

वऱ्हाडची प्रांतिक जाहिर सभा येत्या ७।८ मार्चे तारखांस भरविण्याचा सार्वजनिक सभेनें ठराव केला आहे. फार उशिरानें कां होईना पण जाहिरसभा उमरावतीस भरणार आहे ही आनंदाची गोष्ट होय.

### आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥।- |
| ९ ,, दिवसांच्या मुदतीची | | | ९९॥= |
| सुवर्ण | २८ | रुपें | १०० |
| मीठ | ३॥।= | आळशी | ९८ |
| गहू काठ | ९७॥ | बनली | ६३ |
| जवारी | ४३ | सर्की | ४॥ |
| तूप | ८॥। | तेल | ६॥ |
| चणे | ६९ | तीळ | १०० |
| कपाशी | ४७।४८ | गावराणी रुई | ६१॥ |

सव्याच भाव.

| | |
|---|---|
| जवारी फाल्गुन शुद्ध १९ | ४८ |
| रुई फाल्गुन शुद्ध १९ | ६४॥ |
| आळशी वैशाख शुद्ध १९ | ९७॥ |
| गहू वैशाख शुद्ध १९ | ६४८= |

## नोटीस

ह्या नोटिशीनें अकोलें म्युनिसिपल हद्दींतील सर्व सरकारी नोकरांस कळविण्यांत येतें कीं सदर्हू हद्दींतील राहणारे किंवा कोणताही धंदा कलेचें काम उदीम किंवा उद्योग करीत असलेले सरकारी नोकरावरील सन १८९५।९६ सालाच्या टौनफंड कराच्या आकारणीच्या याद्या तयार झाल्या आहेत त्या म्युनिसिपल आफिसांत आफिसचें वेळेंत सकाळीं ११ वाजल्या पासून संध्याकाळीं पांच वाजेपर्यंत पाहण्याला ठेविल्या आहेत. तरी कळविण्यांत येतें कीं, सर्वांनीं आपापल्यावर किती कर बसविला गेला आहे हें पाहून सदर्हू कराबद्दल ज्यांची तक्रार असेल त्यांनीं ती या नोटिशीचे तारखे पासून एक महिन्याचे आंत कमिटीचे आफिसांत लेखी दाखल करावी. अकोलें. ता० ११ माहे डिसेंबर सन १८९५ इ०

W. N. Kale
Secretaay
A. M.C.

### नोटीस

ह्या नोटीशीनें अकोलें म्युनिसिपाल कमेटीचे हद्दींतील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, तारीख २१ नोवेंबरचे शुद्धवऱ्हाडी वर्तमान पत्रांत दिलेले नोटिशीचे आधारें एक महिन्याचे आंत ज्या लोकांनीं सन १८९५।९६ सालच्या टाऊनफंड कराच्या आकारणी बद्दल अपीलें केली आहेत त्या अपीलाचे चौकशी कारितां कमिटीची सभा ता० २३ दिसेंबर १८९५ रोजीं सकाळीं ७ वाजतां टौनहालांत भरणार आहे कारितां ज्या लोकांनीं अपीलअर्ज केले आहेत त्यांनीं आपापले सर्व हिशेब वगैरे घेऊन सदर्हू तारखेस नेमल्या वेळेंत हजर व्हावें या प्रमाणें वक्तशीर जे लोक हजर होणार नाहींत त्यांचीं अपीलें नामंजूर म्हणून काढून टाकलीं जातील. मग त्यांची कांहीं एक तक्रार ऐकिली जाणार नाहीं. कळावें ता० १३।१२।९५

W. N. Kale
Secretary
A. M. C

### नोटीस

रा. भगवंत मारुती कुळकर्णी राहणार कुरणखेड तालुके व जिल्हा अकोलें यास खालीं सही करणार मी नोटीस देतों कीं मौजे गोरेगांव कसबे कुरणखेड तालुके व जिल्हा अकोलें येथील जमीन नंबर ८३ एकर गुंठे ३२-३३ पैकीं सात अष्टमांश ह्मणजे एकर गुंठे २८-२८-१४ इतकी जमीन तुह्मी आह्मास विकली व जमीन तुमचे नांवानें करून देतों असें लिहून दिलें. हें खरिदीपत्र लिहून दिल्यास पुष्कळ दिवस झाले तरी जमीन आज नांवानें करून देतों, उद्यां देतों असें आजपर्यंत चाळवीत आला तर हल्लीं या नोटीशीचे द्वारें तुह्मास कळवितो कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून एक महिन्याचे आंत जमीन आमचे नांवानें न करून द्याल तर रीती प्रमाणें दिवाणी कोर्टांत दावा करून तुह्मास जमीन नांवानें करून द्यावयास लावीन. तुह्मी आकोला तहशील कचेरींत जमीन नांवानें करून देण्यास शिवा देवा व इतर जरूरीच्या असामी घेऊन कधीं येणार हें योग्य रीतीनें मजला आठ दिवस आधीं कळवावें ह्मणजे मी रजा घेऊन तेथें येईन. दिलेल्या एक महिन्याचे मुदतींत या सर्व गोष्टी होऊन शेत आमचे नांवावर न करून दिल्यास एकदम कोर्टांत दावा केला जाईल व कोर्टखर्च व दुसरे याबद्दलचे योग्य खर्च सर्व तुह्मास द्यावे लागतील. ही नोटीस लिहून दिली तारीख १२ दिसेंबर सन १८९५ इसवी.

रामचंद्र आबाजी पन्हाळकर मास्तर
जळगांव जिल्हा आकोला.

### नोटीस

नोटीस घेणारी बापू वल्लद शामजी कुणबी अडनांव खमकर राहणार मौजे हातें तालुके बाळापूर जिल्हे अकोलें. यास नोटीस देणार मानाजी वल्लद पुंजाजी जात माळी राहणार मौजे हातें तालुक बाळापूर जिल्हे अकोलें सुमारसन १३०५ फसली कारणें नोटीस देतों ऐसाजे तुमचेशीं व माझेशीं तोंडीं करार असा झाला होता कीं, रुपये दोनशें तुह्मी मजला द्यावे व त्या रुपयाला व्याज दरमहा दरशेंकडा दोन रुपये प्रमाणें मी देण्याचें कबूल केलें व रुपयांची आदाई चार वर्षांनीं करून देईन, या प्रमाणें तुमचेशीं व माझेशीं ठरलें. त्या प्रमाणें दस्तैवज गहाणखताचा देण्याचा होता परंतु गहाणखत कशाला ह्मणतात व खरीदीखत किंवा दुसरे प्रकारचें कसें काय लिहून देतात हें कांहींच मजला समजत नाहीं. मी दस्तैवज लिहन देण्या करितां बाळापूरास गेलों तेव्हां दस्तैवज लिहिणारानें मजला विचारलें असतां मजला तुह्मी जसें शिकवून ठेविलें होतें त्या प्रमाणें मी सांगितलेंवरून त्यांनीं माझे ह्मणण्या वरून दस्तैवज लिहून दिला. पुढें सदर्हू दस्तैवज नोंदण्यास दाखल केला. तेव्हां नोंदणारे अंमलदारांनीं जेव्हां खुलासेवार फोड करून सांगितलें व विचारलें तेव्हां मी उमजलों कीं, हा दस्तैवज खरीदीखताचा झाला. तेव्हां मी नोंदणारे अंमलदाराला जें पूर्वीं ठरलें होतें त्या प्रमाणें सांगितलें वरून त्यांनीं आपले शेऱ्यामध्यें लिहून ठविलें आहे. आतां रुपये भरण्या बद्दल कबूल केलें आहे कीं, मी आगाऊं पावलों ह्याचें कारण हेंच कीं, तुह्मी मजला ह्मणाले होते कीं, दस्तैवज नोंदून दिल्या शिवाय रुपये देणार नाहीं. आतां माझें काम जरूरीचें होतें ह्मणून रुपये भरून पावल्याचें कबूल केलें. जेव्हां दस्तैवज नोंदून तुमचे जवळ देऊन आलों आणि बोललों कीं, दस्तैवज आणला रुपये द्यावे ते वेळीं तुह्मी म्हणाले दस्तैवज आगोदर माझे हवाली करावा नंतर रुपये देतों. ते वेळीं तुमचा रोख कपटाचा दिसला, दस्तैवज घेऊन रुपये देऊं नयेत वरून मी सदर्हू दस्तैवज आपले जवळ ठेविला आहे त्यास ह्या नोटिशीनें असें कळवितों कीं, ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत रुपये दोनशें दस्तैवजा बरहुकूम देऊन माझे जवळील गहाण खताचा दस्तैवज घ्यावा. व या प्रमाणें तुम्ही वर्तन न कारितां जर हा दस्तैवज माझे जवळच राहूं देऊन नोंदलेले दस्तैवजाची नक्कल घेऊन दस्तैवज खरा करूं पहाल तर तो दस्तैवज खरा नाहीं. या नोटीशी वरून रद्द आहे जर गैर व्यवस्थेनें चालाल तर तुमचेवर फिर्याद केली जाईल. व सर्व एकंदर खर्च भरून घेईन. ही नोटीस दिली सही तारीख २८ माहे नवंबर सन १८९५ इसवी.

ताजाकलमः— सदर्हू मजकुराची नोटीस तुह्मास तारीख २८ माहे नोवेंबर १८९५ इ. ची हातानें लिहून रजिस्टर केली व ती पावल्या बद्दल मजपाशीं तुमची पावती आहे. परंतु तुम्ही मजबरोबर सदर्हू लिहिले प्रमाणें कपट केलें व माझें अति नुकसान झालें व तुम्ही रुपये सदरी लिहिलेले मजला दिले नाहींत. रुपये दिलें असें सांग म्हणजे मग देईन असें तुम्ही सांगितलें या भरंवशावर मी रुपये दिल असे नोंदणार अंमलदारापुढें सांगितलें परंतु खरोखर रुपये मिळाले नाहींत. आतां माझी नुकसान व ह्या नोटिशीचा खर्च याजबद्दल तुह्मी निकाल आठ दिवसांत करावा. नाहीं तर याजबद्दल मी तुमचेवर फिर्याद करून सर्व भरून घेतो तुमचे मी कांहीं देणें नाहीं हें सर्व तुम्हास कळावें म्हणून नोटीस दिली सही. ता० १४ माहे डिसेंबर सन १८९५ इ०

( सहीची निशाणी वखर ) मानाजी
वल्लद पुंजाजी माळी.
याचे हातची असे.

## वर्तमानसार.

पृथ्वीवर जितके हिरे आहेत तितके तीवर आकाशांतून पडणाऱ्या ताऱ्यापासून होतात असा शोध एका जर्मन शास्त्रज्ञानें काढला आहे.

सोन्याची निर्गत—सन १८९४।९५ सालीं हिंदुस्थानांतून ६२६ लक्ष रुपये किंमतीचें सोनें हिंदुस्थानांतून बाह्य देशीं गेलें, आणि बाह्य देशाहून १९३ लक्ष रुपये किंमतीचें सोनें हिंदुस्थानांत आलें असें सरकारी माहितीवरून समजतें.

मालवलेल्या मेणबत्तीपासून जो धूर निघतो तो विषकारक आहे, सबब तो धूर आपल्या शरिरात शिरूं देऊं नये असें शास्त्रज्ञ ह्मणतात.

इंग्लंडांत बाय सायकल गाडीवर बसणारे एकंदर तेरा लाख लोक आहेत. ह्या गाड्या करण्याचे कारखान्यांत एकंदर साडे सात कोटी पौंडाचें भांडवल पडलेलें आहे. सर्व कारखोन मिळून एकंदर ४३ हजार लोक आहेत.

हिंदुस्थानांत तारखात्याचें उत्पन्न १० लाख रुपये आहे.

इंग्लंडच्या राजघराण्यांत महाराणी साहेबांशिवाय ड्यूक आफ् एडिंबर्न हे सर्वांत श्रीमान आहेत.

१८८५ सालीं कलकत्यास साडे बावन लक्ष ग्यालन केरोसिन तेल आलें, आणि या सालीं अक्टाबर अखेर ४ कोट ग्यालन तेल आलें.

गेल्या सपटेंबर महिन्यांत कराची बंदराहून २६३२०९१ रुपये किंमतीचा ६६० ८३७ हंड्रेडवेट गहूं परदेशीं रवाना झाला.

दुचाकी गाडीवरील प्रवास—मि. माणिकशा निकलसन यांणीं दुचाकी गाडीवरून पुण्याहून नगरापर्यंत सहा तास व ५२ मिनिटांत प्रवास केला. दोन शहरामध्यें अंतर ७२ मैल आहे.

कोणत्याहि मुलीनें शिवणें, भाकरी भाजणें व कापूस पिंजण यांतील वाकबगारीचें सर्टिफिकिट मिळविल्या शिवाय लग्न करण्याची सक्त मनाई असल्याबद्दल नार्वे देशांत नुकताच कायदा पसार करण्यांत आला.

तूर्त गोमांतक प्रांतांत बंड उद्भवलें आहे तेव्हां तें इंग्रजी अंमलांत पसरूं नये अशी इंग्रज लोकांची इच्छा आहे. ह्या संबंधानें विलायतच्या एका गोऱ्या पत्रकर्त्यानें असे उद्गार काढले आहेत.

" ह्या बंडाच्या पर्यवसानावर सरकारानें नीट ध्यान ठेवावें कारण प्रत्यक्ष परकीय अमलाखालीं असलेला प्रत्येक नेटिव मनुष्य अंतःकरणानें बंडखोर असतोच गोव्याच्या नेटिवांनीं जें बीं पेरिलें आहे तें बळकट मूळ धरून ब्रिटिश इंडिया मध्यें पसरेलें. तसेंच प्रचंड बंड हिंदुस्थानांत झाल्यास तें आमच्यानें मोडवणार नाहीं कारण सन १८५७ सालीं जें इतिहास प्रसिद्ध बंड झालें होते त्यापेक्षां आजचे नेटिव शारिरिक आणि मानसिक सामर्थ्यानें फार वेगळे आहेत.

ह्या इंग्रजपत्रकर्त्यानें नेटिवांच्या संबंधानें जे उद्गार काढले आहेत तसेंच सगळ्या इंग्रजांचे नेटिवांविषयींचे खरे खरे विचार आहेत त्यांत इतकाच भेद कीं ह्या पत्रकर्त्यासारखे मोकळ्या मनाचे लोक ते उघड बोलून दांखवितात, आणि बाकीचे खरे उद्गार झांकून ठेऊन नेटिव लोक राजनिष्ठ आहेत असे दिखाऊ उद्गार बाहेर काढितात, ह्मणजे ते हत्तीसारखे असतात. शु० सू०

दिवसेंदिवस पिकाची स्थिती वाईट होत चालली; सरकार सारा वाढत चालला व धान्य परदेशीं जाऊं लागलें, त्या मुळें शेतकीला वाईट स्थिति आली. इंग्लंडमध्यें शेतकऱ्यांना, हिंदुस्थाना इतकें स्वस्त धान्य देण्यास परवडत नाहीं. ह्मणून इंग्लंडचे प्रधान यांची कांहीं तरी सोय लावण्याच्या विचारांत आहेत. परंतु हिंदुस्थाच्या शेतीजी सोय कोण लावील? सरकारला कापडावर जकात ठेवून येथील गिरण्यांनां जमीनदोस्त करण्याचा प्रसंग येण्यापेक्षां हिंदुस्थानांतून जाणाऱ्या धान्यावरच जास्त कर ठेवल्यास सरकारास जास्त उत्पन्न होईल; धान्य परदेशीं इतकें जाणार नाहीं व इंग्लंड या शेतकऱ्यांनांही बरीच सोय होईल. पण अशा गोष्टी करण्यास सुचण्या इतकें हिंदुस्थानचें नशीब असलें पाहिजे ना?

कलकत्याकडे हल्लीं रात्रीं बरेंच दंव पडत असतें. पण दिवसा ऊन कडक असतें.

तुर्कस्थानची स्थिति अद्याप चांगली दिसत नाहीं. अनेक प्रकारच्या एकमेकांस विरुद्ध अशा बातम्या पिकत आहेत.

हल्लींचा जपानचा बादशहा हा आपल्या वंशाचा १२१ वा पुरुष असून, हा दोन हजार वर्षें एकसारखा राज्य करीत आहे, असें कळतें.

अक्षर संख्या— इंग्रजींत २६, फ्रान्सांत २३, इटालींत २०, स्पेनांत ७, जर्मनींत २६, सल्योनियनमध्यें २७, रुसींत ४१, लाटीन २२, यूनानीं २४, अरबी २८, इब्रानी २२, फारसी ३२, तुर्की ३३, आणि चिनी २१४. येणें प्रमाणें वेगवेगळ्या भाषेंत अक्षर संख्या असते. स० वि०

योगी—हल्लीं मुंबई येथें पंडित रामनारायण या नांवाचे कोणी बंगाली गृहस्थ आले आहेत. ते कालबादेवी रस्त्यावर हनुमान गल्लीचे समोर घर नंबर १७४ यांत उतरले आहेत. हे गहस्थ व्याकरण आणि न्यायशास्त्रांत निष्णात असून त्यांनीं योगशास्त्राचाही चांगला अभ्यास केलेला आहे व ते स्वतः योगी आहेत. ते कोणाही मनुष्याचे आयुष्यांतील भूत भविष्य सर्व गोष्टी सांगू शकतात. यांणीं अष्टसिद्धी साध्य करून घेतल्या आहेत असें ह्मणतात. ज्यांला ह्या गोष्टीची खात्री करून घेणें असेल त्यांणीं ही संधी घालवूं नये.

त्रावणकोर संस्थानचे युवराज केरळ वर्मा यांस ह्या आठवड्यांत मृत्यूनें गांठलें. मोठ्या दुखाची गोष्ट!!

थीबा राजांचे खर्चास कायमची रकम ठरवून देण्याबद्दल सरकारचा ठराव झाल्या प्रमाणें त्यांचे हातीं दरमाहा ३००० रुपये देण्यांत येणार त्यांत त्यांणीं आपला सर्व खर्च चालवावा अशी व्यवस्था झाल्याची बातमी आहे.

हैद्राबादच्या एका बड्या हपिसरांना सिमल्यास जाऊन तेथील अधिकाऱ्यांस लांच देऊं केल्याबद्दल एक प्रकरण उपस्थित झालें असून त्यासंबधानें तेथें फारच चळवळ होऊन गेली आहे.

अलवार संस्थानांतील एका पाद्रीसाहेबांची लीला चवाठ्यावर आली आहे. त्यांच्या कूर्तीत एक बाटलेली नेटिव बाई देवळांत गैरहजर राहिली ह्मणून पाद्रीसाहेबांस घुस्सा येऊन ते त्या बाईच्या घरांत गेले व त्यांणीं तिजवर चवदाव्या रत्नाचा प्रयोग केला. त्यामुळें ती आजरी पडून कित्येक दिवस दवाखान्यांत होती. ह्या लीलेबद्दल चौकशी करण्यास आतां एक कमिशन बसलें आहे. स. शो.

संसार हा स्त्रियांचा आहे. त्याविषयींचें पूर्ण स्वामित्व त्यांच्या हातीं आहे. स्त्रियांनीं संसार करावा आणि पुरुषांनीं फक्त त्याचा सुखानुभव घ्यावा. ज्याला स्त्रीसुख नाहीं त्याला संसारसुख नाहीं. संसार संबंधीं पुरुषाचें खरें कर्तव्य इतकेंच असतें कीं त्यांनीं संसारपोषण करावें; पण संसाराची मांडणी करण्याचें काम त्याचें नव्हे; तें स्त्रियांनींच केलें पाहिजे.

" जी खरी गृहिणी आहे तिला आपल्य घरासंबंधीं औदासिन्य व निर्ममत्व हीं कधींही असत नाहींत. ती रात्रंदिवस मोठ्या उत्साहानें व आनंदानें आपलीं गृहकृत्यें करिते तिचें घर ह्मणजे लहान मोठ्या वस्तूंचें एक छोटेसें प्रदर्शन. ज्याप्रमाणें प्रदर्शनांतील पदार्थ मोठ्या व्यवस्थेनें व काळजीनें ठेविलेलें असतात. त्याप्रमाणें तिच्या घरांतील सर्व वस्तू पद्धतशीर ठेविलेल्या असतात. घरांत पसारा ह्मणून कधीं दृष्टीस पडावयाचाच नाहीं. स्वयंपाकघरा पासून पुढच्या ओसरीपर्यंत जिकडे पहावें तिकडे स्वच्छता व नीटनेटकेपणा यावांचून दुसरें कांहींही नजरेस पडावयाचें नाहीं. तिला असें वाटतें कीं संसार हेंच सर्व सुखाचे निधान या जगांत परमेश्वरानें करून ठेविलें आहे. " संसार हा निःसार त्यांत मनुष्याला काडीचेंही सुख नाहीं " असें जें कित्येक स्त्रीपुरुषें ह्मणतात तें तिला सर्व खोटें वाटून तो तथ्य पूर्ण असून मनुष्य मात्राला ज्ञान देणारा आहे, असें ह्मणून ती उत्तरोत्तर त्यांची वाढ करण्याच्या हेतूनें आपल्या जिवापाड श्रम करितें. आणि गृहसुखाला अत्यावश्यक अशा गुणांचा ती संचय करिते, गृहिणीपदारूढ ज्या स्त्रिया होतात त्यांनीं प्रथमतः येवढें लक्षांत ठेविलें ह्मणजे पुरे आहे कीं, घर म्हणजे " जनावरांचा गोठा " नसून तें या जगांत लागणाऱ्या गोष्टी शिकण्याचें एक विद्यालयच आहे त्याची दिवसें दिवस सुधारणा करावी आणि त्याचा कुरूपपणा सर्व नाहींसा करून त्याचें रूप पाहाणाराला आनंद देईल इतकें चांगलें व मोहक करावें. जी गृहिणी आपलें घर म्हणज आपल्या ताब्यांतील एक राष्ट्रच आहे असें समजतें, व त्या राष्ट्रांतलि प्रजा [ कुटुंबांतील सर्व लहान थोर मंडळी] आपणावर अनुरक्त असावी अशी तिची इच्छा असतें, तिनें तें घर चांगलें वागविलें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

चांगला शक्तिवान मोठा मनुष्य साधारण मानानें चोवीस तासांत ४००० घन इंच इतका आक्सिजन आपल्या पोटांत घेतो. व त्याचप्रमाणें तितक्या अवधींत तो कॉर्बानिक आसिड ग्यासही तितकाच बाहेर टाकितो. क०

जर्मनसरकाराशीं इतर राजांचें वर्तन मित्रत्वाचें आहे. चीन व जपानची लढाई बंद पाडण्या करितां जर्मनी, राशिया व फ्रान्स यांच्या मध्यस्तीस यश आलें व त्या बद्दल जपानचे आभार झाले. या शांततेनें जर्मन व्यापारात उत्तेजन येईल. टर्कीकरणाबद्दल विचार पडला आहे व त्या कामांत आपली राज्यपद्धत संभाळून आपल्या मित्रराष्ट्रांस मदत करण्यास व शांतता राखण्यास जर्मनी तयार आहे असें जर्मन बादशहाचें ह्मणणें आहे. ठा० अ०

झाडाचा व आकाशांतल्या ग्रहांचा निकट संबंध आहे, असें दिसतें. उत्तरअमेरिकेंत एका प्रकारचे वेळू आहेत, त्यां विषयीं असा अनुभव आला आहे कीं, ते पौर्णिमेच्या दिवशीं तोडिले, तर दाहा दाहा वीस वीस वर्षें टिकतात; आणि तेच वद्यपक्षांत तोडिले, तर ते अवघे दोन दोन तीन तीन वर्षें टिकतात! आमच्यांत झाडें तोडण्यास मुहूर्त पहात असतात, त्यांस जे कोणी नांवें ठेवीत असतील त्यांनीं ह्यांचा विचार करावा. न्या० सु०

ब्रिटिश सरकारांनीं श्रीमंत होळकर सरकार यांचे रिपोर्टास मान देऊन त्यांचे कारभारी रा. ब. बेदरकर यांस राजीनामा देण्याचें ठरलें. रायनानकचंद मुख्य प्रधान झाले.

प्रधानांत (१) सरदार नारायण राव भागवत (२) सरदार बापू साहेब (३) नामदार धुरंधर साहेब (४) राव साहेब गुप्ते (५) लाला विश्वेश्वरनाथ (६) रा. सा. बळवतराव पांडुरंग (७) रा. सा. केशवराव धोंडदेव कोतवाल. ( रा. मा. रा. ज. भिडे हे आहेत. महाराजांनीं या कौन्सिलास सर्व अधिकार दिले आहेत व आपण प्रकृतीस आराम होण्या करितां विश्रांति घेणार. न्या० सिं०

---

नोटीस

नोटीस बेशमी गणु वल्लद कोंडब सईतवाड रहाणार मोजे बोपोरी तालुके मूर्तिंजापूर जिल्हा उमरावती यस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुझी लग्नाची बायको असून लग्न झाल्यावर पंधरा दिवस पावेतों मी तुमचे येथें होते नंतर तुह्मी मजला न ठेविल्यामुळें मला आपले आईबापाचे येथें येणें भाग पडलें. माझी अज्ञान अवस्था होती तों पावतों याझें पालन पोषण माझ आईबापांनीं केलें. व मी सज्ञान होण्यास तीन वर्षें झालीं. व माझे आईबापाची गरिबी असल्यामुळें माझे निर्वाहा करितां मजला सावकाराचें कर्ज काढणें भाग झालें. हल्लीं मजला सावकार लोकांचें रुपये १५० अक्षरी दीडशें रुपये कर्ज झालें आहे. तें तुह्मी देऊन मजला घेऊन जावें. तसें न केल्यास मागील झालेल खर्चाबद्दल व पुढील अन्नवस्त्राबद्दल तुमचेवर ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसां नंतर फिर्याद करणें भाग पडेल अगर मागील कर्ज देऊन पुढें मला फारकत द्यावी. कळावें तारीख १५ माहे डिसेंबर सन १८९५ इ०

[ सही ]

निशाणी चिनी मर्दे गणु सईतवाड
रहाणार शिवर खुर्द ता० दर्यापूर हिचे हातची असे.

( ० )

---

☞ हें पत्र अकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ०८
सालअखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as.
Six monthly ... ... ... 3 „ 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०१०६
दुसरे खेपेस .... .... ०१

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX — AKOLA MONDAY 23 DECEMBER 1895 — NO 49

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख २३ माहे डिसेंबर सन १८९५ इ० — अंक ४९

### ज्याचा तो

( आमच्या एका मित्राकडून )

॥ दृश्यंते भुवि भूरि निंबतरवः कुत्रापि ते चंदनाः ॥
॥ पाषाणैः परिपूरिता वसुमती जात्या मणिर्दुलर्भः ॥
॥ श्रूयंते करटारवाश्च सततं चैत्रे कुहू कूजितं ॥
॥ तन्मन्ये खलसंकुलं जगदिदं द्वित्राः सखे सज्जनाः

#### उपोद्घात

कोणाही मनुष्याचा अनुभव किंवा त्याच्या नजरेस पडलेल्या गोष्टी सर्वांच्या उपयोगीं पडतील असें नाहीं परंतु एखाद्या मनुष्याचा अनुभव किंवा त्यानें पाहिलेल्या गोष्टी कांहीं मनुष्यांच्या मात्र उपयोगीं पडतील. कारण मनुष्यमात्रांचे सर्व मनोविकार आणि दुसऱ्या विषयींची कळकळ हीं दोन्ही एकाच व्यक्तीचे ठायीं सांपडावयाचीं नाहींत. परंतु थोड्या बहूत व्यक्तींच्या मनोविकारांचें प्रतिबिंब एखाद्या व्यक्तीमध्यें असण्याचा संभव आहे. ह्यावरून असें सिद्ध होतं कीं एखाद्या मनुष्यानें आपल्या आयुष्यांत ज्या गोष्टी पाहिल्या असतील त्यावरून त्यांचे स्वतःचे मनावर जो एक प्रकारचा ग्रह उत्पन्न झाला असेल तोच ग्रह त्या गोष्टी त्यांच्या समस्थितींत असणाऱ्यांना स्पष्ट व्यक्त दाखविल्यास त्यांचे मनावरही, उत्पन्न झाला पाहिजे असें ह्मणण्यास हरकत नाहीं अशा निरनिराळ्या पुष्कळ गोष्टी स्पष्ट करून दाखविल्यापासून प्रत्येक गोष्टींत पृथक पृथक गोडी उत्पन्न होते; आणि गोडी उत्पन्न झाली ह्मणजे त्या प्रत्येक गोष्टीचा एकमेकींशीं व मुख्य तत्वाशीं जो संबंध असतो त्या विषयीं विराळीच गोडी उत्पन्न होते.

#### मनुष्य स्वभाव

मानवी प्राण्यांमधील मित्रत्व आणि प्रीति यांपासून उत्पन्न होणारें सुख व साह्य, स्वहिता विषयीं मुळींच पर्वा न करितां परार्थसाधनतत्परता आणि मनःपूतं समाचरेत् या न्यायाला अनुसरून वर्तनक्रमाची अशक्यता वगैरे प्रमाणांच्या सत्यते बद्दल कितीही निःपक्षपात बुद्धीनें विचार केला तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं मनुष्य हा जे कांहीं करितो तें त्याला जसें योग्य दिसतें तसेंच करितो व त्याचें तसें करणेंच यथामति योग्य ही असतें. तथापि त्याच्या मनांतील हेतु दुसऱ्या कोणालाही समजण्याचा संभव नसतो. त्याचे स्वतःचे मनोविकार, त्याचें कर्तव्य व त्याचा अंत ह्या सर्व गोष्टींचा वाटा खऱ्या अर्थानें दुसऱ्या कोणालाही घेतां येत नाहीं.

एका ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं "मनुष्याच्या मनाचें निरीक्षण कितीही बारकाईनें केलें तरी त्याचा थाग लागत नाहीं. आजपर्यंत एकमेकांचें मन एकमेकाला कधींही कळलें नाहीं. मन कितीही मोकळें असेल तरी त्यावर एक प्रकारचा पडदा असतोच त्यामुळें त्याचें खरें स्वरूप दृष्टीस पडत नाहीं. हा पडदा दूर करण्यास आपण कितीहो प्रयत्न केला तरी तो व्यर्थ जातो दोन व्यक्तींचें अंतःकरण ह्मणजे त्यांचें मन यांचा कधींही पूर्ण मिलाफ होत नाहीं. अंतःकरणाचें दुःख अंतःकरणालाच माहीत असतें व त्याच्या आनंदाचा बोध परक्याला मुळींच होत नाहीं."

मनुष्याच्या अंतःकरणरूपी मंडपांत दोन दालनें असतात; एक बाह्य प्रदेश व एक अंतः प्रदेश. ह्या बाह्य प्रदेशांत प्रत्येक मनुष्याच्या कांहीं निवडक मंडळीस जाण्या येण्याची मोकळीक असते. परंतु अंतःप्रदेशांत कांहीं शेलक्या शेलक्या प्रियकर व्यक्तीस मात्र येण्याची परवानगी असते. ह्या दोन प्रदेशाच्या मागच्या बाजूस एक गाभारा असतो त्यांत स्वतःचा 'दिल' मात्र शिरूं शकतो हें एकांत स्थळ बाह्य तेजानें प्रकाशित नसून तें चोहींकडून बंद केलेलें असतें. हें स्थळ प्रत्यक्ष ईश्वराच्या अस्तित्वानें प्रकाशमान झाल्यावांचून तें स्वतःच्या दिलाला प्रकाशमान भासत नाहीं. ह्या ठिकाणीं असणाऱ्या दिलाला जें कांहीं वाटतें व माहीत होतें तें मनुष्यानें कधींहीं उघड बोलून दाखविलें नाहीं. कदाचित् तो तसें करण्याचा प्रयत्न करूं लागला तर त्याचे ओठातून शब्दच बाहेर पडेनातसे होतात.

एका कवीनें असें वर्णन केलें आहे कीं "ह्या जगांतील स्त्री पुरुष कितीही चांगलीं किंवा वाईट असोत, त्यांना जें खरें व योग्य वाटतें तें, तसेंच त्यांनीं जें ह्मटलें व केलें आहे, तींकोणकोणत्या तऱ्हेनें वागलीं व त्यांच्या मनाला काय काय लागलें हें सर्व त्यांनीं रात्रीं किंवा दिवसा थोडें बहूत देखील लिहून ठेवण्याचें धारिष्ट केलें नाहीं."

आपले मनांतील गुह्य दुसऱ्यास सांगण्याची आपली मनापासून इच्छा असली तरी आपल्या मनावरील पडदा कायम आहे तोंपर्यंत तसें करणें अगदीं अशक्य आहे. एखाद्या ममताळू आईला आपल्या आयुष्यांतील निरनिराळ्या प्रकारच्या अनुभवामुळें आपलें मन कसकसें बदलत गेलें हें आपल्या तान्ह्यामुलाला सविस्तर फोडून सांगतां येईल काय? डोळस माणसाला आपल्या सभोंवतील दृष्टीस पडणाऱ्या सृष्टीच्या रम्य शोभेचें चित्र उपजत आंधळ्या मनुष्याचे मनावर हुबेहूब कसें उठवून देतां येईल! त्याचप्रमाणें निरनिराळ्या राष्ट्रांतलि मनुष्यांना एकमेकांच्या भाषेचें अपुरतें ज्ञान असल्यास एकमेकांशीं पाहिजे तितकें संभाषण मोकळेपणें कधींही करतां येणार नाहीं.

प्रत्येक मनुष्याचे अनुभव सारखे नसून त्याच्या आशाही विलक्षण असतात; व तो आपल्या समजाप्रमाणें त्यांना स्वतःचाच कांहीं विवक्षित अर्थ लावितो. ह्मणून एका मनुष्याचें मन पूर्णपणें ओळखण्याचें कामांत दुसरा मनुष्य बहिरा, आंधळा किंवा कमी बुद्धीचा आहे असें ह्मणावें लागतें. आपणां पैकीं कोणाचेंही मनोगत ह्या जन्मांत तरी कोणासही पूर्णपणें समजत नाहीं, शिवाय आपलें हृद्गत दुसऱ्याला कळावें अशी आपली इच्छाही नसते. आपल्या आंगचे चांगले गूण दुसऱ्याच्या नजरेस अधिक चांगल्या रीतीनें आले ह्मणजे आपणाला आनंद होतो. तसेंच ज्यावर आपली विशेष मर्जी असेत त्यांना आपल्या मनांतील उत्कृष्ट बेत व इच्छा हीं कळावींत अशीही आपली फार इच्छा असेत.

आपणां पैकीं बहुतेकांना नेहमीं असें वाटत असतें कीं ज्यांवर आपण विशेष ममता करितों त्यांच्या संबंधानें आपले चांगले हेतु आणि त्यांचें बरें होण्या विषयीं आपली निष्काम व मनापासून खटपट हीं सर्व त्यांच्या दृष्टीस पडून आपणा विषयीं त्यांचें मत चांगलें व्हावें. परंतु आपले दुष्ट विचार, नीच कल्पना आणि अयोग्य समज हीं सर्व व्यंगें दुसऱ्या मनुष्याला किंवा आपल्या अति जिव्हाळ आणि आपलीच तरफ घेणाऱ्या मित्राला देखील उघडपणें कळून यावींत अशी कोणाचीच इच्छा नसते. ह्या वर सांगितलेल्या दुर्गुणा विषयीं प्रत्येक मनुष्याची दृष्टि अंध होते

एखाद्या मनुष्याच्या वर्तना विषयीं चार लोकांचा कांहीं एक प्रकारचा ग्रह पक्का झालेला असून त्याच मनुष्याचे हातून कांहीं विपरीत घडलेलें आपल्या दृष्टीस पडलें ह्मणजे आपण आश्चर्यचकित होतों व आपले तोंडांतून असे उद्गार निघतात कीं "अमुक अमुक मनुष्य अमुक करील असें मला कधींही वाटलें नव्हतें." ह्यावरून असें उघड दिसतें कीं जे लोक आपणां भोंवतीं रात्रंदिवस असतात त्यांच्या वर्तनांतील रहस्याविषयीं आपण अगदीं अज्ञानी असतों. कित्येक मनुष्याच्या चेहऱ्यावर शांतपणाची जी झांक दिसते ती खरी नसून कोळपलेल्या निखाऱ्यावर जमलेल्या राखेच्या आवरणा प्रमाणें असेत तसेंच मनुष्यानें ओढून ताणून आणलेलें हास्यवदन व त्यावरील टवटवी हीं जलप्रवाहाच्या पृष्ठभागावरील परावर्तन पावलेल्या सूर्यतेजा प्रमाणें असतात. असा प्रवाह बाह्यात्कारी जरी स्थिर दिसतो तरी त्याचे खालून पाण्याचा लोट अप्रतिबद्धपणें वाहत असतो. ह्या प्रमाणें वरील प्रकारच्या मनुष्याचे मनांत नानाप्रकारचे कुत्सित विचार चालू असतात.

ज्यांचा संबंध आपणांशीं अगदीं निकट असतो त्यांचेंही वर्तन आपणाला पूर्णपणें खरोखरच कळत नाहीं. कारण कांहीं लोक आपल्या समजुतींपेक्षां वास्तविक जास्त योग्यतेचे असतात व कांहीं आपल्या समजुती पेक्षां खरोखरच फार कमी योग्यतेचे असतात. ज्या मनुष्यांशीं आपलें दळणवळण फार असतें व ज्यांशीं फक्त कांहीं कामानिमित्त आपली नुसती ओळख असते अशा दोन्ही प्रकारच्या मनुष्यांनां वरील नियम सारखाच लागू पडतो. त्याचप्रमाणें आपण दुसऱ्यांच्या दृष्टीनें कसे दिसतो व आपणांविषयीं त्यांचा ग्रह कोणत्या प्रकारचा बनत जातो ह्या गोष्टीलाही हाच नियम लागू पडला पाहिजे व तो पडतोच.

एक इंग्लिश कवी ह्मणतोः—

We hold our dear ones with a firm strong grasp;
We hear their voices, look into their eyes,
And yet betwixt us in that clinging clasp a distance lies.

मनुष्याच्या अंगीं ज्ञान जसजसें जास्त असतें, तसतसा तो दुसऱ्या लोकांना पूर्णपणें ओळखला ह्मणजे समजला जाण्याचा संभव कमी होत जातो, आणि ह्मणूनच तो आपले मन दुसऱ्याजवळ पूर्णपणें उघडें करण्यास चपापतो. लहान डबक्याचा अंत पाहणें सोपें आहे. परंतु महासागराचा अंत पाहण्यास कोणीही समर्थ नाहीं. जो मनुष्य मनानें मोकळा पण ज्ञानहीन असतो त्याचें मन सर्वांना माहित होतें. परतु ज्याचें मन गहन विचारांनीं आणि ज्ञानामृतांनीं गच्च भरलें आहे त्याचें मन ओळखणें फारच कठीण असतें. ढोंगी आणि उद्धट स्वभावाच्या माणसांशीं गंभीर आणि कोवळ्या अंतःकरणाच्या माणसांची तुलना केली तर दुसऱ्या वर्गांतील लोक जगांतलि लोकांच्या मनांत चांगलेसे भरत नाहींत व ते नेहमीं एका बाजूस पडलेले राहतात.

'एमरसन' नांवाच्या एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं "ज्या लोकांना जगांतील गैर व्यवहार सहन होतो ते लोक लोखंड, क्षार, हवा, पाणी वगैरे मध्यम प्रतीच्या वस्तू प्रमाणें मानले पाहिजेत परंतु "पोट्याशियम सोडियम" वगैरे धातु असे आहेत कीं ते शुद्ध राखण्याकरितां 'न्यापृथा' नावाच्या तेलांत ठेवावे लागतात.

टीप—रसायन शास्त्राच्या नियमाप्रमाणें लोखंड, हवा पाणी ह्यांना शुद्ध ठेवण्याकरितां आपणांला कांहीं विशेष करावें लागत नाहीं. कारण अशुद्ध हवा व अशुध्द पाणी हीं रोज किती उत्पन्न होत असतील ह्याचा आजमास देखील करवत नाहीं. परंतु शुद्ध हवा किंवा पाणी हीं कधींही नाहींशी झालीं नाहींत. ज्या प्रमाणें मिठांत एखादा पदार्थ ठेविला असतां तो नासत नाहीं तद्वत न्यापृथा नांवाच्या तेलांत वरील पदार्थ ठेविले असतां अशुद्ध होत नाहींत.

वरील उदाहरणावरून असें सिद्ध होतें कीं उत्कृष्ट लोकांवर त्यांच्या स्वाभाविक एकलकोंडेपणाचा आरोप येतो कारण त्यांच्या बुद्धीला एकलकोंडेपणाची जरूरी वाटते. वरील प्रमाणास रसायन शास्त्रांत एक उत्तम उदाहरण आहे तें असें—ज्या मनु-

ष्याचे आंगांवर विजेचा प्रयोग केला असेल त्याला आपल्या अंगांतील वीज कायम राखण्याकरितां जमीनी पासून अलिप्त राहिलें पाहिजे. ह्मणजे त्याला काचेच्या मेजावर बसावें लागतें. नाहीं तर त्याचे अंगांतील वीज जमिनींत निघून जाते. तद्वत वरील लोकांना निराळेंच राहावें लागतें.

आपला दिल दुसऱ्याला न देणें हें बऱ्याच अंशीं आपलें कर्तव्य आहे. कोंवळ्या मनाचे आणि सरळ मार्गानें जाणारे लोक हें वरील कर्तव्य मोठ्या दक्षतेनें बजावतात. लार्ड बेकनचें असें ह्मणणें आहे कीं, "नग्रपणा हा शरीरास जसा अप्रशस्त आहे तसा मनासही आहे. जर मनुष्यांचीं कृत्यें व त्यांचें वर्तन हीं सर्वांशींच उघड नसतील तर त्या मुळें त्यांस कमी सन्मान मिळतो असें नाहीं. बडबडीं आणि क्षुल्लक माणसें बहुधां डोळी असून भोळीही असतात. कारण जो मनुष्य माहीत असलल्या गोष्टी विषयीं बडबड कारितो तो, त्याला जें माहीत नाहीं तें देखील बोलून जाईल. ह्मणून असा एक नियम निघतो कीं एखाद्या गोष्टीची वल्गना करण्याची संवय नसणें हें शहाणपणाचें व सदाचरणाचें दर्शक आहे." वास्तव आंपल्या परममित्राच्या चर्येवरूनच त्याचें इंगित आपणांला जाणतां येत नाहीं, ह्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. त्यांच्या वागणुकींत आपणाला जें दिसतें किंवा समजतें त्याच्याहि पलीकडे त्यांच्या वागणुकांत व मनाच्या कलांत जें गूढ असतें तें त्यांच्या आंगच्या मोठेंपणाचें व्यंजक असतें. कारण त्यांची वागण्याची तऱ्हाच अशी स्वतः सिद्ध असते कीं ती आपणाला मुळींच समजत नाहीं. त्यांच्या अंगीं ह्या गुणांचें प्राधान्य असल्या मुळें त्यांची इच्छा असली तरी त्यांस आपलें हृद्गत तोंडाबाहेर काढवत नाहीं. ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याचे मनोविकार आणि वर्तन हीं ज्याच्या त्याच्या तबियती प्रमाणें असतात त्याप्रमाणें त्यांचें कर्तव्य आणि तत्संबंधी परिणाम हींही ज्याची त्यालाच लागू असतात- कोणत्याही मनुष्याचें कर्तव्य त्याच्या ऐवजीं दुसऱ्याला करितां येत नाहीं. उदाहरणार्थः— ज्या मनुष्याचें वजन चोंहींकडे चांगलें आहे तो आपल्या मुलांकरितां एखादी नौकरी पाहून ठेवील; परंतु त्याला स्वतःला आपल्या मुलाबद्दल ती नौकरी बजावतां येणार नाहीं. अथवा मुलगा अयोग्य असल्यास त्याला तो योग्य करितां येणार नाहीं. ह्मणून ती नौकरी करण्यासंबंधानें ह्मटलें तर ती मुलाची मुलालाच करितां आली पाहिजे. आपल्या मित्रांनीं अमुक एका गृहस्थाची प्रीति व मर्जी संपादन करावी असें आपणांस वाटत असल्यास त्यांना तसें करण्यास लावण्यासाठीं आपण असमर्थ होऊन जातो. अशा विषयीं आपण एकाद्याची विनवणी केली तरी देखील ती निष्फळ होते; अथवा लोकांना मनुष्यांची पारख करितां येत नाहीं, किंवा त्यांना त्याची गोडी नाहीं ह्या बद्दल आपण पुष्कळ रागावलों तरी फलप्राप्ति होणें कठीणच.

यास्तव आपण स्वतः जें जें करितों, जें नफा नुकसान सोसतो आणि जो विश्वास आणि प्रीति संपादन करितों ह्या सर्व गोष्टी संबंधानें आपण आपणावरच अवलंबून राहिलें पाहिजे. ह्याच प्रमाणें दुसऱ्यांलाही करावें लागतें. आपण दुसऱ्याला जसें करितों व दुसरे आपणांला जसें करितात त्या बद्दल सर्वांनांच ज्यांच्या त्यांच्या मानाप्रमाणें फलप्राप्ति होते. कारण ह्या जगांत आपण एकटेच आलें; जें करितों तेंही आपण एकटेंच करितों. व त्या बद्दल सुख अगर दुःख जें भोगावयाचें तेंही आपणास एकट्यासच.

एक कवि ह्मणतो—

आपण वावटळींत सांपडून एकदम जात नाहीं किंवा उन्हाळ्यांतील उष्णतेच्या कडाक्यांत अथवा मेघगर्जनेच्या सपाट्यांत नाहींसें होत नाहीं. पण जी आनंदभूमि कोणालाही माहीत नाहीं अशा ठिकाणीं आपण एका मागून एक जात आहों.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध ७ शके १८१७

ज्याचा शेवट गोड तें गोड. अखेरीस पुण्यास राष्ट्रीय सभेची व्यवस्था उत्तम बनली हें कळविण्यास मोठा संतोष वाटतो. व्यवस्थापक मंडळीचें काम ज्यांस आवडलें नाहीं त्यांनीं सभेचा सुमुहूर्त अगदीं समीप आला असें पाहून मौनव्रत धारण केलें. येत्या आठवड्यांत पुण्यास राष्ट्रीय सभा भरणार हें अगदीं पक्कें आहे आणि पुणें मुक्कामचा हा समारंभ मागील समारंभा प्रमाणेंच टोलेजंग होईल असा रंग दिसतो. सर्व कार्यें निर्विघ्नपणें पार पडलीं असें एकदां सर्व लोकांस कळलें ह्मणजे सर्व देश आनंदानें डुलेल यांत काडीमात्र शंका नाहीं.

---

राष्ट्रीय सभेचे जनक मि. ह्यूम यांनीं गेल्या 'इंडिया' च्या अंकांतून एक पत्र इंडियांतील मित्रमंडळीस धाडलें आहे. सर्व राष्ट्रभक्तांनीं रात्रंदिवस या पत्राची एक स्मरणी ठेविली पाहिजे. यांतील सर्व मजकूर बोधप्रद असून त्या पासून त्या थोर महात्म्याची उदार अंतःकरणवृत्ती आपोआप दिसून पडते. त्यांच्या लिहिण्याचा भावार्थ असा आहे कीं हल्लींचें प्रधान मंडळ अति वाईट आहे. ही कान्सरव्हेटीव मंडळी सुधारणेला अगदीं प्रतिकूळ आहे. ही मंडळी सत्ताधारी झाल्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांनीं वेळेवर जागें झालें पाहिजे. सर्व राष्ट्रवाल्यांनीं पूर्वीं पेक्षां अधीक नेटानें व मनोनिग्रहानें आपली राजकीय चळवळ चालू ठेविली पाहिजे. या आणिबाणीच्या प्रसंगीं राष्ट्रीय सभेचा फंड भरपूर भरलेला पाहिजे. ही वेळ मागें पुढें पाहण्याची नाहीं. ही मोहिम आपण मोठ्या कौशल्यानें व एकोप्यानें जिंकिली पाहिजे. सर्व राष्ट्रवाल्यानीं आपल्यां मधील दूही मोडली पाहिजे. लढाईच्या वेळीं सर्वजण खांद्याला खांदा जोडून, हातांत हात घालून व एक दील ठेवून सामना देतील तेव्हां कानसरव्हेटिव प्रधान मंडळीच्या पुढें इंडियाचा निभाव लागेल.

आपलीं राजकीय मतें आपण जोरानें व धीटपणानें प्रतिपादित केलीं पाहिजेत. राज्यकारभार चालविणारी जी अधिकारी मंडळी आहे तिच्या भालेरावीला जुमानता कामा नये. राज्यकर्त्यां मंडळी मध्येंच आपल्या लोकांची कळकळ बाळगणारे कांहीं हरीचे लाल आढळतील. त्यांचा पक्ष आपल्या मदतीनें भक्कम झाला पाहिजे. हल्लीं ब्रिटिश राज्याच्या किर्तीला काळिमा आणण्यासारखी जी उधळपट्टी, अन्याय व नेटिवांच्या हक्कांची पायमल्ली, हीं चाललीं आहेत त्याला प्रतिबंध करण्या इतकी आपली मजबुती पाहिजे सांप्रतच्या राज्यव्यवस्थेचा ओघ बदलल्या शिंवाय आपण स्वस्थ बसतां कामा नये. हल्लीं जी निकराची वेळ बेतली तिला सर्व राष्ट्रवाल्यांनीं सज्ज झालें पाहिजे. सर्व जणांनीं आपली राजकीय चळवळ जोरानें केली पाहिजे. धैर्यानें, प्रसंगावधानानें, मैत्रीनें व दूरदर्शी शहाणपणानें आपलें पाऊल पुढें टाकावें आणि नंतर तें कधींही मागें घेऊं नये. अशा राजकीय कार्यांत यश संपादण्याच्या मि० ह्यूम यांनीं चार गुरुकिल्या दाखविल्या आहेत त्या अशाः— अव्याहत प्रयत्न, एकजूट, धैर्य, व भूतदयांकित शहाणपण. या चार गोष्टी एकत्र झाल्या ह्मणजे तुकाराम एका अभंगांत ह्मणतात त्या प्रमाणेंः—

सत्यसंकल्पचा दाता भगवान
सर्व करी पूर्ण मनोरथ ।

---

पुण्याची कांग्रेस कमेटी राष्ट्रीय सभेची रचना पायाशुद्ध व कायदेशीर करण्या साठीं यंदाच्या बैठकीला एक कायद्याचा मसूदा आणणार आहे. हें बिल फार चांगलें आहे आणि हेंच बहुतकरून थोड्या बहुत फेरफारानें यथाशास्त्र पसार होईल असें वाटतें. पुन्हां या बिला संबंधानें समग्र हकीकत द्यावयाची आहे तेव्हां या खेपेस फक्त त्या बिलांत राष्ट्रीय सभेचे जे आरंभीं उद्देश दिले आहेत ते मात्र खालीं देतोंः— [१] ब्रिटिश सरकारच्या छत्रा खालीं जेवढी इंडियांत प्रजा आहे तिच्यामध्यें राजकीय शिक्षणाचा प्रसार करणें. [२] राजनिष्ठा व एकराष्ट्रत्व हीं वाढविणें, [३] हिंदुस्थान सरकारच्या राज्यकारभारांतील व कायदेकौंसिलांतील गोष्टी संबंधानें व तसेंच कोणत्या ही सार्वजनिक गोष्टी संबंधानें लोकमत सर्व बाजूंनीं व स्पष्टपणें पण विचारपूर्वक व पद्धतीच्या अशा मार्गानें कळविणें [४] इंडियाच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्या संबंधानें इंडिया- सरकारास व पार्लमेंटास अर्ज करणें, कांहीं मंडळी धाडून तिच्या कडून इंडियांतील प्रश्नाविषयीं इंग्लिश मत अनुकूल करविणें, आणि वर्तमानपत्रद्वारा व व्याख्यानांनीं अशाच गोष्टी करणें; [५] पार्लमेंटांतील इंडियन कमिटीच्या कामाला मदत करणें व विलायतचे लोकांस व वर्तमानपत्रकर्त्यांस आपल्या पक्षाकडे वळविणें. आणि [६] ब्रिटिश कांग्रेस कमिटी नांवाची एक संस्था इंग्लंडांत चालू ठेवणें व पैशानें व माहितीनें तिला मदत करणें.

---

राष्ट्रीय सभे प्रमाणें सामाजिक सभेचीही तयारी टोलेजंग झाली आहे. सामाजिक सभेच्या मंडळीचा व्यूह निराळा, तिचा मंडप निराळा व तिची कार्यमाला निराळी असा प्रकार भासविण्याचा कांहीं पत्रकर्त्यांनीं प्रयत्न केला आहे पण प्रश्न एवढाच कीं सामाजिक सभेंतील मुख्य मुख्य लोक नव्हेत काय, स्थलभेदानें सर्व संबंध खरोखर तुटला काय, आणि सर्व सुधारणेच्या बुडाशीं सामाजिक सुधारणा नाहीं काय? सुधारणा जर पाहिजे आहे तर तिचा अंतरात्मा राष्ट्रीय सभा व सामाजिक सभा या दोन संस्थांनीं बनलेला आहे ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. पाहिली लोकसंस्था आहे तशीच दुसरी लोकसंस्था आहे. आणि योग्य कालांत उभय संस्थांची खरी किंमत कळून येईल आणि जो तेजःपुंज हिरा स्वयंप्रकाशानें दृष्टीगोचर होणार आहे तो डोळसांस दाखविण्याचा प्रयत्न करण्याची जरूरी नाहीं आणि अंधास सर्व जगच आंधळें आहे तेथें प्रयत्न चालणारच नाहीं. असो, एकंदरीनें सामाजिक सभा पुण्यास निभावेल असें वाटतें आणि ही तरी गोष्ट कमी आनंदाची नाहीं.

---

कपड्यावरील जकातीचा इतिहास अत्यंत बोधप्रद आहे. बोध म्हणून इतकाच कीं राज्यकर्ते कायदे कौंसिलांत देखील आपलीच झोटिंगशाई कशी चालवितात ती ध्यानांत धरली पाहिजे. असला शिरजोरपणा कायदे बनविण्याच्या टांकशाळेंत होऊं नये, तेथें कौंसिलाच्या नांवालौकिकाला युक्त व विहित जो मार्ग दिसेल त्या मार्गानें मतप्रकाशन होत जावें आणि बहुमतानें कोणताही कायदा पसार व्हावा असें सर्व इंडियन राष्ट्राचें ह्मणणें आहे. पोलिस आक्टांत सुधारणा झाली त्यावेळीं कौंसिलांत किती तऱ्हेनें नामदार फेरोजशाहा मेथा यांनीं कंठशोष केला पण शेवटीं स्टेट सेक्रेटरीचा हुकूमच असा आहे ह्मणून कौंसिलांतील सरकारी चाकर कौंसिलदारांनीं आपली चाकरी चालू राहण्यासाठीं सरकारच्या विचाराप्रमाणें आपलें मत दिलें आणि त्यांचाच भरणा अधीक असल्यामुळें बहुमत सरकारचेंच झालें. कायदे कौंसिलाची रचना चुकीच्या पायावर झाली आहे. कौंसिलांतून लोकनियुक्त प्रतिनिधींची संख्या अधिक केली पाहिजे आणि स्टेट सेक्रटरीच्या हुकूमाचें अश्रुतपूर्व तत्व नवीन उद्भवलें आहे तें लयास पोंचविलें पाहिजे. यंदा राष्ट्रीय सभेपुढें हा प्रश्न निघणार आहे त्यावेळीं या विषयाववर चांगला खल होईल आणि नंतर सरकाराकडे राष्ट्रसभेचा ठराव अर्ज रूपानें मान्यतेसाठीं धाडण्यांत येईल. ही गोष्ट जितकी लवकर फलद्रूप होईल तितकी चांगली होय.

---

मद्रासच्या महाजन सभेनें लार्ड एलजिन यांस मानपत्र देण्याचाच विचार रद्द केला. ही गोष्ट उत्तम केली ज्या संस्थेची लार्ड एलजिन यांस पर्वा नाहीं तिनें लाट साहेबांची तरी कां परवा धरावी? खरोखरच 'महाजन सभे' च्या मानपत्रांत अपवाद घेण्यासारखें आह्मास कांहीं दिसत नाहीं. राजकर्त्यांस अशा राजकीय [illegible]नीं आपला अभिप्राय कळविला, लोकदृष्टीनें कांहीं सल्ला सांगितला व राज्यकारभारांत-

ल्या दोषांचा स्फोट राजनिष्ठपणें व विहित मार्गानें केला तर काय अपराध घडला हें आम्हास कळत नाहीं. लार्ड एलजिन यांस मानभंग किंवा मानहानी वाटण्यासारखा मान पत्रांत कांहींच भाग नव्हता पण अपवाद विनाकारण घेतला आहे तर सरकार मायबाप आहेत. आणि सुखेनैव वाटेल तें मानोत अशी मनाची समजूत घालून स्वस्थ राहिलें पाहिजे.

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 23, 1895

## THE FORTH—COMING CONGRESS

The hands of the dial do not move back. There were many who predicated that the meeting of the Congress at Allahabad would be the the last. But they had been sorely disappointed. There are also many now who are apprehensive lest this year's Congress would be a complete failure. But in the course of this week far from showing any signs of decaying vitality, it promises to be even more vigorous than ever; and certainly the programme for this year, the number of persons that will in all probability attend, and the spirit that pervades the specious premises of the Congress Camp are by no means indications of the national movement coming to an early or premature end without accomplishing some solid and substantial result. Disparaging remarks will no doubt be made and continue to be made, we can imagine, for the protracted series of years, during which it will continue to meet, discuss public questions and promote unity and national sentiment among the communities of this country. As long as this country is subject to the rule of the British people there will be a conflict of interest between the native population and the alien residents and this conflict we are afraid will inevitably bined a deal of misunderstanding. It is the main object of the Congress to give a clear, lucid, and pervious shape to what every body wishes and to have such wishes gratified. The end is noble in as much as our rulers will have opportunities to judge that the feeling of the people is not hostile to them but akin to theirs. They will also be able to judge what conduces most to the ad—ministration of this country on a sound and normal basis.

Apart from these considerations we only propose forecasting if this year's Congress will be a success. The slight party feeling evinced in the beggining has been lulled into repose. Reaction has set in. The ground for discord has been removed. Other trivial animosities which unfortunately Poona abounds in have also been sensibly suppressed for a time. The preparations are vigorous and the national cause will outvie its previous zeal. Just as a concord is pleasant after discord in music so in our feeble politics the early discord will render the cause of the Congress still more popular and vigorous. Thus far this week. It will be unwise to dwell at length on things in embryo.

Recently the Revenue officers had to decide a practical question as to whether the dates on which the land-revenue is payable need a change under the present circumstances incidental to agriculture Our popular Deputy Commissioner Mr. Hare has well discussed it in his last revenue report of this district. So far as a change in the dates of payments of the land-tax is concerned we think his opinion is very sound and is grounded on a matter of fact. He remarks:—

"I find that in 1893 94 the Balapur ryots paid up 97.5 per cent., and those of the Khamgaon taluk 96.1 per cent. of the rent due on their late crop two months before they need have done so. We have very perfect arrangements for levying the rent according to the time of ripening of the kind of crop borne by the land, and though the ryots have to depend upon what the village officers give out for the exact amount payable at each instalment, most of them know pretty well about how much they can be forced to pay by the 15th. February. It is understood that no compulsion is to be employed to make them pay in advance; and the absence of complaints on the subject shows that the prepayment is not a forced one, and that it suits the ryots, as a rule, to pay off the Government demand when the cotton and jowari crops come to market. I only heard of one complaint on the subject during the year. * *

Assuming then, as I think we may, that the ryots who pay the *rabi* instalment in advance do so generally of their own free will, it seems rather a striking fact that in a year when the harvest was below the average, and which followed on two other bad years, the crop of the jowari and cotton fields should have been able to pay for so much (80 per cent. on the whole district) of the fields sown with other crops. But it must be remembered that the proportion which the area under winter crops bore to that under autumn crops was much smaller than usual during the year under report."

## वऱ्हाड

या जिल्ह्यांत इंग्रजी पैसा हें नाणें पुष्कळ कमी झालें होतें आणि त्यामुळें लोकांस मोठा त्रास होता परंतु मे. हेअर साहेब यांनीं ताबडतोब व्यवस्था करविल्यामुळें आत खुर्दा पुष्कळ झाला आहे.

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर सिव्हिल जज्ज आकोला यांची स्वारी पुण्यास किरकोळ आठ दिवसांच्या रजेवर गेली आहे.

हल्लीं येथें सेशन कोर्टांत नागझरीच्या डाक्याचा खटला चालू आहे. प्रासिक्युशन तर्फे रा. रा. बळवंत बाळकृष्ण मुळे बी. ए. हे असून आरोपी तर्फे रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई आहेत. राजश्री मुळे हे वेळांत वेळ काढून स्मालकाजचेंही काम चालू ठेवितात व बिनभानगडीच्या मोकद्दम्यांतील पक्षकारांचा खर्च व वेळ वाचवितात ही संतोषाची गोष्ट होय.

यंदा मुंबई युनिव्हरसिटीच्या बी. ए. परीक्षेंत वऱ्हाडांतील रा. रा. गोविंद कृष्ण पर्वत हे दुसऱ्या वर्गांत पसार झाले.

म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत वऱ्हाडांतील खालील विद्यार्थी पसार झालेः—

अकोला हायस्कूल

वामन केशव घोगे
रघुनाथ गोविंद दामले
भिकाजी रघुनाथ टिपणीस
वासुदेव गंगाधर नेने
शंकर विष्णु तारे
बळवंत रामकृष्ण गाडगीळ
नारायण शिवराम क्लार्क, जि० बोर्ड [ प्रायव्हेट ]

उमरावती हायस्कूल

ब्रह्म. के. वा, जयवंत. द. भा, कमळकर, कर्वे. स. मो, केसकर ज. अ, कौठेकर. गोपाळ ना. क्षीरसागर. ग. वा, कापसे श्री, पंत. वि. दे. संजाना. जे. ई. सहस्रबुद्धे भा, ढिकले. सो.

मि० ब्रुलक कमिशनर हे कापशी तलाव पाहून काल रोजीं अकोल्यास आले व आज उमरावतीस जाऊन २७।२८ तारखेस अकोल्यास पुन्हा येतील.

मि० हेअर साहेब हे नाताळच्या सुटी निमित्त दवऱ्यांतून अकोल्यास परत आले

पुण्याहून राव बहादुर श्रीराम भिकाजी जठार चेअरमन, कांग्रेस वर्किंग कमिटी हे कळवितात कीं डेलिगेटांच्या सोयी साठीं खालील रेलवे स्टेशनांवर त्या त्या ठिकाणच्या मदतीनें उपहाराची व्यवस्था करण्यांत आली आहेः

रायचूर, बार्शी रोड, कल्याण, भुसावळ मनमार, अहंमदनगर, बेळगांव, मिरज, आणि गोध्रा.

आकोला हायस्कुलांतील म्याट्रीक्युलेशन वर्गाचा संस्कृत विषय बंद केला जात नाहीं अशा विषयीं वैदर्भकर्त्यांनीं आश्वासन दिलें आहे.

आकोला हायस्कुलांतील विद्यार्थी राजश्री रघुनाथ गोविंद दामले यांस भाना शंकर शेटची दुसरी स्कालरशिप संस्कृत विषयांतील प्राविण्याबद्दल मिळाली हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो.

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाची वार्षिक बैठक यंदा आकोलें येथें भरण्याची असल्यावरून कालरोजीं येथील मेंबरांची टौनहालांत सभा भरून मि. दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर व मि. लक्ष्मण गोविंद ओक यास सेक्रेटरी नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. मोरो भिकाजी आगाशे हे फर्स्ट एल . एल . बीत पसार झाले आणि त्यांस त्या परिक्षेंच बक्षीसही मिळालें.

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | ९९॥- | | |
| ९ ,, दिवसांच्या मुदतीची | ९९॥- | | |
| सुवर्ण | २८ | रूपें | ९६॥ |
| मीठ | ३॥। | आळशी | ९५ |
| गहू कांठ | ६० | बनसी | ६९ |
| जवारी | ४५ | सर्की | ४॥ |
| तूप | ८। | तेल | ६।- |
| चणे | ६९ | तीळ | १००। |
| कपाशी ४९।४८ गावराणी | | रुई | ६५ |

सव्याचे भाव.

| | |
|---|---|
| जवारी फाल्गुन शुद्ध १५ | ४७॥ |
| रुई फाल्गुन शुद्ध १५ | ६३॥ |
| आळशी वैशाख शुद्ध १५ | ९५ |
| गहू वैशाख शुद्ध १५ | ६५ |

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि० कि० मु० नंबर १४ वर्ग १५

१८९५

दिपुटी कामिशनर साहेब इलिचपूर यांचे कोर्टांत

नांव— बनाई
मर्द— जानजी कुणबी
आणि गुजाई मर्द यादवजी कुणबी
रहाणार— शहापूर तालुके दर्यापूर
जिल्हा— इलिचपूर यांस मयत

गजाई मर्द विठुजी राउत रहाणार शहापूर तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचें मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख ९ मांह जानेवारी सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

ता० ९ माहे दिसेंबर सन १८९५ इ०

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur District

## वर्तमानसार.

दोन कोटीच्या नव्या नाटी पाडण्यास आमची संमती आहे असें मुंबई ब्यांक व मुंबईची व्यापारी मंडळी यांणी आपलें मत दिलें.

स्वामी विवेकानंद यांस दोन ख्रिस्ती अनुयायी मिळाले आहेत! त्यांनीं आर्यधर्माची दीक्षा घेऊन स्वामी सारखें पागोटें सुद्धां बांधण्याचें सुरू केलें आहे! स्वामी विवेकानंद यांस धर्मगुरु मानून चालण्यास पुष्कळ अमेरिकन तयार झाले आहेत! ख्रिस्ती धर्मांत तारण असून हे ख्रिस्ती लोक किमर्थ स्वधर्म त्याग करितात, याकडे ख्रिस्ती मिशनरींनीं अवश्य लक्ष्य दिलें पाहिजे.

जुलूम— बांकीपुराकडील एक तरुण गृहस्थ आपल्या नूतन विवाहित स्त्रीला बरोबर पालखींत बसवून घेऊन व आपण घोड्यावर बसून आपल्या गांवीं चालला होता. त्याच्या जवळ एक तरवार होती तिचा पास कोठें आहे असें त्याला वाटेंतल्या एका चौकीवरील पोलिसानें विचारलें त्यावर पास घरीं आहे असें यानें उत्तर दिलें. तेव्हां तो तूं घेऊन ये असें त्या पोलिस शिपायानें त्याला सांगितल्यावरून तो तरुण गृहस्थ घरीं पास आणण्याकरितां गेला. नंतर इकडे पोलिसांनीं पालखीच्या भोयांना दारूच्या बाटल्या आणण्याकरितां ह्मणून पाठविलें आणि ते निघून गेल्यावर त्या गृहस्थाच्या पत्नीवर बलात्कार केला इतक्यांत तिचा नवरा परत आल्यानंतर तिनें त्याला हा प्रकार सांगितला. तेव्हां त्या तरुण गृहस्थाला साहजीकच त्वेष येऊन त्यानें आपल्या तरवारीनें त्या पोलिस शिपायास व त्याला सोडविण्यास आलेल्या दुसऱ्याही एका पोलिसला छाटून टाकलें आणि स्वतः त्या भागाचे पोलिस सुपरिंटेंडेंटच्या स्वाधीन झाला. आतां हा खटला पाटणा येथील सेशन्स जज्जांसमोर चालावयाचा आहे.

दारू फजीतीची आई— सचीन संस्थानचे माजी नबाब साहेब परवां मुंबईस ग्रांट रोड स्टेशनावर उतरले; त्यावेळीं स्वारीनें खूप ठासली होती. प्लाटफार्मावर नबाब साहेब वेडेचार करूं लागले तेव्हां स्टेशनमास्तरांनीं त्याला युक्तीनें बाहेर काढून एक गाडी करून त्यांत बसविलें. परंतु स्वारीच्या चेष्टा चालल्या होत्याच. त्या पाहून लोकांची गर्दी झाली व हुर्यो होण्याची वेळ आली. तेव्हां झिंग्या नबाब साहेबांनीं गाडींतून उडी टाकून तलवार काढली. तेव्हां त्यांस धरून रेल्वे चौकींत नेऊन बसविलें व संध्याकाळच्या गाडीनें स्वारीची रवानगी परत सचीन येथें करून दिली. कोण फजिती ही ! ह्या दारूच्या पायीं अशी फटफजिती हरहमेष होत असतां शाहाणी मंडळीसुद्धां तिचें सेवन करून अब्रूची व शरिराची खराबी करून घेतात तेव्हां काय ह्मणावें !

जंगलासंबंधीं वटहुकूम— सातारा जिल्ह्यांतील सरकारी जंगलांत इतके दिवस शेतकीची गुरें मोफत चारणीस फक्त खातेदारांसच परवानगी होती. पण आतां पोटखोतदारांसही आपली शेतकीची गुरें मोफत चारण्यास हुकूम झाला आहे असें समजतें. तसेंच दूधपिती वासरें सरकारी जंगलांत मोफत चरूं द्यावयाचीं नाहींत असें आजपर्यंत होतें; परंतु तो हुकूम रद्द करून यापुढें एक वर्षाचे वयाचे आंतील दूधपिती वासरें सरकारी जंगलांत मोफत चरूं देण्याचा हुकूम ता० २ नवंबर १८९५ इसवीचा झाला आहे असें समजतें. ही नवीन व्यवस्था हल्लींचे त्या जिल्ह्याचे कलेक्टर मि० विंचेस्टर साहेब यांच्या हुकुमानें झाली असल्याचें समजतें. या व दुसऱ्या कित्येक गोष्टीवरून मि० विंचेस्टर साहेब यांचें लक्ष रयतेच्या हिताकडे कसें आहे याचा सहज खुलासा होतो. स. शो.

कापडावरील जकात उठवावी, नाहींपेक्षां हिंदुस्थानच्या कापडावर जकात ठेवावी ह्मणून म्यांचेस्टरच्या व्यापाऱ्यांचें, डेप्युटेशन गेल्या बुधवारीं स्टेट सेक्रेटरीकडे गेले होतें. त्यांस बराच सलगीचा जबाब मिळाला. त्यावरून, सवय होईल तशी ही जकात काढून टाकण्यांत येईल किंवा त्यांच्या सूचनेचा विचार होइल असा रंग दिसतो. हिंदुस्थान सरकार काय करतें पहावें.

चीनच्या शतुंग प्रांतापाशीं रशिया आपलें आरमार, चालू हिंवाळ्यांत ठेवणार असें ठरलें आहे.

छोटा नागपूरकडे एक चांगली सोन्याची खाण सांपडली आहे. त्यामुळें तिकडे तशा खाणीचा आणखी शोध करण्याच्या विचारांत सरकार गुंतलें आहे.

कलकत्याहून नुकेच १८०० साप, युरोपांतील निरनिराळ्या संग्रहालयांत पाठविण्यासाठीं रवाना झाले आहेत.

बारा महिन्याच्या आंत जो कोणी स्वदेशांत न येतां परदेशांत राहील, त्यास स्वदेशीयांचे हक्क मिळणार नाहींत असा रशियानें जाहिरनामा प्रकट केला होता, ती मुदत संपत आल्यामुळें इंग्लंड वगैरे ठिकाणचे रशियन लोक तिकडे परत जाऊं लागले आहेत.

वायव्य प्रांत बनारस वगैरेकडे यंदा दुष्काळांचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

बलगेरियांत असा कायदा चालू आहे कीं पेटंट औषधें विकणारांच्या औषधाचा लिहिल्या प्रमाणें गुण न आल्यास नुकसानी भरून घेण्यांत येते. इकडेही असेंच झालें पाहिजे.

अमेरिकेंत एक ठिकाणची एक मजल्याची दगडी इमारत, ४० वार दूरच्या जागेवर यंत्रसाह्यानें उचलून ठेवण्यांत आली इतकेंच नव्हे. तर त्याखालीं दोन नवे मजले उभारण्यांत येऊन त्यावर ही एक मजली इमारत ठवली या उचलाउचलीस वेळही फक्त दोन चार तासच लागला. जुनें [illegible] वगैरे काढून नवें घालण्याचा प्रकार, मुंबई वगैरे ठिकाणींही दृष्टीस पडतो.

आबिसिनियाच्या राजानें, इटाली [illegible] एका सैन्यास बरेंच जेरीस आणल्यानें तंटा उपस्थित झाला आहे. परिणाम काय हातो पहावा.

अकलेची शिकस्त— पारीस येथें एक मोठें तळें आहे त्याच्या भोंवती उंच भिंत केली आहे त्या तळ्यांत मेलेली जनावरें टाकतात. त्या जनावरांचें मांस खाऊन त्यांची हाडें साफ करण्याचें काम. त्या तलावांतील उंदीर फारच उत्तम करतात. हाडांचा फास्फरस बनविण्यांत येतो. दर तीन महिन्यानीं त्या उंदरांचाही समाचार घेतात. भिंतीच्या कोपऱ्यास बारीक भोकें अशीं पाडलेली आहेत, कीं त्यांत फक्त उंदराचें शरीर मावेल पण शेंपूट मावणार नाहीं. दर ३ महिन्यानीं तलावांतील उंदरांना भिवविण्यांत येते. मग ते सर्व त्या भोकांत बसतात. पण भिंतीवरून चढून, त्या भोकांत बसलेल्या उंदरांची शेंपटें धरून त्यांना गोणींत भरण्यांत येतें व जरूरी पुरते उंदीर तलावांत ठेवून बाकीच्या उंदरांनां अशा रीतीनें पकडून मारतात. व त्यांच्या चामड्यांचे हातमोजे करतात. शिवाय त्यांच्या जाबेवरच्या हाडांचीं दातकोरणीं करीत असत, पण हल्लीं तीं नाहींत असें लार्ड प्लेफेर नांवाचे गृहस्थानीं प्रसिद्ध केलें आहे. स. वि.

कोणी कांहीं दुःख सांगितलें तर एक बाई ह्मणतः— "ह्याच्या पेक्षां वाईट झालं असतं तर?" एके दिवशीं ह्या बाईचा नवरा ठेंच लागून पडला व मेला. दोन स्नेही त्याचें प्रेत घेऊन येत असतांही त्यांस पाहून ह्मणतः— "ह्याच्यापेक्षां वाईट झालं असतं तर?"

मित्रांस आश्चर्य वाटून ते विचारतात:— "वहिनी तुमचा नवरा मेला; ह्याच्यापेक्षां वाईट आणखी आतां काय व्हावयाचें राहिलें आहे?" बाईस आपला वेदांत दाखविण्याची पाळी आली; ती ह्मणते:— "हें पहा भाऊजी; त्यांचा एखादा पाय का हात तुटला असता, आणि ते आजारी पडत बिछान्यावर कण्हत पडले असते, ह्मणजे दे औषध, दे पाणी, दे कांजी, पळ इकडे, जा तिकडे असा सगळा ताप सोसून अखेर तर ते मेलेच असते कीं नाहीं? त्याच्या पेक्षां तर हें बरें झालं?"

समुद्राच्या तळीं जाऊन तेथील वस्तूंच्या तसबीरी काढण्याचें यंत्र अमेरिकेंत निघालें आहे.

दुष्काळ— रशिया देशांत दुष्काळाचें स्वरूप फार भयंकर दिसत आहे. एका ठिकाणीं पांच माणसांचे खून त्यांच्या जवळचे सुमार सहा रुपये घेण्या करितां कोणा दुष्काळपीडितांनीं केले ! कोण हा अनर्थ !

कलकत्यास जवसाचें तेल काढण्याचा एक नवीन कारखाना सुरू झाला आहे.

चिमुकलें जग— प्यारिस येथील एका प्रदर्शनांत एकानें ४२ फूट व्यासाचे पृथ्वीच्या गोळ्यावर भूगोलावरची सर्व तपशीलवार माहिती दिली आहे. ह्या पृथ्वीचे गोळ्याचें वजन १३ टन असून हा गोळा अशा रीतीनें बसविला आहे कीं, तो एका लहानशा एकचाकी गाड्यावर वाटेल तसा फिरवून प्रेक्षकांस पहातां येतो.

टोळधाड— अमेरिकेंत एडलहू नांवाचे ठिकाणीं थोडे दिवसांपूर्वी टोळधाड आली. टोळांचा थवा १२ मैल लांब व १ मैल रुंद होता ! हे ज्या ज्या वृक्षावर बसले त्यांचे नुस्ते खराटे बनले. व ज्या नद्यामध्यें ते पडले त्यांतील माशांना त्यांची यथेच्छ मेजवानी झाली ! व्यापारी

मुंबईइलाख्यांतल्या जंगलखात्यांतल्या कामदारांच्या पगाराचें रिव्हिजन स्टेट सेक्रेटरीकडून मंजूर झालें. हल्लीं दोन आहेत त्याच्या बदला आतां तीन कान्सरवेटर होणार.

वाईकर तात्यासाहेबांनीं दुलेखानावर जो दिवाणींत दावा केला होता त्यांत दुलेखानावर ३०० रुपयाचा हुकूमनामा झाला.

काबूलच्या दरबारीं नवा इंग्रज एजन्ट अजून नेमला नाहीं. गव्हरनरजनरल कलकत्यास आल्यावर ही नेमणूक होणार आहे. आतां कोणावर पाळी येते पाहावें.

हिंदुस्थानसरकारच्या फोजेच्या २ टोळ्या लवकरच सावकचिन नावाच्या सरहद्दीवरील डोंगरी लोकांवर चाल करून जाणार आहेत.

हिंदुस्थानांतल्या कैद्याबद्दल स्टेट सेक्रेटरीच्या ह्मणण्याप्रमाणें लवकरच एक कायद्याचा मसुदा तयार होणार आहे [illegible] इतक्यांत कायदेकौंसलापुढें येणार [illegible] गादय.

एक प्रसिद्ध यहुदी [illegible] लाइझ येथें मरण पावला. त्यानें [illegible] तिबां-

धंद्यांची औद्योगिक बाबतींत प्रगति व्हावी ह्मणून १०००००० रुपये काढून ठेविले आहेत, यांचा विनियोग गरीब लोकांना धंदे शिक्षण देण्याकडे करावयाचा आहे.

ग्रेट ब्रिटन आणि इजिप्त यांजमधील गुलामांसंबंधाचा तह झाला आहे त्यावरून या पुढें इजिप्तमध्यें गुलामांचा व्यापार अजिबात बंद पडेल असें ह्मटल्यास चालेल.

न्यू साउथवेल्समध्यें सशांचा इतका उपद्रव झाला आहे कीं तेथील जमिनीचे वहिवाटदार सरकाराजवळ त्यांना मारण्याकरितां कायदा करण्याची विनंती करीत आहेत. एकाच्या कुरणांत ७ लाख ससे ४ वर्षांत मारले. खर्च ७५० पौंड झाला.

आर्मीनिआंतील वस्ती अगदीं कमी होत चालली आहे हजारों लोक अन्नावांचून मरत आहेत. कांहीं लोकांना रहाण्याकरिता घरेंही नाहींत.

मादागास्करच्या सहा हजार लोकांनीं रॅमानेंडो येथें इंग्लिश मिशनरी लोकांची कत्तल केली. त्या वेळेस रेव्हरंड मि० मॅकमॅहॉन आणि त्यांची मुलें माणसें ही सर्व पळून गेली. प्रभाकर.

हिंदुस्थानांत कापूर तयार होऊं लागला— नीलगिरीवर मि. हूपर नांवाच्या एका युरोपियननें कापराचीं झाडें लाविलीं आहेत. त्यांपासून त्यांनीं बराच कापूर तयार केला असें तिकडील बातमीवरून समजतें. चिनांत आणि जपानांत कापूर अतिशय महाग आहे, आणि कापराचीं झाडें सगळ्या हिंदुस्थानभर होतात ह्या दोन गोष्टी मनांत घेतल्या ह्मणजे ही बातमी मोठ्याच महत्वाची ह्मटली पाहिजे.

प्रसिद्ध इतिहासकार मि. व्हल्यम लेकी हे डब्लिन युनिव्हर्सिटीच्या वतीनें पार्लमेंटचे सभासद निवडण्यांत आले.

—पुढील सालची सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा तारीख ३ आगष्ट रोजी सुरू होईल. शु. सु.

नोटीस

नोटीस बेहमी— तुकाराम वल्लद चंद्रभानजी नायकवाडी राहणार बडनेर गंगाई यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझें शेत नंबर १७५ पैकीं वहितीस करून चार वर्षाची कबुलायत ता० ११।५।९१ रोजीं लिहून दिली त्याप्रमाणें तुह्मी शेत वाहून मालकी बद्दल रक्कम तुमचेकडेस होती त्याबद्दल तुमचेवर दावा केला आहेच त्यां दस्तैवजात तुह्मी असें कबूल केलें होतें कीं चार वर्षांत जमीन नांगरून साफ करून देऊं परंतु त्याप्रमाणें तुह्मी शेत नांगरलें नाहीं सबब माझें नुकसान होत आहे तर ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत जमीन नांगरून साफ करून द्यावी केलें न गेल्यास नांगरण्याचा जो खर्च लागेल त्याबद्दल तुमचेवर दावा करणें भाग पडेल. कळावें ता० १६।१२।९५ इ०

[सही]

तिलोकचंद जोदराज मारवाडी द० खु०

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर „ ७ „१ ८
किरकोळ अंकास .... .... .... ४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

Six monthly ... ... ... 3 „ 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# व-हाड[समा]चार.

THE BER[AR S]AMACHAR

VOL XXIX AKOLA MON[DAY 3]0 DECEMBER 1895 NO 50

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ३० माहे डिसेंबर सन १८९५ इ० अंक ५०

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे

### विशेष सूचना

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं तारीख १ ली जानेवारी सन १८९६ रोजीं व त्या नंतर मेलगाडीशिवाय इतर दुसरे गाड्यांतून जाणारे तिसरे वर्गाचे उतारूंचें भाडें हाल्लीं दर मैलास २ $\frac{1}{2}$ पै आहेत तें दर मैलास २ प्रमाणें या रेलवेवर कमी करण्यांत येईल व हें भाडें या रेलवेवरील स्टेशनांवर जाण्यास तसेंच दुसरे रेलवेवर जाण्यास घेतलें जाईल.

परंतु मुंबई व कल्याण आणि त्या मधील स्टेशनांवर ( आर्डिनरी ) साधारण गाडींतून जाऊन परत येण्याच्या तिसऱ्या वर्गाच्या ( रिटर्न ) टिकिटांचें हांशील हल्लींप्रमाणेंच राहील. मात्र यांपैकीं कांहीं स्टेशनांवर जाऊन येण्याच्या टिकिटांचे दर थोडे कमी केले जातील.

फेरफार केलेलीं दराची पत्रकें या रेलवेवरील स्टेशनांवर लवकरच लावण्यांत येतील.
मुंबई, ता० १४ माहे दिसेंबर १८९५ इ०

ई. डब्ल्यु कायली.
आर्क्टिग जनरल ट्राफिक म्यानेजर

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि० कि० मु० नंबर १५ वर्ग १५
१८९५

दिपुटी कामिशनर साहेब जि० इलिचपूर यांचे कोर्टांत

नांव—लक्ष्मण
बापाचें नांव— बाळाजी वडतकार कुणबी
रहाणार— उमरी तालुके दर्यापूर
जिल्हा— इलिचपूर यांस मयत

बाळाजी बापाचें नांव भवानजी रहाणार उमरी तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदहू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं ता० १६ माहे जानेवारी सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चोकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत अगर ·वारी असेल तर्थे हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

ता० १३ माहे दिसेंबर सन १८९५ इ०

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur District

---

व-हाडसमाचार

[प]ोष शुद्ध १४ शके १८१७

[क]रावर कर लादले जात आहेत [त्या]मुळें प्रजेला हा कराचा बोजा फार

टीच्या जोरावर कायम झाला उदाहरणार्थ इनकम ट्याक्स प्रथम १८८५ मध्यें बसविला तेव्हां तो लवकरच काढून टाकण्यांत येईल असें आश्वासन दिलें होतें. पण खर्चाला ताळ नसल्यामुळें लार्ड डफरीन साहेबांनीं जें आश्वासन दिलें होतें, तें पुरें करण्याची संधीच अजून मिळाली नाहीं. इनकमट्याक्स प्रमाणेंच सर्व करांची व्यवस्था आहे. सध्यां लार्ड वेल्बी यांच्या अध्यक्षते खालीं जें कमिशन नेमण्यांत आलें आहे त्याच्याकडे इंडियाच्या खर्चासंबधानें चौकशी करण्याचें काम दिलें आहे. पण चौकशीचा अधिकार फार नियमित असून चौकशीच्या प्रकरणांची हद्दही मर्यादित केली आहे त्यामुळें या राजमान्य कमिशनचा या देशास कांहीं फायदा होईल अशी आशाच मुळी खुटली आहे. राष्ट्रीयसभेनें हा प्रश्न मुख्य प्रश्नांत गणला आहे तेव्हां लोकांची बाजू गेल्या दहा वर्षांतील करा संबंधानें योग्य प्रकारें सरकारच्या नजरेस आणण्यांत येईल

इनकमट्याक्सचें उत्पन्न गत वर्षी १।।। कोट रुपयांचें झालें या पैकीं ६१ लक्ष रुपये उत्पन्न ५०० रुपये प्राप्ती पासून २००० रुपये पर्यंत सालिना प्राप्ती असणाऱ्या लोकांपासून मिळालें. बाकीचे ११४ लक्ष रुपये दोन हजार रुपया पेक्षां अधिक प्राप्ती असणाऱ्या लोकापासून वसूल आले. कलकत्ता, मद्रास, मुंबई इत्यादि शहरींच बहुतेक मोठा भाग वसूल झाला आहे. सर्व इनकमट्याक्सच्या उत्पन्ना पैकीं शेंकडा ४२ या प्रमाणानें फक्त कलकत्ता या राजधानींत वसूल आला. कलकत्ता मुंबई सारख्या शहरीं लोकवस्ती अति मोठी असून लक्ष्मीचें वास्तव्यही तेथें विशेष असतें. हा कर उत्पन्नावर असल्यामुळें गरीब लोकांवर त्यांचा बोजा नाहीं आणि सर्व श्रीमान लोकांवरच हा बसतो हें ठीक आहे. पण राष्ट्रीय सभेच्या ह्मणण्या प्रमाणें हा कर १००० रुपये पासून जास्त सालिना उत्पन्नावर आकारल्यास सरकारचें मोठें नुकसान न होतां कमी वेतनांच्या लोकांवर मोठे उपकार होतील हें वरील आंकड्यावरून वाचकांच्या लक्षांत येईल. पण सरकारच्या विचारांत ही गोष्ट उतरेल तेव्हां खरी!

लाही शिरसावंद्य पाहिजे इंदूरशाही इतक्या ऱ्हासाला पोंचण्यास कारण तरी राजाला प्रधान मंडळा सारखा शास्ता मिळाला नाहीं हेंच होय. श्रीमान बाळासाहेब महाराजा सारखा स्वच्छंदी पुरुष होळकरच्या दौलतीवर बसला तेव्हां त्यांच्या मनोविकारास स्वैर फिरूं लावण्यास आणि त्यांच्या हातून गैर गोष्टी घडविण्यास जवळचे स्वार्थसाधु, द्रोही, व घरबुडवे लोक कारण आहेत अशी आमची समजूत आहे. एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं सर्व गोष्टी अनुकूल होतील तर मनुष्य पशू पेक्षां पशू बनेल, आणि ही गोष्ट आमच्या राज्यवैभवशाली संस्थानिकांस अंशतः तरी लागूं पडतें. होळकर शाहीच्या खालोखाल निजामशाही आहे. 'पायोनिअर' पत्रकर्त्याच्या ह्मणण्या प्रमाणें खरे निजाम सरकार व खरा दिवाण ह्मणजे खुद्द निजामाजवळचा पेशी सेक्रेटरी होय. या पुरुषाच्या हातीं सर्व सूत्रें असतात आणि तो नाचवील तसे सर्व अधिकारी नाचतात. हीच व्यवस्था राजाला व प्रजेला घातुक होय. सारांश, एका व्यक्तीच्या हातीं त्याच्या मगदुराबाहेर अधिकार उपयोगी नाहीं. आणि हें तत्व अमलांत आणण्यासाठीं प्रधान मंडळा सारख्या संस्था इंग्रजी धर्तीवर देशी संस्थानांतून निघाल्या पाहिजेत. होळकरशाहींत नवी व्यवस्था प्रधानमंडळ नेमून झाली आहे ही गोष्ट दुःखांत सुख मानण्यासारखी आहे.

---

म्यांचेस्टरवाल्या लोकांचे भागिरथ प्रयत्न खरे ! विलायती कपड्यावर व २० नंबरा पासून वरील सर्व नंबरांच्या सुतावर जी जकात बसली आहे ती बंद करण्या संबंधानें विलायतच्या गिरणीवाल्यांचा अव्याहत खटाटोप चालला आहे. या जकाती मुळें इंडियन लोकांचा फायदा होऊ नये व कपड्याचा व्यापार सारखा अप्रातिहत चालावा ह्मणून देशी कपड्यावर व सुतावर निराळा कर बसविण्यांत आला. वास्तविक पाहतां इंडियांतला कपडा हलक्या नंबराचा निघत आहे आणि तो कपडा व विलायती उंची नंबराचा कपडा या मध्यें कधींच चढाओढ होत नव्हती पण विलायतच्या लोकांचीं गाऱ्हाणीं खरेपणाच्या शिक्का मोर्तबा[सह] इंडियांत ने[...]

सां पूर्वी या लोकांनीं स्टेट सेक्रेटरी लार्ड हामिल्टन यांनां मानपत्र दिलें आणि त्यांत आपलें रडगाणें पुन्हां विचारासाठीं मांडलें. पण अन्याय करण्याचा संकल्प ठरला तरी त्याला न्यायाचें स्वरूप देऊन कोणत्याही प्रश्नाचा निकाल करावा लागतो म्हणून या मानपत्रांतील मजकूर हिंदुस्थान सरकाराकडे अभिप्रायासाठीं स्टेट सेक्रेटरीच्या अभिप्रायासह धाडण्यांत येईल आणि नंतर अखेरचा निकाल हिंदुस्थानच्या कायदे कौन्सिलांत परत येईल असें वाटलें होतें पण अद्याप हिंदुस्थानच्या तिजोरीची स्थिति सुधारली नाहीं ह्मणून जकात उठविण्यांत येणार नाहीं असा जबाब स्पष्ट स्टेट सेक्रेटरी यांनी दिला. तथापि सर्व कागद इंडियांत अभिप्रायासाठीं धाडण्या विषयींही अभिवचन दिलें.

---

नामदार फेरोजशहा मेथा यांस गेल्या २० तारखेला मानपत्रें देण्याचा मुंबईस टौलेजंग समारंभ झाला. नामदार मेथा यांची कौंसिलदारी इतकी उत्कृष्ट ठरली कीं त्यांच्या त्या अत्युत्तम देशसेवे प्रीत्यर्थ त्यांस सार्वजनिक मानपत्र देण्याचा संकल्प गेल्या एप्रिल मध्येंच ठरला होता पण हा समारंभ लांबणीवर टाकता टाकता अखेर गेल्या २० व्या तारखेस घडला. नामदार मेथा हे जसे विद्वान आहेत, वाद कौशल्यांत अप्रतिम आहेत, त्यांच्या जीव्हाग्रीं सरस्वतीच वास करिते, त्यांचे विचार प्रगल्भ असून ते जात्या धीट व स्पष्टवक्ते आहेत इत्यादि गोष्टी सर्व देशभर महशूर आहेत. त्यांचा अलौकिक देशाभिमान, अनेकविध राष्ट्रसेवा, आणि लोकमान्य धुरिणत्व हीं पाहून त्या मुंबईच्या सिंहाचा नामघोष कोण धन्यतेनें व आदरबुद्धीनें करणार नाहीं बरें! नामदार मेथा जसे लोकमान्य आहेत तसे राजमान्यही आहेत. त्यांनीं व्हाइसरायच्या कायदे कौंसिलांत आपल्या वक्तृत्वानें व विचारगांभीर्यानें सर्व कौंसिलदारास चकित केलें व विरुद्ध पक्षीयांवर दहशत बसविली होती तथापि पुढील दोन वर्षांकरितां व्हाइसराय साहेबांनीं कौंसिलदारीवर त्यांचीच नेमणूक केली हीच गोष्ट त्यांच्या राजमान्यतेची साक्ष देत आहे.

मुंबईस मानपत्रें स्वीकारते वेळीं नामदार फेरोजशहा मेथा यांनीं एक सुश्राव्य, मनोहर व बोधपर व्याख्यान दिलें. वक्तृत्व कलेचा उत्कृष्ठ नमुना दाखविणें झाल्यास अशा संभाषणा शिवाय अन्यत्र आढळाव याचा नाहीं.

मानपत्रांचा आदर करिते वेळीं ते स्वताला उद्देशून बोलले कीं मानपत्र देणाऱ्यांचा अधिकार, वजनदारी व विद्वता हीं लक्ष्यांत घेतलीं ह्मणजे अशा मानपत्राचा स्वीकार करणाऱ्या गृहस्थाची लघुता व अपात्रता दिसून येईल. मुंबई प्रेसिडेन्सी असोशिएशन व पुण्याचा सार्वजनिक सभा या संस्थांची ल... हारिस थट्टा करून बोलले कीं रयतेच्या कल्याणाकडे मी नजर दिली ह्मणून ...ती अप्रिय झालो व मुंबईची प्रेसिडेन्सी असोशिएशन ह्मणजे रोमच्या पातशाहींतल्या सिझर, पांपीअस व क्रेसिअस यांच्या तोडीचे तिचे स्वतःसिद्ध पुरुष आहेत आणि पुण्याची सार्वजनिक सभा ह्मणजे येन केन प्रसिद्ध झालेले एक महापुरुष आहेत. या दोन्ही संस्थांचे उद्देश व तत्वें हीं कैलासवासी तेलंग, नामदार बद्रुद्दीन तय्यबजी किंवा मि० वाचा या लोकाग्रणींच्या सर्वमान्य विचारावरून व कृतकार्यावरून कळून येतील. पुण्याच्या सार्वजनिक सभेचा पाया त्या लोकोत्तर विद्वन्मणीनें ह्मणजे राव बहादूर रानडे यांनीं घातला आणि त्यांच्याच सारख्यांच्या मतांचें दर्शन या सभेच्या द्वारें होत असतें. तेव्हां असल्या अवर्णनीय देशभक्तांच्या अंतस्थ हेतूचा, प्रगल्भ विचारांचा व कल्याणप्रद तत्वांचा मोठ्या आनंदानें स्वीकार करावा ह्मणूनच हीं मानपत्रें मी कबूल केलीं. नामदार मेथा यांच्या भाषणांतील मुख्य मुख्य मुद्दे या अंकीं देण्यास सवड नाहीं.

---

गेल्या बुधवारीं नामदार महादेव गोविंद रानडे यांनीं येत्या सामाजिक सभे संबधानें एक बोधपर व हृदयंगम व्याख्यान दिलें. व्याख्यानाच्या विषयास आरंभ करण्यापूर्वी त्यांनीं सांगितलें कीं दिवाणबहादूर रा रघुनाथराव यांनीं एक चमत्कारिक पत्र धाडलें आहे. त्यांत ते कळवितात कीं राष्ट्रीय सभेच्या मंडपांतून सामाजिक सभा निघाल्यामुळें सामाजिक व राजकीय सुधारणा एकत्र व एकदम होत आहेत असा आंग्लो-इंडियनांचा गैरसमज होणार नाहीं. दिवाण बहादूरांचे सामाजिक विचार ह्मणून आपण समजत होतो ते कितपत त्यांच्या कृतीवरून खरे ठरतात हें आपोआपच स्पष्ट होत आहे. दुसरी गोष्ट सामाजिक सभेला राष्ट्रीय सभेचा मांडव मागण्या संबंधानें होय. या संबंधानें स्टांडींग कमिट्यांचे जबाब आले त्या वरून २८ कमिट्या अनुकूल व ७ प्रतिकूल होत्या ४ कमिट्यांनीं हा निकाल राष्ट्रीय सभेवर सोपविला आणि १० कमिट्यांनीं अनुकूल मतें दर्शविलीं पण पुण्याच्या बखेड्याला भिऊन माघार घेण्यास सांगितलें. खुद्द नामदार सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं कळविलें कीं लोकांच्या अप्रशांत ह्मणण्याला संध्या हुंकार दावा कांकीं त्यामुळें दुसरीं नानाविध मोठीं विघ्नें टळतील. तिसरी गोष्ट मोठ्या विचाराची व गूढ आहे. पुण्यासच नाहीं तर राष्ट्रभर थोड्या बहुत अंशानें हें मांडवाच्या प्रश्नाचें वेड माजलें आहे. याचें खरें इंगित काय हें कांहीं नीटसें कळत नाहीं. आपसांतील दुही व स्पर्धा हेंच कांहीं कारण नाहीं. जगाच्या आरंभा पासून असले तंटे चालूच आहेत. दोन पक्ष विरोधी असले ह्मणजे एकमेकांला दूषणें लाऊन एकमेकांचा पाडाव करण्यास झटतात ही गोष्ट नवीन नाहीं. मग पुण्याच्या या बखेड्याला आज दह... कां झाला याचें योग्य ... कारणानें होत नाहीं. सा... निराळे, तिची कार्यमाल... तिचीं प्रसिद्ध पुस्तकेंही नि... ष्ट्रीय सभेशीं कांहीं अथ... फक्त सर्व राष्ट्रवाले रा... येतात तेव्हां त्यांच्या पै... सभेंतले असतील त्यांस ए... मास्तर... हीं, स... र्वांची चांगली सोय होत. पण हा खरा प्रकार अगदीं स्मरणांतून घालविल्या प्रमाणें पुष्कळ ठिकाणच्या लोकांनीं वर्तन केलें. सामाजिक सभेच्या कार्याला हा प्रचंड व्यत्यय व प्रतिबंध होत आहे ही गोष्ट कां घडली याविषयीं सृष्टि शास्त्र वेत्त्यांस असा प्रश्न उद्भवेल कीं जे सज्ञान प्राणी इतर गोष्टींत शहाणपणानें वागतात ते याच बाबदींत असे बेताल व अव्यवस्थित कां होतात. किंवा वैद्य चिकित्सा करितील कीं या राष्ट्राच्या शरीरांत असा कोणता रोग जडला आहे कीं त्यामुळें चांगल्या संस्था देखील विपर्यस्त होऊन जातात. सारांश हा प्रश्न खरोखर गूढ आहे. पुणकरांचा धीटपणा किंवा मुखेल ह्मणा त्यां यामध्यें इतर ठिकाणच्या लोकांपेक्षां कांहीं निराळें पाणी आहे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. यंदा सामाजिक सभेला जो प्रत्यवाय आला तो कां आला याचा उलगडा सर्व राष्ट्रानें विचारपूर्वक सूक्ष्मदृष्टीनें केला पाहिजे.

पुढील व्याख्यानांत इंडियाच्या सामाजिक इतिहासाचें सिंहावलोकन केलें आहे त्याचें पुढील अंकीं विवेचन होईल.

---

राष्ट्रीय सभेचा टौलेजंग समारंभ व तन्निमित्त सामाजिक सभेचा समारंभ यांनीं पुणें शहर गेल्या सप्तकांत अगदीं दुमदुमून गेलें आहे. पुणेंकरांमध्यें कितीही दुफळ्या असोत तरी ते लोक व पाहुणे मंडळी मिळून हें राष्ट्रकार्य मागील साला प्रमाणेंच मोठ्या आनंदोत्सवानें पार पडेल अशी सर्वत्र खात्री आहे. सामाजिक प्रकरणांत कोणाचीं कशींही मतें असोत, तथापि राष्ट्रसेवेला प्रत्येकजण यथाशक्ति सिद्ध आहे ही गोष्ट ध्यानांत वागविली ह्मणजे आमच्या वरील भाकिताची सत्यता कळून येईल. गेल्या २७ व्या तारखेस राष्ट्रीय सभेचा मंडप दीड किंवा दोन हजार प्रतिनिधी व चार हजार प्रेक्षक यांनीं सर्व गजबजून गेला होता. आनंदाच्या टाळ्या व थोर थोर राष्ट्रभक्तांच्या नामांचा जयघोष यांनीं सर्व स्थळ दणाणून गेलें होतें. रावबहादूर भिडे यांचा स्वागतपर लेख प्रोफेसर गोखले यांनीं वाचला. हा लेख अगदीं अप्रतिम होता आणि त्यानंतर नामदार सुरेंद्रनाथ बानर्जी यांचें संभाषण तीन तास पर्यंत चाललें होतें. सर्व सभागृह अलौकिक वक्तृत्वामुळें आश्चर्यानें व आनंदोल्लासानें स्तब्ध व निश्चळ झालें होतें. विशेष तपशिलवार पुण्याकडील आनंदकारक बातम्या ऐकण्याकडे सर्व देशाचे कान लागले आहेत आणि ही उत्कंठा व हौस मोठी अभिनंदनीय आहे या प्रकरणीं आमच्या वाचकांची सेवा आह्मी यथा थल व य-

छिद्रान्वेषण अति निर्भिडपणें लोकांनीं आरंभलें आहे. नामदार टिळकांची राष्ट्रीय सभेचा मंडप तेथील डेलिगेट निवडण्याच्या सभेला मागण्याची युक्ति कांहीं विचित्र व अतर्क्य होती आणि राव बहादूर जठार यांचीं उडवा उडवीचीं उत्तरेंही चमत्कारिक होतीं. वैमनस्य, मत्सर व अहंपणा इत्यादि अवगुणांनीं सर्व पुणेकरांच्या अक्कलेला तिलांजली दिली आहे. राष्ट्रीय सभेचा मंडप छेदेखानीं सभेला मागणें हें अगदीं अप्रयोजक होतें. कार्याचें महत्व विसरल्या शिवाय अशी मागणी आली नसावी. राष्ट्रीय सभेच्या रिसेपशन कमिटीचें अध्यक्ष स्थान नामदार मेथा, जव्हेरीलाल याज्ञिक, वाचा, सयानी इत्यादि थोर थोर गृहस्थांनीं पुण्याच्या बखेड्या मुळें नाकारलें आणि अखेर ही माळ राव बहादूर विष्णु मोरेश्वर भिडे यांच्या गळ्यांत घातली हें ठीक झालें. पण या गोष्टीचा आरसा डोळ्या पुढें ठेविला ह्मणजे अन्यें नानाविध किती वाईट गोष्टींचें त्यांत प्रतिबिम्ब दृष्टीस पडतें हें पाहणें वाचकांवरच सोंपविणें भाग आहे. राष्ट्रीय सभा आटोपल्यावर ही या आपसांतील लढाईचें परिशिष्ट नाटक फौजदारी कोडतांतून दृष्टीगोचर होणार आहे तेव्हां त्या अंकाला सुरुवात होई पर्यंत सर्वांनीं मोठ्या खेदानें स्वतांस तजितवाने केलें पाहिजे.

---

## The Berar Samachar

**MONDAY DECEMBER 30, 1895**

A Conservstive ministry in power is always an index of a retrograde policy in all departments of administration. The effects of such a change in the ministery are most signal and apparent even in the bureaucratic government of India. The government of India is an irresponsible, all—powerful and highly centralized body of administrators of average and mediocre abilities. In public there there is the bold and loud talk that India is being governed for the Indians but in actual and stern reality the act belies the talk and dissipates to a large extent the dream of the noble and benign British rule. A Conservative government always strengthens the hands of the Indian government in all the ways of its administration, No body cares to know what strong opposition is at work against the present policy of the Government. Reason with the help of perfect impartiality and far-seeing statesmanship will dictate a rule far different from the governing principle of the Anglo-Indian administration. The present government is subversive

conveyed in the resolutions of the National Congress. Let us hope that we have shall have won our victories in no distant future because we have strong faith in the goodness and righteousness of the English people.

---

The Hon'ble Mr. P M. Mehtha, the Lion of Bombay, pointed out the other day that the high mission of the British rule is to educate the Natives. Mount Stuart Elphinstone even expressed in a prophetic tone that "it may be [illegible]r high road back to Europe." We f[illegible]il to perceive that such a [illegible] sentiment has ever found a real p[illegible]lic recognition in the [illegible]cts of the Government although it has [illegible]id down at the advent of the British rule the solid foundations of future British glory in the whole history of the world. The educational needs of India are too many but the government has no funds to supply them while it could maintain the most expensive administration in the world and could undertake war after war in quite a regal fashion. India is a cluster of vast nationalities—the poorest and most ignorant the world has ever seen. For want of education India is fast dying out as a manufacturing and commercial nation although it abounds in her material wealth.

---

Lord Rosebury gave a graphic description of what Liberalism means. Let the Anglo Indian find in these lines a guide-post to point to and suggest a really benevolent mode of government:—

"In any, case. it, seems a dubious device to dig up dead statesmen in order to pelt the living with them; but whether graceful or not, it is beside the mark, for it betrays a radical misconception (excusable enough in Lord Salisbury) of what Liberalism is. It is not fixed dogma graven long ago on a rock: it is necessarily a moving adaptable creed to be adjusted to the wants of a rapidly changing age. It is nothing to us what Pym, or Walpole, or Fox would say in 1895, for we have to deal with the spirit of our times and not others. We do not, for instance, dwell on the Cavendishes who fought against the Irish Act of Union; we smile and pass on. It is enough for us to deal with the contraction and anomalies of living statesmen. Let the dead bury their dead. What we have to achieve is a living work to keep in touch with living people, to adapt living principles to living wants and aspirations. If Liberalism be not that it must perish: but being that, being a living force, and not a mummy creed, it must in

examination in conduct[illegible] examination of lower cl[illegible] the two high schools f[illegible] followed by the Universit[illegible] matriculation examination, [illegible] to a faulty method of te[illegible] the teachers doing too mu[illegible] the boys instead of making [illegible] work for themselves. To s[illegible] a pass in the matriculation [illegible]mination a boy is required [illegible] obtain a certain proportion [illegible] marks assigned for each subje[illegible] while the practice followed [illegible] making out the the results [illegible] the lower classes in the Bera[illegible] high schools is to pass boys o[illegible] the total number of marks obtained in all subjects, instead of requiring them to obtain a certain proportion of marks in each head head head and sub-head of the standard. The consequence of this is that boys as well as class-masters do not pay equal attention to all the subjects prescribed for the standards, and that boys continue to be weak i[illegible] certain subjects until [illegible] the matriculation clas[illegible] are required to make [illegible] weak points and are [illegible] detained until they [illegible] dered fit to be sent [illegible] examination. This accou[illegible] long detention of boys [illegible] matriculation class. In April 18[illegible] when I first visited the [illegible] High school, I noticed th[illegible] boys in standard X had carefully and correctly written note-books in English, prose and poetry, none of them could answer questions from them, *i. e.*, from what they had learnt in the first term, and that all of them seemed to think that the notes were to be got up at the time of the annual examination. This method of teaching encouraged cramming. and was more or less observable in both the high schools.

To put a stop to these practices—(1) I have informed the head masters that in future boys would be required to obtain one-third of the marks assigned for each head and one-fourth of the marks assigned for each sub-head; (2) I have also strengthened the teaching staff of the two high schools by appointing competent graduates in place of non-graduates."

---

## वऱ्हाड

ता० १ ली जानेवारी पासून उमरावतीस एक उद्योगशाळा मुनसिपल कंपौंडांत सुरू होणार आहे. सुतार, लोहार, शिंपी, व चांभार यांचीं कामें प्रथम शिकविण्यास सुरुवात होणार आहे. विद्यार्थी ४ थी इयता पसार झालेला पाहिजे [illegible]

मि० [illegible] कमिशनर यांची स्वारीहि तेथेंच [illegible]

---

[illegible]डि साहेब व मुनशी आझिजुद्दीन [illegible] उमरावती स्टेशनावर घडले- [illegible] अनुलक्षून मुंबईच्या विक्षिप्त [illegible] खोटा लेख आला आहे. [illegible] उभय गृहस्थ करितील तर [illegible]

---

[illegible]भेनिमित्त वऱ्हाडांतून [illegible]ले आहेत. ही गोष्ट

---

[illegible]ाशीमाकडे व रा. [illegible]राजाकडे फिरत अ[illegible]

---

[illegible]व

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ९९॥= |
| | | | ९९॥= |
| [illegible]८ | | रुपें | ९६॥ |
| [illegible] | ३॥= | आळशी | ९२ |
| [illegible]कांठ | ५८।.। | बनसी | ६२॥ |
| [illegible] | ४५ | सर्की | ४। |
| [illegible] | ८॥ | तेल | ६।= |
| [illegible] | ६१॥ | तीळ | ९० |
| कपाशी | ४४।४८ | गावराणी रुई | ६३॥ |

सव्याच भाव.

| | |
|---|---|
| जवारी फाल्गुन शुद्ध १५ | ४७॥ |
| रुई फाल्गुन शुद्ध १५ | ६३॥ |
| आळशी वैशाख शुद्ध १५ | ९५॥ |
| गहू वैशाख शुद्ध १५ | ६७ |

---

### नोटीस.

रा० रा० तिमाजी वल्लद जिवनाजी राहणार रानेगांव ता० अकोट—यांस

तुह्मी मौजे रानेगांव येथील सर्व्हे नंबर ५ आकार रुपये १४ माझ्या मयत बापाकडून १८८७ सालीं विकत घेतला. पुढें ता० १९ आक्टोबर सुमाराला तुह्मी मला १५० रुपयांस घर विकत देण्याचा करार करून पंचवीस रुपयें विसाऱ्याचे घेऊन करार पक्का केला. तर ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत आपले रुपये १२५ घेऊन शेती माझ्या ताब्यांत द्यावी आणि खरेदीखत लिहून नोंदून द्यावें. तसें न कराल तर कोर्ट मार्फत फिर्यादीनें सर्व खर्चासह शेती ताब्यांत घेतली जाईल.

वरील विक्री बंद पाडण्याच्या हेतूनें तुह्मी खोटी म[illegible]वर फिर्याद केली आहे तिचा सर्व [illegible]

कोर्टें हा नादारी आहे असा आज तारीख १४ माहे १२ सन '८९५ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ११ माहे जानेवारी सन '८९६ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपल तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तकार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षिदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादार वर दावे नोंदावेणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रातिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. ११।१२।९५ इ०

| धनकोचें नांव | रकम रुपये |
|---|---|
| १ [illegible] चिमनलाल राहणार खिरपुरी | १३४८१५०० |
| २ मनवरअली कादरभाई राहणार आकोला | २१८०८० |
| ३ अंबादास सोनार राहणार आकोला | ३५ |
| ४ राघो वा। दानाजी धनगर राहणार भंवरद | ६० |
| ५ इंद्रभान वल्लद रामजी राहणार कळंबी | २०० |
| ६ सखाराम भगवंत राहणार शिलोड | ३५ |
| ७ नागो अनोबा सोनार राहणार अकोला | १४० |
| ८ नागो मारवाडी राहणार अकोला [illegible] | २१ |
| ९ लालखा मुसलमान राहणार अकोले | |

इंग्लंडांतील जे थोर लोक हिंदुस्थानांतील लोकांच्या सुधारणूकीसाटीं अत्यंत कळकळ बाळगीत असतात ते उघड कबूल करितात कीं, सध्याची राजकीय व्यवस्था अत्यंत दोषाई आहे. ती सुधारली नाहीं तर राजछत्र प्रसंगविशेषीं गडबडून खाली पडणार. यासाठीं राजघाटांत मेळ असला पाहिजे. शिक्षणाची बाजू दिवसेंदिवस संपुष्टांत आणून दास्यत्वांत प्रजा ठेवण्याकडे बहुतेक लोकांचा कल धावतो. कायद्याचा भडिमार पर्जन्यापेक्षां अधीक झोडपीत सुटल्यामुळें खरा राजा कोण हें तत्व प्रजा विसरत चालली. प्रत्येक माणूस स्वतंत्र होत चालला. ह्मणून दारिद्र्यानें अनर्थ करून सोडला आहे. रोग एक आणि औषध भलते कधीं कामा येणार नाहीं. बाप भुकेनें व्याकूळ होऊन मरतो आणि पोरगा बापाच्या आंगावर शालीचा फर्द घालतो काय उपयोगाचें? सरकार गायरानें बंद करते आणि तुह्मी दुधभात खाउन सुखी व्हा असें पोकळ अशीर्वाद देते त्यापासून चांगला परिणाम तर नाहीं पण सरकारावर अप्रीती मात्र होणार.

हिंदुस्थानांत सन १८५८ पासून १८६३ पर्यंत सर्व युनिव्हरसिट्या मिळून १९९ ग्रयाजुएट पास झाले होते. सध्या १८८८ पासून १८९३ अखेर बेरीज करता ती संख्या ६०८१ पर्यंत बाहेर आली. आज तारखेस हिशोब पहाता १५६९७ पदवीधर लोकांस सन्मानानें झगे वाट यांत आले. हिंदुस्थानांतील विद्येकडे सरकार ', ५,००,००० रुपये खर्च करते. इंग्लिश राजकार्य धुरंधर लोक ह्मणतात कीं, सुधारलेल्या राज्यकर्त्यांनीं आपल्या [illegible]ची निरंथाई करणें तर फौज खात्यापेक्षां विद्येकडे अधीक लक्ष द्यावें. हें जर खरें आहे तर आमचें सरकार २५ कोट रुपये फौजखात्याकडे खर्च कां करते! ही सुधारलेली कृती नव्हे असें ह्मणणें भाग येते.

अमेरिकेंत इंडियो नांवचें लढाऊ गलबत ३४८ फूटीचें लांब बनविलें आहे गलबतावर बुरूज असून त्याजवरून शत्रूवर तोफा डागून पराभव करण्याची सोय केली आहे. या शिवाय माऱ्याच्या जागा साधल्या आहेत, गोळा आंगावर आला तर तो परतावण्याची शक्ती विजेनें आणली आहे, विसाव्याकरितां बगीच्या केला असून पुस्तकालय, हॉटेल, वगैरें सवे साधनें त्यांतल्या त्यांत जय्यत आहेत.

तुर्कस्थानांतील स्त्रिया वर्तमानपत्र काढून त्याजवर गुजारा करू लागल्या. जुनी ह्मण आहे कीं, कालांतरानें स्त्रिया राज्यकारभार करून पुरुषास स्वयंपाकाचीं कामें करावयास लावणार. सध्यां हिंदुस्थानांत जेथें स्त्रिया मा-

एक गृहस्थ ह्मणतो, मी कोरिआच्या मध्यभागीं प्रवास करीत असतांना सोळा भोई आळी पाळीनें माझा मेणा उचलण्यासाठीं ठेवले होते, तर ते दर खेड्यांत उतरून दर घरीं जाऊन कांहीं तरी खाऊन यायचे. आणि वाटेनें जातांना कोबीचीं वगैरे शेतें पाहिलीं कीं, एक एक आळीपाळीनें आंत शिरून मोठमोठाले कांदे उपटून आणून एकसारखे खात जायचे. एक एक माणूस नुसते कच्चे दोन दोन कांदे खायचा। अर्धा पाऊण मैल जाई पर्यंत तेवढा फन्ना उडविला, कीं पुनः बुभुक्षिता प्रमाणें कांहीं तरी बघायाचेच।

कोरिआंत पोट मोठें असणें हें श्रीमंतीचें मोठें लक्षण आहे! जे श्रीमंत लोक काटकोळे असतात त्यांना त्याची लाज वाटून ते उशा गिर्द्या पोटाला बांधून ढेरपोटीपणा आणतात. आह्मी श्रीमंत आहों असें दाखवूं इच्छिणारे दरिद्री लोक त्याच प्रमाणें करितात. राजाच्या भेटीला कोणी गेले तर भेट ह्मणून अन्न न्यावें लागतें आणि राजा बक्षिशी देतो, तीही अन्नाचीच!

बोलून चालून जो गोडीपणा तो सर्वांस प्रीतिपात्र करितो, बरोबरीच्यांला मनमिळाऊ करितो. आणि लहानास संग्रह करण्यास योग्य करितो. तो योग्यतेचा लहान मोठेपणा साफ करून टाकितो, संभाषणास गोडी आणितो आणि आपल्या समागमीं असणारांतून प्रत्येक आपल्यास पाहून प्रसन्न होईल असें करितो. भित्र्यास धैर्य देतो क्रूर व निर्दयांस सदय व कोंवळ्या अंतःकरणाचा करितो, रागानें संतप्त झालेल्या मनुष्यास शांत करितो आणि रानटी लोकांच्या गोंधळापासून सुजन मंडळीची भिन्नता दाखवितो. इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष हाडवैरी असला तरी त्याला मित्र करितो.

तुरुंग ह्मणून कांहीं भयंकर स्थळ आहे हें पक्कें ठाऊक असल्या मुळेंच कित्येक माणसें प्रामाणिकपणानें वागतात.

आरोग्य— हें धन्य आरोग्या! तूं या पृथ्वीच्या पोटीं रात्रंदिवस वास करणाऱ्या अत्यंत अमोल अपार रत्नराशीहूनही श्रेष्ठ आहेस. जीवाला प्रफुल्ल पुष्पांसारखीं टवटवी तूंच आणतेस, सद्गुणाची रुचि घेण्याविषयीं तूंच स्फुर्ति उत्पन्न करितेस. तुझी ज्याच्यावर कृपा तोच दैवशाली. ज्याच्या जवळ आहेस त्याला जगांत कांहीं कमी नाहीं, परंतु ज्याच्याजवळ नाहींस त्या हतभाग्याला अनंत सुखांनीं परिपूर्ण भरलेल्या जगांत सर्वच वस्तु कमी आहेत. जो ह्मणून तुझ्याबरोबर तुझ्या चारीही मित्रांचें अगत्यपूर्वक स्वागत करून त्यांचा तुझ्याप्रमाणें चांगला मान ठेवितो.

स्थानें विचारलें कीं, "आपल्या शत्रूचा सूड उगविण्या विषयीं मी कोणतां मार्ग धरूं?" त्यावर त्या थोर महात्म्यानें उत्तर केलें कीं "तूं चांगला मनुष्य हो, क्षमा करणें यांत अशी अशीं दिव्य रीति आहे कीं, ही ज्या अपराध्यानें तुझ्यांठायीं उत्पन्न केली त्यास आलिंगावयास सिद्ध व्हावेसें तुला वाटेल"

करमणूक.

पुणें येथें भरणाऱ्या सामाजिक परिषदेचे प्रेसिडेंटाकडे रत्नागिरींतून १० स्त्रियांचा एक अर्ज गेला आहे. त्यांतील मतलब वाचकांचे लक्षांत येण्याकारितां घेववेल तितकें तात्पर्य यापुढें दिलें आहे. आणि त्या बरोबरच आमच्या पूर्वजांनीं धर्म व आचार यांची सांगड राहण्याकरितां योजिलेले उपाय किती प्रौढ विचाराचे व हिंदुसमाजांत घोटाळा उत्पन्न न करणारे आहेत, हेही सहजी दि[illegible] येतें:—

सवेशीं अर्ज खालीं सह्या करणारणीं[illegible] ऐसाजे:— सामाजिक परिषदेंत जुन्या वा[illegible] चाली काढून टाकून सुधारणा करण्याचा व स्त्रियांस स्वातंत्र्य देण्याचा स्तुत्य विचार सरकारापर्यंत दाद मागून वगैरे व्हावयाचा आहे असें समजतें. त्यांत आमच्या मताप्रमाणें स्त्रीपुरुषांची समान पारडीं होण्या करितां अवश्य सुधारणा झाल्या पाहिजे आहेत त्या अशाः— पुरुषांप्रमाणें बायकांनीं पुनर्विवाह करण्याची सुधारणा होत आहे हें ठीकच आहे; पण पुनर्विवाहित नवऱ्यांशीं बायकांचें नाहींच जमेल तर पुरुष जसें एक बायको असतां दुसऱ्या बायका करूं शकतात, तशी एक नवरा असतां दुसरे मनास येतील तसे व तितके नवरे करण्याची परवानगी बायकांस असलीच पाहिजे. लग्नाला पैसे फार खर्च होतात व तसें होणें हल्लींच्या देश स्थितीस फार हानिकारक आहे, सबब लग्न करण्याची भानगड अजी काढून मनसोक्त विहार सुरू होतील तर चांगलेंच. [illegible] नवऱ्यांच्या घरीं राहण्यास कां जावें? आजपर्यंत आह्मी तसें केलें परंतु पुरुषांनीं आमच्याकडे राहण्यास यावें अशी सुधारणा आतां झाली पाहिजे. वृद्ध पुरुषाबरोबर १०।१२ वर्षांचें मुलीचें लग्न करून देण्याची जशी वहिवाट आहे; तशीच वृद्ध स्त्रियांना तरण्या बांडाबरोबर लग्नें करून घेण्याची मोकळीक पाहिजे. ह्मातुरड्या नवऱ्यांना जर तरण्या लुसलुशीत बायका व्हाव्या लागतात; तर तोच मनोविकार बायकांसही असणें अगदीं न्यायाचें आहे. आह्मी स्त्रियांनीं नेहमीं गृहकोटांत डांबून राहावें, आणि पुरुषांनीं पाहिजे तिकडे स्वैर फिरावें हे समतेच्या दृष्टीनें योग्य नाहीं.

महाराणी सरकार या राज्यातील मोठमोठ्या नोकऱ्या पुरुषांप्रमाणें आह्मांला मिळण्यास हरकत राहणार नाहीं. मग स्वंयपाकाचे काम पुरुषांनीं पत्करावें. त्याला तें एकदम साधणार नाहीं हें खरें, परंतु प्राप्त गोष्टीसाठीं त्यांनीं तें थोडथोडे शिकलेंच पाहिजे. न शिकून कोणाला सांगतात, हक्क सारखे होण्यासाठीं पुरुषांनीं स्वयंपाक क्रिया शिकावी. त्यांच्या नोकऱ्या आह्मी करून त्यांला पोटाला घालूं असें झालें ह्मणजे सर्व कसेंच सवोला आल्यासारखें होईल. आह्मी घेरे झुलपे राखणें पुरुष वर्गाला कदाचित अप्रिय वाटत असेल तर त्यांनीं आमच्या प्रमाणें केशकलाप राखून घेण्या' वगैरे घालाव्या मिळून पुरुष आणि स्त्री यांत भेद नसावा,

इत्यादि गोष्टींचा विचार [illegible]

सत्यशोधक

इंग्लंड व अमेरिका यांच्या दरम्यान वेनीझुला प्रकरणाबद्दलचा जो एक लढा आहे त्याबद्दल अमेरिकेनसरकार आतां हातघाईवर आलें आहे. या प्रकरणाचा निकाल लावण्याकरितां लवाद नेमण्याबद्दलचे आपलें ह्मणणें इंग्लंड जर नाकबूल करीत आहे तर त्या प्रकरणाचा कसा निकाल करावा हें ठरविण्याकरतां अमेरिकेच्या कानग्रेस सभेनें एक कमिशन नेमावें आणि त्या कमिशनाकडून जो प्रांत वेनिझुलाचा ह्मणून ठरेल तो वेनिझुलांत सामील करण्याच्या कामांत अमेरिकन सरकारानें आपली सर्व शक्ती खर्च करणें अवश्य आहे अशी अमेरिकन सरकारच्या प्रेसिडेन्टानें आपल्या कानग्रेस सभेस सूचना केली माझ्या या सूचनेचा परिणाम काय होईल हें माझ्या ध्यानांत आहे असेंही ध्वनित केलें आहे

आपसांतल्या तहाशीं ज्याचा संबंध नाहीं अशा प्रांताबद्दल अमेरिकेच्या खटपटी चालू आहेत अशा अर्थाचें लॉर्ड सालिसबरी यांचें एक व्याख्यान झाल्यावरून अमेरिकेन प्रेसिडेन्टाचे लढाई करण्यासारखे हे उद्गार निघाले आहेत.

प्रेसिडेन्टच्या या निरोपानें कांग्रेसच्या मेंबरास आनंद झाला.

प्रेसिडेन्टाचे हें ह्मणणें अयोग्य व गैर कायदा आहे अशी इंग्रज पत्रांची ओरड आहे.

अमेरिकेनपत्रें प्रेसिडेन्टाची स्तुती करीत आहेत, आणि ग्रट ब्रीटन हें अमेरिकेपासून वेगळें आहे असें समजणें ही मोठी चूक आहे असें वर्लड नांवाच्या [illegible]